साप्ताहिक १८ जानेवारी ८६ / २ रुपये

# माणूस



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे

अंक : चौतिसावा

१८ जानेवारी १९८६

किंमत : दोन रुपये

संपादक

श्री. ग. माजगावकर

साहाय्यक

दिलीप माजगावकर

सौ. निर्मला पुरंदरे

मेधा राजहंस

वार्षिक वर्गणी

साठ रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

साप्ताहिक माणूस

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ–श्याम देशपांडे



## मुंबापुरी

### □ आम्हाला काय त्याचं ?

काँग्रेसचा उरूस संपला बुवा एकदाचा. व्यवस्थापनाच्या गोंधळाविषयी आम्ही विचारलं तर काँग्रेसच्या एका नगरसेविकेचं उत्तर फार नमुनेदार होतं. त्या म्हणाल्या : 'आम्ही आमच्या घरात काय वाट्टेल ते केलं. उपाशी राहिलो, भांडलो, चोऱ्या केल्या. आपको उससे क्या ?'

बाई ग, आम्हाला त्याचं अजिबात सोयरसुतक नाही. पण या अवघ्या देशाला तारणारा असा एकच पक्ष म्हंजे काँग्रेस असं राजीव गांधी ते थेट अरूण शौरी–अंतुले–अंबिका सोनी–हुसेन–सोनल मानसिंग–नवल टाटा–भाऊराव पाटील इत्यादी इत्यादी थोर्थोर लोक म्हणतात. त्यांना हा पक्षातला धांगडधिंगा पाहून यातना नाही का होणार? आमचं एक सोडा.

सरहद्द गांधी जेव्हा ब्रॅबॉर्नच्या मंचावर आले तेव्हा पंतप्रधानांनी त्यांचं स्वागत केलं. अगदी तुरळक टाळ्या वाजल्या. शेवटी राजीव गांधींना सांगावं लागलं : 'ताली तो बजाओ.' तेव्हा कुठे टाळ्या पडल्या. आम्हाला वाईट वाटलं; पण कुणाला त्याचं काय ?

सरहद्द गांधी जेव्हा भाषण करत होते तेव्हा स्टेडियम बाहेर वेचाळीसच्या नेत्या अरूणा असफअलींना पोलीस धक्के मारत होते; पण आम्हाला त्याचं काय ? पोलीस आणि अरूणाजींचं ते खाजगी भांडण होतं. असच ना नगरसेविकाबाई ?

पंतप्रधानांनी काँग्रेस पक्षाला राष्ट्रनिर्माणाच्या कामाला लागण्याची सूचना केली. काँग्रेस पक्षातल्या नेत्यांनी आणि कार्यकर्त्यांनी साधेपणाने वागावं असा सल्ला दिला. चरित्र, शुद्ध चारित्र्य, नीतीमूल्ये वगैरे जाम डोस पाजला. जेवणाच्या मध्यंतरात जगन्नाथ मिश्रा भेटले. कसं काय वाटलं राजीवजींचं भाषण ? या प्रश्नावर ते हसले अन् म्हणाले : 'देखते रहिये. क्या क्या होता है.' दोन्ही हाताच्या बोटात नेहमीप्रमाणे सहा–सात आंगठ्या होत्या. चेहऱ्यावर तेच मग्रूर हसू.

बाय द वे, 'शहेनशहा' आणि 'गंगा जमुना सरस्वती' या सिनेमांचा मोबदला म्हणून अमिताभ बच्चनना किती मोबदला मिळाला ? त्यातला ब्लॅक किती, व्हाईट किती ?

राष्ट्रनिर्माणाच्या प्रयत्नांना सुरुवात करण्यापूर्वी काँग्रेसजनांचं शिबिर भरवून या सगळ्या शंकाकुशंका एकदाच्या दूर करा बुवा. राजीवजी तुम्हीच हे करू जाणे. कारण आपही तो देशके एकमेव विश्वास हं ! आम्ही सगळे बेभरवशाचे.

### □ राजकीय निवड ?

मुंबई विद्यापीठाचे उपकुलगुरू डॉक्टर माधव गोरे ह्यांची तीन वर्षांची मुदत आता संपत आली आहे. गोरे ह्यांची नेमणूक इद्रीस लतीफ राज्यपाल असताना झाली होती. लतीफ राज्यपाल होईपर्यंत उप–कुलगुरूंच्या नेमणुका बहुधा राजकीय स्वरूपाच्या असत. राम जोशी ह्यांची नेमणूक अशाच प्रकारची होती. जोशींनी मुंबई विद्यापीठाला राजकीय आखाड्याचे स्वरूप दिले; पण डॉक्टर गोऱ्यांनी मात्र अगदी दुसरे टोक गाठले. संशोधन, लिखाण हे त्यांचे क्षेत्र. त्यांना व्यवस्थापनाची सवय नाही, विद्यापीठाची सेनेट आणि एक्झिक्युटिव्ह कॉन्सिलच्या सभा हाताळता हाताळता त्यांचे नाकी नऊ आले. ह्याच काळात राज्यपालांना प्रोव्हाईस चॅन्सेलर आणि ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी ह्यासारखी पदे निर्माण करावी लागली.

आता राज्यपालपदी कोना प्रभाकर राव आहेत. लतीफ ह्यांच्याइतकी त्यांना शिक्षण

क्षेत्राबद्दल जाण आणि आपुलकी नाही. त्यामुळे ह्यावेळी होणारी निवड बहुधा राजकीय स्वरूपाचीच असेल. शिक्षणमंत्री राम मेघे आणि राज्यमंत्री प्राध्यापक जावेद खान ह्याचे नव्या शैक्षणिक धोरणाबद्दलचे ज्ञान अगाध आहे. जावेद खान ह्यानी तर मुंबापुरीत शरियत कायद्यात बदल करू नये ह्यासाठी काढलेल्या मोर्चाचे नेतृत्व केले होते. तेव्हा ह्या पार्श्वभूमीवर नव्या शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी कोणत्या उपकुलगुरूस आणले जाते हे पहायचे.

## □ राजा ऑफ बर्डस्

पक्षी शास्त्रज्ञ डॉक्टर सलीम अली ह्याचे 'फॉल ऑफ अ स्पॅरो' हे आत्मचरित्र नुकतेच वाचले सुदैवाने डॉक्टर अलीना भेटण्याचा योगही आला. डॉक्टर अली अलीबाग जवळ किहीम नावाच्या एका खेड्यात समुद्रकिनाऱ्यावरील एका छोट्या घरात राहतात. ते स्वत:, त्यांची सेक्रेटरी आणि नोकर.. बस.

फारच कमी लोकांना ग्रेसफुली म्हातारे होण्याची कला जमते. उरलेले साठीनतर कुरकुरायला लागतात आणि सत्तरीनतर डोक्याला ताप देतात नव्वदाव्या वर्षीही डॉक्टर अलीच्या दिनक्रमात बदल नाही. अजूनही दिवसातील दहा तास त्यांचे लिखाण आणि वाचनाचे काम चालते.

दोन प्रकारची माणसे विनम्र असतात. पहिल्या प्रकारात फार कमी माणसे मोडतात. ज्ञानवृद्धतेमुळे त्यांचे मीपण लयाला गेलेले असते दुसऱ्या प्रकारातही फार कमी माणसे येतात. आपण अडाणी असल्याची जाणीव असल्याने त्याना विनम्र राहण्यावाचून गत्यंतर नसते. ह्या दोहोंमध्ये मात्र मोठा जनसमुदाय असतो. त्याच्याशी वागताना त्याचे मीपण जपणे हे नेहमीच त्रासदायक होते. असो.

डॉ. अली हे पहिल्या प्रकारात आणि आम्ही दुसऱ्या प्रकारात येत असल्याने आमच्याशी जुळवून घेणे त्याना फारसे कष्टप्रद पडले नसावे. मुंबापुरीत पाहून तुम्ही किती पक्षी पाहाणार ? कावळे आणि चिमण्या. एकोणीसशे वीसच्या सुमारास डॉक्टर अलीनी पक्षीनिरीक्षणास सुरुवात केली तेव्हा अर्ध्या मुंबापुरीत जगले होती. मुंबापुरीत आजही जगलच आहे; पण वेगळे.

पक्षी निरीक्षणाच्या छंदाला आज जी मान्यता प्राप्त झाली आहे त्याचे प्रमुख श्रेय डॉक्टर अलीकडे जाते. पक्षीशास्त्राला प्रयोगशाळेतून बाहेर काढून प्रत्यक्ष नैसर्गिक अवस्थेत पक्षाच्या निरीक्षणावर भर देण्याचे महत्त्वाचे कार्य त्यानी केले सत्तर वर्षांच्या ह्या निरीक्षणातून प्रचड ग्रथसपदा त्यानी निर्माण केली. आत्मचरित्राच्या शेवटी आपल्याला मिळालेल्या वेगवेगळ्या पारितोषिकाची जत्री देऊन त्यानी म्हटले आहे, 'आता तुमच्या लक्षात येईल, वाटतो तितका हा अगदीच निरुपयोगी छद नाही'

'फॉल ऑफ अ स्पॅरो' जेव्हा प्रसिद्ध झाले तेव्हा प्रकाशन प्रसगी ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी प्रेसचे मुबईचे प्रतिनिधी हॉकिन्स ह्यानी सलीम अलीवर एक वात्रटिका रचली होती ती अशी :

William Shakespeare's a master of words
And a tusker a leader of herds
But wherever you fare
Over land, sea or air
Salim Ali's the raja of birds.

—विष्णू जयदेव

## पुणे वार्ता

## □ श्री. धर्मपाल यांची व्याख्याने

भारतात सध्या एकविसाव्या शतकाकडे प्रगतीशील घोडदौड करण्याची भाषा बोलली जातेय. पण खरोखरच तशी परिस्थिती आहे का कबहुना स्वातंत्र्यानतरच्या चार दशकात आपण काय साधले आहे ? स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झालेल्या व स्वातंत्र्यानतर देश उभारणीच्या कार्यात भाग घेतलेल्याना तर हे प्रश्न निश्चितच महत्त्वाचे वाटतात. श्री धर्मपाल हे अशा व्यक्तीपैकी एक. ब्रिटिशपूर्व भारताच्या इतिहासाचे ते अभ्यासक आहेत. ब्रिटिशपूर्व काळातील समाजजीवनाविषयी त्यानी लिहिलेले ग्रंथ प्रसिद्ध आहेत. स्व. जयप्रकाश नारायण यांच्या बरोबर त्यानी काम केलेले आहे. इंडियन असोसिएशन ऑफ कल्चरल फ्रिडम या संस्थेने त्यांची तीन व्याख्याने ४, ५ व ६ जाने. ८६ रोजी 'स्नेहसदन' येथे आयोजित केली होती. विषय होता, 'भारतीय समाज : पूर्वपरंपरा व नवरचना.'

ब्रिटिशपूर्वकालीन भारताचे चित्र एका मागास, गतिशून्य अडाणी समाजाचे चित्र म्हणून रंगवले गेले आहे. अर्थात त्यामागे ब्रिटिशांचे हितसबंध दडलेले होते. श्री धर्मपाल आपल्या अभ्यासाद्वारे खऱ्या ब्रिटिशपूर्वकालीन भारतीय समाजाचे चित्र उभे करू पहातात ब्रिटिशकालीन दस्तऐवजांच्या आधारावरच त्याकाळच्या भारताचे चित्र चागले, प्रगत आणि सुसघटित असल्याचे त्याना आढळते. समाज आणि राज्यसंस्था याच्यातील समन्वय, सुसघटित छोटी छोटी गावे, त्याचे प्रादेशिक संघटन आणि एकात्मता आणि एकूणच क्रियाशील समाज ( Functioning Society ) असे चित्र उभे रहाते. मद्रास आणि बगाल प्रेसिडेन्सीमधील उपलब्ध कागदपत्राच्या आधारावर तत्कालीन उत्पन्न त्याचा विनिमय, शिक्षणव्यवस्था याचा तपशील त्यानी माडला आहे. तत्कालीन भारतीय समाज हा समकालीन असलेल्या युरोपीय समाजाइतकाच किंवा त्यापेक्षा जास्तच समृद्ध होता असे धर्मपाल म्हणतात

आपण खऱ्या अर्थाने तत्कालीन भारतीय समाजाचा अभ्यास केलेला नाही १९२० पर्यंत या संदर्भात भरपूर साहित्य उपलब्ध होते, पण ते एकत्र आणण्याचा प्रयत्न झाला नाही महात्मा गाधीना ते अभिप्रेत होते पण त्याचा पाठपुरावा करण्यास ते असमर्थ ठरले. विकासाच्या वाटचालीसाठी आपण पाश्चात्य नमुन्याचाच पाठपुरावा केला परिणामी गेल्या चार दशकात आपण प्रगती साधू शकलो नाही समाज आणि राज्यसस्था याच्यातील तफावत वाढतच जात असल्याचे दिसते. Functioning Society चा लोप झालेला आढळतो.

ब्रिटिश काळात आपल्या समाजरचनेची मोठ्या प्रमाणावर मोडतोड झाली. समाजाची क्रियाशीलता मोडली गेली आणि समाज व राज्य याच्यातील समन्वय सपला. हा समन्वय साधून समाज पुन्हा क्रियाशील करायला हवा. असे धर्मपाल याना वाटते. नव्या युगाच्या

दिशा, प्रगती वगैरे वगैरे जे काही साधायचे असेल ते समाजाद्वारेच साधायला हवे असे त्याना वाटते. ( Let people do the things ) पूर्वपरंपराचा धागा जोडून समाजाची पुनर्रचना करता येईल असे त्याना वाटते.

एकूणच सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर श्री. धर्मपाल वेगळा विचार माडायचा– वेगळा दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न करतात. सध्याच्या विकास प्रक्रियेत शहरे आणि खेडयामध्ये मोठी दरी निर्माण होताना दिसते. तेव्हा धर्मपालाची ग्रामविकासाची भूमिका महत्त्वाची वाटते. तीनही व्याख्याने चांगली झाली. ( पुरेशा उपस्थितीत ) मात्र व्याख्यानाच्या वाचनापेक्षा विवेचनावर थोडा अधिक भर दिला असता तर विषयाच्या दृष्टीने अधिक परिणामकारक ठरले असते असे वाटते.

### ☐ दोन प्रदर्शने

कॅम्पात बी जे. मेडिकल कॉलेजच्या पटांगणात प्रदर्शन – कम् – बाजार भरलाय 'शिल्पोत्सव ८६ !' भारतातील विविध राज्यांतून ग्रामीण भागातील कारागिराच्या विविध कलावस्तूचे हे प्रदर्शन आहे. अशा कलावस्तूना बाजारपेठ मिळवून देण्याच्या उद्देशाने केंद्रशासनाने हे आयोजित केलय उद्घाटन ८ जानेवारीला खा सुनिल दत्त याच्या हस्ते झाले. अभिनेते लोक नेते झाल्यामुळे अशी उद्घाटने, मेळावे वगैरेंच्या दृष्टीने चागली सोय झाली आहे. ( पब्लिकची चिक्कार गर्दी जमते )

प्रदर्शनात अनेकविध वस्तू आहेत. (त्याच्या किंमतीही चिक्कार आहेत हा भाग अलाहिदा ! ) चिनीमाती, लाकूड, रेशीम, कापड, रग, काचा, हस्तीदत, वेत वगैरेंच्या सहाय्याने नित्योपयोगी, प्रदर्शनीय अशा वेगवेगळ्या प्रकारच्या वस्तू कारागिरानी बनवल्या आहेत. या साऱ्याच वस्तू मोह पाडतात. हस्तकलेतील सफाई, सौंदर्य आणि आकर्षकतेचा परिचय करून देतात.

भारतीय हस्तकलांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने केंद्रशासनाने चालविलेला हा उपक्रम स्तुत्य आहे. ह्या दर्जेदार प्रदर्शनास लोकाचा प्रतिसादही उत्स्फूर्त आहे. प्रदर्शन १८ जानेवारीपर्यंत खुले आहे.

दुसरे प्रदर्शन भरले होते बालगधर्व रंगमंदिराच्या कलादालनात. अकरा वर्षे वयाच्या सहावीत शिकणाऱ्या रश्मी उकलकरच्या चित्राचे प्रदर्शन चित्रलीला निकेतनने भरवले होते. २ जाने. ते ५ जाने. ८६ पर्यंत! छोटया रश्मीच्या चित्रामध्ये मोठी सहजता आढळते लहान मुलाच्या उद्बोधक गोष्टीबर तिने चागली चित्रे काढली आहेत. रंग, रेषा याच्यामधून रश्मीतल्या कलावताची ओळख पटते. हे प्रदर्शन तिला अधिक उत्साहित करेल यात शका नाही.

### ☐ शेफिल्ड वारी : प्रवेश दुसरा

महापौराच्या शेफिल्ड दौऱ्याविषयी अस्मादिकानी मागेच लिहिलय. ८५ नगरसेवक आणि त्याचे व्यक्तिगत सहाय्यक दौऱ्यावर गेले तर पुण्याचे व्यवस्थित प्रतिनिधित्व होईल असे आम्ही म्हटले आहे तेव्हा यादीत इं. कॉ च्या सदस्याची भर पडली म्हणून आम्हाला बिलकुल दु ख नाही दु ख वाटते ते इं. कॉं. च्या रडेपणाचे ! दौऱ्यात वर्णी लागावी म्हणून इ कॉं. वाल्यानी कोण धडपड केली ! मुख्यमत्र्याची मनधरणी आणि आणखी काय काय !

पण त्यातूनही मोठे दु ख वाटते पक्षीय राजकारणाचे ! दिल्लीपासून गल्लीपर्यंत या स्वार्थी राजकारणाने कुठली पातळी गाठली आहे त्याचे हे उदाहरण ! स्वार्थ, प्रतिष्ठा, मानपान याच्यापुढे त्याना कशाचेच भान नाही नागरी प्रश्नाची निकड नाही. मत मागताना दिसणारी पोटतिडीक न जाणो कुठे लुब्ध होऊन जाते ? बर सौजन्य, मामोपचार, समजूतदारपणा तरी थोडा असावा की नाही ? महापौराना पाचारण केले असताना इतरांनी स्वत हून मागे रहाणे त्याना शोभले असते; पण तसे झाले असते तर ते पुणेरी नगरसेवक कसले ?

एका लहानशा घटनेचा एवढा मोठा बाऊ तरी कशासाठी ? मुख्यमत्र्याना मधे घालणे कशासाठी ? प्रकरण न्यायालयात नेण्याची धडपडही कशासाठी ? या निमित्ताने स्वत चे महत्त्व वाढवण्यापलिकडे काही नाही. अशा प्रकाराने महत्त्व वाढवणाऱ्याना नागरी प्रश्नाची उकल करण्यात स्वारस्य दिसत नाही. त्यासाठी धडपडताना ते आम्हाला दिसत नाहीत, इतर वेळी महापालिकेच्या तिजोरीत खणखणाट असल्याची सबब सांगणारे दौऱ्यात येईल त्याची भर घालताहेत याचा जात्र नागरिकानी विचारलाच पाहिजे !

शिवसेनेने दौऱ्याच्या निषेधार्थ गाढवांचा मोर्चा काढला. (कारण त्याचा कोणी प्रतिनिधी दौऱ्यात नाही ना ! ) बाहेर निषेध करणारे हे प्रतिनिधी महापालिकेत ठराव मजूर होताना शात होते, हे कसे ? याचाही जाब विचारलाच पाहिजे. एकूणच या साऱ्या घटनाचा पुणेकर नागरिकानी तीव्र निषेध केला पाहिजे !

–मनोहर सोनवणे

सांस्कृतिक नागपूर

## श्री. मा. गो. वैद्य उत्स्फूर्त सत्कार समारंभ

दिनाक ७ जानेवारीला सारे नागपूर विलक्षण थडीने कुडकुडत असताना सध्याकाळी ५ वाजता धनवटे रग मदिरात नागपूरकरानी जिव्हाळयाने भारलेले उबदार वातावरण अनुभविले 'दैनिक तरुण भारत'चे माजी सपादक श्री माधव गोविंद उपाख्य बाबूराव वैद्य याचा सत्कार समारभ नागपुरातल्या त्याच्या चाहत्यानी आयोजित केला. त्यावेळी निरनिराळ्या क्षेत्रातील मान्यवरानी उपस्थित राहून बाबूराव वैद्याच्या गुणाचे गुणगान केले. ह्या समारभाचे अध्यक्षस्थान नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. वि. भि. कोलते यानी स्वीकारले होते तर प्रमुख पाहुणे होते 'टाईम्स ऑफ इंडियाचे' प्रमुख सपादक श्री. श्री गिरलालजी जैन. इतर वक्त्यामध्ये रा. स्व. संघाचे प्रमुख मा. बाळासाहेब देवरस, महाराष्ट्र विधान परिषदेचे माजी अध्यक्ष श्री. रा. सु गवई याचा अतर्भाव होता. श्री. गवई यानी विधान परिषदेत बाबूराव वैद्य कोणत्याही प्रश्नाचा किती निरपेक्ष विचार करीत असत, ह्याची अनेक उदाहरणे सागितली तर बाळासाहेब देवरस यानी १९४८ मध्ये 'तरुण भारत'ची नाजूक परिस्थिती असताना श्री. बाबूराव वैद्य याच्यावर त्याची जबाबदारी कशी सोपविण्यात आली व

वैद्यांनी ती कशी यशस्वीपणे पार पाडली ह्याची रोचक हकीकत सांगितली. श्री. राम शेवाळकर, अध्यक्ष, विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांनी आणीबाणीच्या झंझावाताच्या काळात मोठमोठे पत्रकाररूपी वृक्ष कोसळून पडत असताना बाबुरावांनी कोणत्याही प्रकारची तडजोड न करता ह्या झंझावातासमोर मान तुकविण्याचे कसे नाकारले ह्याची रोमांचकारक हकीकत सांगितली. 'मूल्यांचा ऱ्हास होत असताना बाबुराव वैद्यांचा सत्कार व्हावा ही खचितच आशादायक घटना आहे' असे त्यांनी भावपूर्ण उद्‌गार काढलेत. अध्यक्ष स्थानी असलेल्या डॉ. वि. भि. कोलते यांनी 'बाबुराव वैद्यांमधील शिक्षक महत्त्वाचा आहे. आपले उरलेले जीवन बाबुरावांनी संस्कृत भाषेच्या अभिवृद्धीकरिता खर्च करावे' असे अगत्यपूर्वक सांगितले. उत्तरादाखल बोलताना बाबुराव वैद्य म्हणाले, 'तरोडा ह्या खेडेगावाहून आलेल्या ह्या माणसाचा तुम्ही एवढ्या मोठ्या प्रमाणात सत्कार कराल याची मला कल्पनाही नव्हती. समोर आलेले काम मनापासून करावयाचे येव्हढाच माझा धर्म आहे. आज मी तुम्हाला मोठा झालो असे वाटते आहे त्याचे सारे श्रेय रा. स्व. संघाला आहे. रा. स्व संघामुळे मला ध्येयवाद प्राप्त झाला आणि जीवनात असे विलक्षण प्रसंग आले की, मरणाचे भयही त्यामुळे नाहीसे झाले!' ह्या सत्कार समारंभाच्या निमित्ताने एक 'गौरविका' प्रकाशित करण्यात आली आणि बाबुराव वैद्यांच्या लेखांचा एक संग्रह 'मागोवा' ह्या ग्रंथाचेही प्रकाशन करण्यात आले. टाईम्स ऑफ इंडियाचे प्रमुख संपादक श्री. गिरीलालजी जैन ह्यांनी मोठे खुसखुशीत व्याख्यान दिले.

नागपूरकर एखाद्या संपादकाचा एवढ्या मोठ्या प्रमाणावर सत्कार करत असतील तर आपणही नागपूरला कायमचे स्थायिक होऊ असे त्यांनी विनोदाने सांगितले. धनवटे रंगमंदिर ह्यावेळी बाबुराव वैद्यांच्या चाहत्यांनी तुडुंब भरून वहात होते. कित्येकांना रंगमंदिरात प्रवेशही मिळाला नाही हे लक्षात घेण्यासारखे आहे.

अनेक वक्त्यांनी बाबुराव वैद्यांच्या अनेक गुणांचा निर्देश केला. परंतु मला मात्र सध्याच्या परिस्थितीत दुर्मिळ असलेला एकच गुण त्यांच्यात आढळून आला. बाबुराव ज्या दिवशी तरुण भारतातून निवृत्त झाले त्याच दिवशी ते नागपूर सोडून आपल्या शेतीच्या गावी, तरोड्याला निघून गेले. नागपूरचे घर त्यांनी आपल्या मुलाचे स्वाधीन केले. 'माझा ह्यानंतरचा महिन्यातला १५ दिवस मुक्काम तरोड्याला आणि १५ दिवस मुक्काम नागपूरला संघ कार्यालयात राहील,' असे त्यांनी आपल्या मित्रांना सांगितले. बाबुरावांनी अशी वृत्ती सर्वच क्षेत्रात दाखविली. मागे ते युनिव्हर्सिटीत एक्झिक्युटिव्ह कौन्सिलमध्ये होते. तिथली तीन वर्षाची मुदत संपल्यानंतर त्यांनी पुन्हा निवडणूक लढविली नाही. लोकांना आजकाल खुर्ची सोडणे कठीण वाटते. बाबुराव वैद्यांना खुर्ची सोडण्याचे जीवनात कधीच काही वाटले नाही. म्हणूनच त्यांचा सत्कार!

— शरच्चंद्र


## राजहंसचे नवे विज्ञान प्रकाशन

टारझनच्या हातात एक पुस्तक पडलं....
पांढऱ्यावर काळे विचित्र आकार पाहून तो
बुचकळ्यात पडला.
येत्या काही वर्षांत आपण सगळेच टारझन ठरू
की काय?

अनोळखी वस्तू, अनोळखी भाषा आणि गूढ
वाटणाऱ्या शक्ती असलेलं एक जग आपल्या
जगात घुसत चाललेलं आहे.
हे आहे कॉम्प्युटरचे जग.

एक लक्षात घ्या. या कॉम्प्युटरमध्ये काहीही
जादू नाही.
ते केवळ एक यंत्र आहे.
कर्ताकरविता माणूसच आहे.

या यंत्रात माहिती कशी घातली जाते इथपासून
ते हवी असलेली माहिती बाहेर पडेपर्यंत
प्रत्येक घटनेची माहिती सांगणारे आणि या
सगळ्याचा नेहमीच्या अनुभवांच्या आधारे
खुलासा करणारे पुस्तक

## या काँप्यूटरमध्ये दडलंय काय?

**लेखक : राजीव साने**

किंमत : रुपये तीस

राजहंस प्रकाशन

| | |
|---|---|
| १०२५ सदाशिव पेठ<br>नागनाथ पाराजवळ<br>पुणे ४११०३०<br><br>दूरध्वनी : ४४३४५९ | C/o श्री. वा. र. गोडे<br>४१ भवानीशंकर रोड<br>जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर<br>दादर (प.) मुंबई ४०० ०२८<br>दूरध्वनी : ४२२५४५५ |

# प्रादेशिक पक्ष : काळाची अपरिहार्यता

अनिल शिंदे

पंतप्रधान राजीव गांधी हे लोकशाहीचे खरे त्राते आहेत, चर्चा करण्यावर त्याचा विश्वास आहे, विरोधही त्याना आवडतो ही एक प्रतिमा नोव्हेंबरपर्यंत होती ती गेल्या दोन महिन्यात पुसत चालली आहे की काय अशी शंका येते. शहाबानो मागे ते निर्धाराने उभे राहात नाहीत, झियाना ते शह देऊ शकत नाहीत आणि आता प्रादेशिक पक्षाचे यश त्याच्या पक्षसदस्यांच्या व नेत्याच्या डोळयात खुपते त्याला ते आवर घालत नाहीत. या घटना तरी तेच दर्शवतात; पण त्यामुळेच प्रादेशिक पक्षाचे वाढते महत्त्व ध्यानात येते. प्रादेशिक पक्ष – ही संकल्पना तशी जुनीच, एखाद्या दुसऱ्या राज्यात एखादा पक्ष जेव्हा स्थापन होतो व सत्ता मिळविण्याची धडपड करतो, त्याचे कार्यक्षेत्र जेव्हा त्या विशिष्ट प्रदेशापुरतेच मर्यादित असते तेव्हा तो पक्ष प्रादेशिक पक्ष ठरतो. परवाच टिव्हीवर चार मान्यवराची १९८५ चे दर्शन या सदराखाली चर्चा झाली. त्यात टाईम्स ऑफ इंडियाचे संपादक इंदर मल्होत्रा यानी म्हटले होते की, 'एका दृष्टीने इं. कॉंग्रेस हाही एक प्रादेशिक पक्षच आहे कारण त्याचे क्षेत्र हिंदी भाषिक प्रदेशापुरतेच मर्यादित आहे.' पण हा झाला प्रादेशिक पक्षाचा फारच व्यापक अर्थ आणि इं कॉंग्रेस तरी स्वतःला प्रादेशिक पक्ष समजत नाही हे त्या पक्षानेच इतर प्रादेशिक पक्षाच्या वाढीवर व्यक्त केलेल्या चिंतेवरून स्पष्ट होते.

सध्या चांगले नाव कमावलेले प्रादेशिक पक्ष तसे कमी आहेत. पण गेल्या काही वर्षात ही सख्या वाढते आहे. या सर्व नावात सध्या पहिले नाव घ्यावे लागते ते तेलगू देसम्‌चे. त्यानतर मग अकाली दल, आसाम गण-परिषद याचा क्रमांक लागतो. शिवसेनेसारखा एखादा पक्षही, ज्याने एकेकाळी महाराष्ट्रात बरीच सत्ता मिळवली होती, कधी कधी डोके वर काढतच असतो नॅशनल कॉन्फरन्स हा तर एकेकाळी एकमात्र प्रादेशिक पक्ष होता.

भारतातल्या प्रादेशिक पक्षाचा उदय कसा झाला याचा ढोबळ मानाने विचार करता असे दिसते की, प्रत्येक प्रदेशात काही तरी विशिष्ट समस्या निर्माण झाली, ती चिघळली व त्यातून मग संघर्ष करण्याकरता एकत्र येणाऱ्यानी पक्ष निर्माण केला महाराष्ट्रात, मराठी भाषिकाना, नोकऱ्यात स्वतःच्याच प्रदेशात मागे सारले जाऊ लागले तेव्हा बाळ ठाकरेंनी 'मार्मिक'मधून विविध कपन्यातील आकडेवारी प्रसिद्ध केली, आदोलनाचे इशारे दिले. त्यातून मराठी माणूस एक झाल्यासारखा दिसला आणि मग घटनाहीन शिवसेनेची घाईने स्थापना झाली.

आध्रमध्ये मुळातच एन. टी. रामाराव याची लोकप्रियता जबरदस्त होती. पण इं. कॉं. चा प्रभावही तेथे होता पण इंदिराजीनी आपल्या शेवटच्या काळात एन. टी रामारावांना चागलेच महत्त्व प्राप्त करून दिले. रामाराव उपचारासाठी परदेशी गेल्याबरोबर इकडे नेतृत्व बदलाचा घोळ घातला. परिणामी प्रकृती सुधारताच रामाराव 'व्हिलचेअर'सह दिल्लीत दाखल झाले. त्यानी येताना आपले आमदारच बरोबर आणले. विमानातून, रेल्वेतून आपल्या पाठिराख्याना त्यानी दिल्लीत पेश केले. मतदान कशाला, उघड पाठीराखेच त्यानी दाखवत दिल्लीला बजावले, 'हा सूर्य नि हा जयद्रथ !' परिणामी इंदिराजीना माघार घेणे भाग पडले. रामारावानी येथेच उचल खाल्ली आणि त्यांचा तेलगू देसम् पक्ष मजबूत अवस्थेला पोहोचला. इंदिराजीच्या खूनानतर आलेल्या सहानुभूती व राजीव लाटेत भारतात टिकणारा तो एकमेव पक्ष ठरला. या प्रादेशिक पक्षाने आपल्या राज्यात विजय मिळविण्याबरोबरच दिल्लीला एवढ्या मोठ्या प्रमाणावर प्रतिनिधी पाठविण्याचीही पहिलीच वेळ ठरली. (आणि तीही सत्तारूढ पक्षाची चलती असताना !)

पंजाबमध्ये अकाली दल हा तसा नवा पक्ष नाही तो प्रथमच सत्तेवर आला अशातलाही काही भाग नाही. पण मध्यतरी त्या पक्षालाही अवकळा आलेली होती पण पंजाब-प्रश्न चिघळत चालला (खरं म्हणजे चिघळवला गेला) खलिस्तानची मागणी मधून मधून डोके वर काढू लागली. पजाबात दहशतवाद बोकाळू लागला. लोकशाहीची सर्व मूल्ये पायदळी तुडविली गेली. अन् मग शेवटी 'अती झाल...!' म्हणत तेथे लष्करी कारवाई झाली. सुवर्ण मदिरात लष्कर घुसलं आणि येथेच अकालीच्या पुढच्या यशाची मुहूर्तमेढ झाली. इंदिराजीचा खून झाला. त्यानतर दिल्लीत व उत्तरेत शीखविरोधी दगली झाल्या. त्यामुळे तर अकाली दलाने आपला पाया पक्का केला. राजीव गांधीबरोबर चर्चा झडल्या आणि शेवटी करार झाला. सत लोंगोवालानी करारात भाग घेतला होता. अकाली दलाचे ते खरे तर एकमेव आधारस्तभ होते. त्याची हत्या झाली आणि अकालीनाही सहानुभूतीची बाजू मिळाली राजीवजीना मिळालेल्या सहानुभूती लाटेपेक्षा ही लाट पंजाबात अधिक ताजी होती. परिणाम पजाब निवडणुकीत अकालीना घवघवीत यश मिळाले. राजीव गाधीची मनोरथे बऱ्याच प्रमाणात उधळली गेली.

आसामातही परदेशी घुसखोराचा प्रश्न चिघळत चालला होता. तेथे अनेक सघटना या घुसखोरीच्या प्रश्नाविरुद्ध लढत होत्या. ही लढाई अर्थातच लोकशाहीचा गौरव व्हावा अशा अहिंसेच्या मार्गानेच चालली होती. पण सतत सहा वर्षे ही लढाई लढणाऱ्याना यश लवकर नाही मिळाले. काही वेळा या संघटनांतील मुख्य सहा सघटनाच्या नेत्यात मतभेद होत. पण त्यांनी आसाम प्रश्न हाच महत्त्वाचा मानला आणि शेवटी एकत्र येऊन पंतप्रधान राजीव गाधीबरोबर करार केला. आणि त्यानतर या सघटनानी एकत्र येऊन पक्ष उभा केला आसाम गण-परिषद. या पक्षाला तर राजमान्यताही मिळालेली नव्हती. पण त्याला चागलाच लोकाश्रय लाभला होता, लोकमान्यता लाभली

होती. त्यामुळेच एका अर्थानं स्वतंत्र (अपक्ष) रीतीने उभ्या राहिलेल्या गणपरिषदेच्या उमेदवाराना घवघवीत यश मिळाल; आणि गणपरिषदेला निर्विवाद बहुमत मिळाल. अशा रीतीनं आसामात तर प्रथमच एक प्रादेशिक पक्ष सत्तेवर आला.

## राष्ट्रीय पक्षाचे प्रादेशिकरण

हे वर नमूद केलेले आसाम गणपरिषद, अकाली दल, तेलगू देसम् हे पक्ष प्रादेशिक अर्थानेच जन्मास आले, विकास पावले व पुढे वाटचाल करीत आहेत पण इतर राष्ट्रीय म्हणवणारे काही पक्षही आता प्रादेशिक होत आहेत.हीही एक गोष्ट स्पष्ट करणे आवश्यक आहे. जनता पक्ष हा एकेकाळी सत्तेवर असलेला पक्ष आता फक्त कर्नाटकातच तग धरून उभा आहे समाजवादी कांग्रेस पक्ष महाराष्ट्रातच थोडी चळवळ करतो आहे. मार्क्सवादी व कम्युनिस्ट लोक आता बगाल केरळापुरतेच आहेत त्यातही केरळ हातून सुटलेले आहेच. आणि इ. कांग्रेस फक्त हिंदी भाषिक प्रदेशापुरताच उरला आहे परिणामी देशात सध्या प्रादेशिक पक्षाची लाट आहे असे म्हणता येईल.

आसाम गणपरिषद, अकाली दल, तेलगू देसम्, मुंबईतली शिवसेना असे प्रादेशिक पक्ष आता स्थिरस्थावर होऊ पहात आहेत. आता त्याचे भवितव्य काय याचाही विचार करणे आवश्यक आहे.

या सर्व पक्षान आसाम गणपरिषदेला अधिक सावधतेने पावले उचलायला हवीत याचे कारण तिथले इं. कॉं. वाले अधिक असतुष्ट आहेत गणपरिषदेने आम्हाला प्रचारच करू दिला नाही अशी ओरड त्यानी मुंबईच्या शताब्दी महोत्सवात केली. त्यामुळे सत्ता प्रथमच हाती आलेल्या गणपरिषदेच्या व मुख्यमंत्री प्रफुल्लकुमार महत याच्या मत्रिमडळाने डोके पूर्वीप्रमाणेच शात ठेवून काम करणे आवश्यक आहे पूर्वीची घुसखोरी केंद्राच्या मदतीने निपटून काढावयाची आहेच पण आता बागलादेश–आसाम सीमेवरून पुन्हा घुसखोरी होणार नाही यावर त्यानी केवळ केंद्रावर भिस्त ठेवून चालणार नाही. अन्यथा इंकांवाल्याना ओरड करायला एक चांगला विषय मिळेल.

प्रशासनात बदल करून महतांनी सुरवात चागलीच केली आहे इकां धार्जिण्या प्रशासनाची उचलबागडी करून गळती थाबविली आहे त्याचा लाभही गणपरिषदेला नक्कीच मिळेल.

त्याचप्रमाणे गणपरिषद ही वेगवेगळ्या सघटना एकत्र येऊन तयार झालेली आहे. त्यामुळे ती फोडण्याचा प्रयत्न इंकांकडून होणे अशक्य नाही तेव्हा फुखन,महत आदी नेत्यांनी आपापल्या संघटनाना आता सघटनानीत करून फक्त गणपरिषदच शिल्लक ठेवणे आवश्यक आहे.

पजाबच्या शेजारी इदिरा कॉंग्रेसचेच राज्य आहे. भजनलाल या राज्याचे, हरियाणाचे नेतृत्व करीत आहेत चदिगडसारखे अद्ययावत शहर सोडताना त्याना आनद झालेला नाहीच पण पजाबनेही आपला शब्द पूर्ण करणे आवश्यक आहे. त्यानी यमुना, सतलज जोड कालवा १५ ऑगस्टपर्यंत पूर्ण करू हे जे वचन दिले आहे त्याची पूर्ती करण्याची शाश्वती हरियाणाला देणे आवश्यक आहे त्या दृष्टीने आवश्यक ते प्रयत्न आतापासूनच सुरू करावयास हवेत. नाही तर मग इ. कॉं. व अकालीत काहीही फरक राहणार नाही व जनतेची सहानुभूती पुन्हा इं. कॉं कडे झुकेल.

याच बरोबर पंजाबात बोकाळणारा हिंसाचार थोपविणे हेही या पक्षापुढचे अत्यत महत्वाचे कार्य आहे तो थोपविला नाही तर बाजी उलटू शकते हे बर्नालानी पक्के लक्षात ठेवायला हवे

प्रादेशिक पक्षाना पुनरुज्जीवन प्राप्त करून देणाऱ्या तेलगू देसम्ने तर स्वत ला सावरणे फारच आवश्यक आहे. याचे कारण एक तर रामाराव इ. कॉं. चा अधूनमधून उदोउदो करण्याच्या प्रयत्नात आहेत व दुसरे म्हणजे प्रसिद्धी माध्यमावर ते आणीबाणीप्रमाणेच बधने आणत आहेत यामुळे प्रथम त्याची व नंतर त्याच्या पक्षाची प्रतिमा डागाळली जाणे शक्य आहे प्रसिद्धी माध्यमाबरोबरची, विशेषत वृत्तपत्राबरोबरची मस्ती, ही कोणालाही केव्हाही जाच गेलेली आहे त्यात रामारावाकडे टिव्ही वगैरे साधने नाहीत कारण त्याची मालकी आहे केंद्राकडे तेव्हा रामारावानी थोड जपून वागण आवश्यक आहे

शिवसेना ही अद्याप फारच लहान आहे. तिला गेल्यावर्षी जेमतेम मुंबई काबीज करता आलेली आहे झोपडपट्ट्याबाबत तिने वस्तुनिष्ठ दृष्टिक्षेप घेतला हे ठीक आहे पण त्याबरोबरच त्याची मते जपणेही शिवसेनेला आवश्यक आहे. झोपडपट्टीवासियाना त्यांनी समजावून देणे आवश्यक आहे की, आम्ही या दलदलीतून तुम्हाला उचलतो आहोत. पण ज्यानी या दलदलीत तुम्हाला लोटले त्या सत्ताधाऱ्यावरच तुम्ही खरा दोष ठेवा. पण हे कठीण काम आहे कारण झोपडपट्टीत राहनो यापेक्षा आपण मुंबईत राहतो याचेच अप्रुप या लोकाना आहे. कारण तेथे त्याना रोजगार मिळतो. त्यामुळे हे कठीण काम आहे पण तरीरी ते करावेच लागेल.

शरद पवाराचा समाजवादी पक्ष आता स्थिरस्थावर होऊ पाहात आहे. त्याने जर व्यवस्थित पाऊले टाकली तर त्याला नजिकच्या भविष्य काळात महाराष्ट्राची सत्ता मिळवता येईल. आणि तूर्तास तरी या पक्षाने स्वत चे प्रादेशिक महत्व लक्षात ठेवावे.

या सर्व चर्चेतून निष्कर्ष काढावयाचा तर तो असा काढता येईल की, प्रादेशिक पक्ष हे राज्याराज्यात रुजत आहेत आज त्यानी आपापले प्रदेश पक्के केले आहेत. यापुढे जर त्यांनी सतत विचार विनिमय चालू ठेवला तर त्यातून एक राष्ट्रीय पक्ष जो इं. कॉं. ला पर्यायी ठरू शकेल, असा उभा राहू शकतो. पण त्याआधी प्रत्येकाने आपला प्रदेश समर्थपणे साभाळणे आवश्यक आहे. अर्थात लोकशाही मार्गानेच...

आंध्र प्रदेशच्या सत्तारूढ पक्षाचे, तेलगू देसम्चे वार्षिक समेलन नुकतेच झाले. त्यासाठी हेगडे (कर्नाटक मुख्यमंत्री) व बर्नाला (पंजाब मुख्यमंत्री) उपस्थित होते यावेळी भारत देसम्च्या स्थापनेची शक्यता होती. आता ती दूर पळाली आहे आणि तूर्तास ते चांगलेही आहे. घाईने 'भारत देसम्' झाला तर त्याचा पुन्हा जनता पक्ष व्हायला वेळ लागायचा नाही. तेव्हा प्रथम प्रत्येकाने मजबूत होणे आवश्यक आहे. याचे कारण इं. कॉं सध्या एकखाबी तबू दिसत असला तरी नव्या पंतप्रधानाच्या काही धनात्मक ( पॉझिटिव्ह ) पावलांमुळे इं. कॉं. मध्ये एकाहून अनेक खाब निर्माण होत आहेत. त्यामुळे इं. कांग्रेस तूर्तास तरी अधिक बळकट होते आहे. तेव्हा सध्या प्रत्येक प्रादेशिक पक्षानं आपला प्रदेश व्यवस्थित साभाळून तेथील जनतेचे सपूर्ण प्रेम, तिचा आश्रय मिळविणे आवश्यक आहे. मात्र 'आज ना उद्या आम्ही इं कॉं पर्याय निर्माण करू' हा सकल्प त्यानी नव्या वर्षारभी सोडायला काय हरकत आहे ? ☐

युवकवर्ष समारोप

# बेलूर मठ... गंगाकाठ आणि सहस्रावधी युवक

अविनाश धर्माधिकारी

**स्वा**मी विवेकानंद या नावाबद्दल लहानपणापासून एक विलक्षण आकर्षण वाटायचं. झाडावर उलटं टांगून घेणारा बेडर पोरगा आणि त्याला बागुलबुवा दाखवणाऱ्या माळयाला धुडकावून लावणारा बुद्धिनिष्ठ हूडपणा आकर्षक वाटला होता. डोक्यावर नागानं छत्र धरल्याची गोष्ट तशी कधी फारशी खरी वाटलीच नाही. कारण नंतर मोठ्या झालेल्या प्रत्येकच व्यक्तीच्या डोक्यावर त्याचे चरित्रकार नागाला फणा धरायला लावतात. पण नरेंद्रच्या जीवनातले किती तरी क्षण अगदी मानवी आणि तरीही कदाचित म्हणूनच झपाटून टाकणारे वाटले होते. टेनिसनची कविता, देव म्हणजे काय हा प्रश्न, रामकृष्ण नावाच्या अशिक्षित बाबाची भेट, आपल्या गुरूचीच सतत परीक्षा घेणं, गरिबी, बेकारी यांनी गांजून जाणं, नंतर बंडखोरपणे देवाचं अस्तित्व धुडकावून लावणं, नोकरी मागायला देवीसमोर गेल्यावर एकप्रकारच्या समाधी अवस्थेत भक्ती, ज्ञान, वैराग्य मागून परत येणं, खळाळत्या धोकादायक समुद्रात स्वत:ला फेकून देऊन एका खडकावर पूर्ण तीन दिवस, तीन रात्र राष्ट्रचिंतन करणं, नंतर अमेरिकेला दिग्विजय आणि विसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर एकदा या संपूर्ण देशाला हलवून सोडणं या सगळ्या जीवनाला दैवी स्पर्श तर जाणवायचा, तरी मानवी पातळीच्या अतीत काही वाटायचं नाही. म्हणून हा संन्यासी आकर्षक वाटला होता. त्याची भगवी वस्त्रं ही आजूबाजूच्या समाजापासून त्याला वेगळ काढणारी भिंत वाटायची नाही, उलट आजूबाजूच्या समाजाशी समरस व्हायच्या कर्तव्याची आठवण करून देणारी खूण वाटायची. अध्यात्मप्रवण असूनही अनाकलनीय शब्दजंजाळात याची वाणी कधी गुरफटून गेलेली दिसली नाही. उलट तरुणांना हा वीर संन्यासी सांगायचा—भगवद्गीतेपेक्षा फुटबॉलमधून तुम्हाला मुक्तीचा मार्ग लवकर सापडेल आणि पुस्तकी पांडित्यापेक्षा पीळदार स्नायूंमधून भगवद्गीतेचा अर्थ तुम्हाला जास्त चांगला समजेल. त्याच्या विचारातल्या खळाळत्या आक्रमक चैतन्याचं शिल्प त्याच्या शब्दात, त्याच्या व्यक्तिमत्त्वात समूर्त झालेलं वाटायचं. म्हणून 'कोलंबो ते आल्मोरा' ही व्याख्यानं वाचताना आपण नुसते शब्द वाचतो आहोत असं कधीच वाटलं नाही, प्रभावी स्पंदनं अनुभवतो आहोत असं वाटलं. बुद्धिनिष्ठ चर्चा न करता नुसतीच टीका करणाऱ्या व्यक्तीला डॉकवरून उचलून समुद्रात फेकून द्यायची तयारी असलेला हा योद्धा संन्यासी कायम युवकच वाटला. आता २१ व्या शतकाच्या उंबरठ्यावर उभ्या असलेल्या भारतात त्याचे शब्द, त्याचं जीवन हे युवा चैतन्याचं चिरंजीव लेणं वाटतं.

ज्ञान प्रबोधिनीत काम करताना हे लेणं आमच्या डोळ्यांसमोर असतंच. तेच समोर ठेवून दरवर्षी क्रीडा प्रात्यक्षिकांचा जल्लोष रचला जातो. ३१ डिसेंबर १९८४ च्या रात्री आम्ही चाळीसएक युवक कार्यकर्ते या क्रीडा प्रात्यक्षिकांच्या कामातच रंगून गेलेलो होतो. अचानक रस्त्यावरून फटाके, शिट्या आणि घोषणांचा कल्लोळ कानावर पडला तेव्हा आठवलं की आपलं वर्ष सुरू झालं. युवक वर्ष अन् या वर्षाची अधिष्ठात्री व्यक्ती आहे स्वामी विवेकानंद. विवेकानंदांसारखी व्यक्ती महाकजाग असते. नुसते शब्द-समारंभ—मांडव—पुष्पगुच्छ या भाषेत मांडलेली पूजा तिला पसंत नसते. बखोटीला धरून विवेकानंद पावलापावलावर विचारतात 'कृतिशीलता कुठे



आहे ?' ती नसली तर त्यांचे शब्द चाबकचे फटके होऊन आपल्यावर कोसळतात. हे काहीसं जाणवत होतं म्हणून यदुनाथ थत्तेंनी मागच्या वर्षी घेतलेल्या आमच्या एका बैठकीत मी विचारलं होतं 'आपण युवक वर्ष साजरं का करायचं ?' नुसतं राष्ट्रसंघानं नाव दिलंय म्हणून ? तसे आपण एक उत्सवप्रिय समाज आहोतच आणि अनुत्पादक उत्सवात खूप मोठी शक्ती ओतून आपण वर्षांमागून वर्षे 'साजरी' करण्यात तज्ज्ञ आहोत. तसंच हे एक वर्ष मानायचं ?' यदुनाथ थत्तेंनी म्हटले होते, युनोनं वर्षाला नाव देणं, हे एक निमित्त, एक प्रतीक त्या निमित्तानं आपण करत असलेल्या रचनात्मक कामाना अधिक गती द्यायची. मग युनोनं दिलेलं नाव हे प्रतीक अन् त्या वर्षासाठी आपण निवडलेलं प्रतीक विवेकानंद केवढं जागृत, धारेवर धरणारं दैवत ! त्याला युवकाकडून रचनात्मक कार्याची आव्हानं पेलण्याची अपेक्षा असते. मग रचनात्मक कार्याच्या दिशा शोधायला हव्यात. विविध विचारधारा, प्रचलित घडामोडी आणि देशप्रश्नांचा अभ्यास करण्यासाठी आमची काही युवकांची दर शनिवारी रात्री एक बैठक व्हायची. एका शनिवारी विलास चाफेकरांनी भारतातल्या निवडक रचनात्मक कार्यांची ओळख करून दिली. त्या कार्यांचे प्रणेते युवकच आहेत.

मग आपण अशा युवकांना भेटू. भारतभरातले आपल्या वयाचे आपले दोस्त गाठू. अशी एक सहजच योजना घाटली. वर्षभर पायाला भिंगरी लावून भटकती करताना गुजरातमध्ये नवरचना समितीचे युवक भेटले आसाममध्ये 'आसु'चे युवक राजकीय परिवर्तन घडवून आणण्याचे आघाडीवर लढताना दिसले. अखिल भारतीय शीख विद्यार्थी महासंघाची तगडी दोस्त मंडळी अजूनही 'युद्धा'च्या पवित्र्यात असलेली दिली. कन्याकुमारीला विवेकानंद केंद्रात, युवक अध्यात्मसाधना आणि विधायक समाजकार्य यांचा मेळ घालण्यात निमग्न असलेले दिसले. रा. स्व. संघ आणि राष्ट्रसेवादल या संघटनांच्या युवकांसमवेतही वागडता आलं. शरद जोशींच्या शेतकरी संघटनेच्या रुपानं एक अत्यंत आक्रमक युवक संघटना—तीसुद्धा ग्रामीण युवकांची शक्ती संघटित करणारी—पहायला मिळाली. मुस्लिम सत्यशोधक समाज आणि दलित रंगभूमी ही युवक शक्तीच्या आणखी दोन चेहऱ्यांची नावं. त्यांच्याशीही ओळख झाली. रचनात्मक कार्य; परिवर्तन, नवनिर्मिती असे शब्द वापरणारे समवयीन दोस्तच खरं युवक वर्ष साजरं करत होते. अशा युवकांसाठी प्रत्येकच वर्ष 'युवक वर्ष' असतं.

पहाता पहाता या युवक वर्षात पृथ्वीनं स्वतःभोवती तीनशेवेळा फिरून झालं तेव्हा कानावर रामकृष्ण मिशनच्या 'अखिल भारतीय युवा समेलना'ची वार्ता आली. भारतभरातून दहा हजाराहून जास्त युवक येणार आहेत. सर्व प्रांतातले, सर्व विचारधारांचे युवक डिसेंबरमध्ये गंगेच्या काठी बेलूरला जमणार आहेत. ही कल्पना चांगली वाटली. युवक वर्षाचा समारोप असा आपसूकच विवेकानंदाच्या प्रांगणात, आपल्यासारख्याच नऊ हजार नऊशे नव्व्याण्णव युवकांबरोबर होणं उचित वाटलं. बेलूर मठाचं आकर्षण होतंच. विवेकानंद चरित्र आणि स्वातंत्र्य चळवळीतले संदर्भ यामुळे बंगाल बद्दलही एक भावनिक ओढ असते डिसेंबरातच कलकत्त्यात मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाची १२ वी कॉंग्रेस भरली होती. संपूर्ण वर्षाचा क्लायमॅक्स नेमका डिसेंबरात साधून येत होता. आसाममधल्या निवडणुका, CPM ची १२ वी कॉंग्रेस, मुंबईत कॉंग्रेस शताब्दी समारंभ, ढाक्यात SARC ची शिखर परिषद .....अझलन शाह हॉकी स्पर्धेत विजय, दक्षिण आशियाई ॲथलेटिक्स आणि ऑस्ट्रेलियाचा क्रिकेट दौरा......असं कितीतरी. अशा क्लायमॅक्सचाच एक भाग.

रामकृष्ण मिशनचं 'अखिल भारतीय युवा संमेलन.'

¤

आसाममध्ये एका अनोख्या युवा संमेलनाचा अनुभव घेतल्यावर रामकृष्ण मिशनचं अखिल भारतीय युवा समेलन अनुभवण्यासाठी कलकत्त्यात पोचलो. सोबत दिलेल्या एका पत्रकानुसार गाड्या बदलत नरेंद्रपूर पोस्ट ऑफिसपाशी उतरलो. डावीकडे दारावर मोठी पाटी होती 'रामकृष्ण मिशन'. तिच्या शेजारून आत शिरलो तर एकदम वेगळ्या जगात प्रवेश केल्यासारखं वाटलं. कलकत्त्यातल्या गर्दीचा गदारोळ मागे पडला होता. इथे शांततेचा छान ध्वनी ऐकू येत होता. संध्याकाळचा वारा, पानांची सळसळ, मंदिरातल्या आरतीचा सूर या सर्वांनी मिळून हे जग निर्माण केलं होतं. आसपास कामं करणाऱ्या मुलांची लगबग चालली होती पण त्यानं आश्रमाच्या शांत, पवित्र हवेचा मेळ बिघडतोय असं वाटत नव्हतं मोठी मैदानं, आखीव रस्ते आणि मोठ्या मोठ्या वास्तू अशा काही बांधल्यासारख्या वाटत होत्या की, जणू हे सर्व भुईतून सहजच उगवून आलंय. दिवे, फोन्स्, गाड्या, दूरदर्शन ..सर्व उपस्थित होतं. पण माणसाच्या अस्तित्वावर ते स्वार झालं नव्हतं बाहेरचं नरेंद्रपूर गाव आणि आतला आश्रम यात ओझरचं खेडं आणि मिगओझर टाऊनशिप यात असावा तसा फरक जाणवत होता. दीडशे एकर पसरलेली ही जागा नरेंद्रपूरच्या महाराजाची, संस्थानिकाची त्यानं ती रामकृष्ण मिशनला देऊन टाकली. तिथे मिशननं शाळा, कॉलेज, वसतिगृह, गोशाळा, पोल्ट्री फॉर्म, मंदिर, ग्रामविकास योजना असं एक आगळंच राज्य वसवलं होतं इथं आपलं पूर्व तयारी शिबिर होणार आहे हे ऐकून बरं वाटलं.

बेलूरला होणाऱ्या युवा समेलनात ज्या विषयावर चर्चा, परिसंवाद योजले होते त्यांची आणि इतर कार्यक्रमांची तयारी करण्यासाठी हे तीन दिवसांचं पूर्वतयारी शिबिर योजलं होतं. त्याला भारतभरातून निवडक २०० युवक—युवती बोलवल्या होत्या पाठीवर रॅकसॅक, विस्कटलेले केस, मळके कपडे असं ध्यान घेऊन त्या पाटीशेजारून आत शिरलो तेव्हा ठिकठिकाणचे प्रतिनिधी येणं सुरू झालं. होतं टेबलामागे बसलेला एक तरुण त्यांना पटापट मार्गी लावत होता. माझं त्यानं नाव विचारलं, एका फायलीतले कागद उलटसुलट केले, माझ्या नावापुढे एक टिकमार्क केलं आणि छोट्या चिठोऱ्यावर दोन आकडे लिहून एका स्वयंसेवकाबरोबर जायला सांगितलं. त्यानं 'अखंडानंद भुवन' वरच्या खोलीत नेऊन सोडलं. तिथे पूर्वतयारी शिबिराचं वेळापत्रक लावलेलं होतं. पुण्यातच मिळालेल्या पत्रकावरून अंदाज आला होता की, एकूण कार्यक्रमाचं व्यवस्थापन उच्च दर्जाचं असणार. त्याची इथे प्रचीती यायला सुरुवात झाली. तेवढ्यात मागून कोणाचं तरी 'हॅलो' कानावर पडलं. 'सुमित्रो चॅटर्जी फ्रॉम वेस्ट बेंगॉल' —ओळखदेख.

पूर्वतयारी शिबिर सुरू झालं. पुढच्या दिवसांमध्ये व्यवस्थापनातली ही कार्यक्षम सफाई आणि झटापट होणाऱ्या ओळखी असं पूर्वतयारी शिबिर आणि नतर युवा समेलन रंगत गेलं.

पहिला कार्यक्रम होता एक फिल्म पहाण्याचा. रामकृष्ण मिशनचं दुसरं सर्वसाधारण समेलन १९८० साली झाल होत. त्याची ही डॉक्यूमेंटरी फिल्म होती. (या फिल्मचं एडिटिंग बिमल रॉय यानी केल होत.)

१९८० साली रामकृष्ण मिशनचं दुसरं समेलन झालं होतं. फिल्ममध्ये त्याच वर्णन ऐकताना इतिहासकालीन बौद्ध परिषदाची आठवण होत होती. त्या समेलनाला १२,००० प्रतिनिधी जगभरातून उपस्थित होते, स्वामी वीरेश्वरानंदाच्या नेतृत्वाखाली झालेल्या या संमेलनातच कल्पना ठरली की केवळ युवकाचे असे एक समेलन योजावे. त्या दृष्टीनं १९८३ मध्ये कामाला सुरुवात झाली होती. भारतातल्या रामकृष्ण मिशनच्या केन्द्राना आपापली विभागीय युवा समेलने योजण्यास सागितले होते. त्यातून प्रतिनिधींची निवड करून बेलूर मठात १९८४ मध्ये अखिल भारतीय युवा समेलन योजायचे अशी कल्पना होती. त्यानुसार कामाना सुरुवातही झाली होती. म्हणजे 'युवक वर्ष' जाहीर होण्यापूर्वीच हे संमेलन व्हायचे होते. ते स्थगित करून अखेर युवक वर्षाचाच मुहूर्त लाभावा ही सत्ताधारी मार्क्सवादी पक्षाची मेहेरबानी.

युवा समेलनाच्या सर्व सूचनांवर आधी १९८४ सालातल्या तारखा होत्या, त्या खोडून १९८५ करण्यात आल्या.

### CPM चा विरोध

१९८४ त होणाऱ्या या संमेलनाला CPM कडून विरोध झाला होता. पूर्वी १९७०-७१ मध्ये नक्सलवादी चळवळ जोरात होती तेव्हा त्याच एक खुलेआम उद्दिष्ट होत, बेलूर मठाची जागा ताब्यात घेऊन तिथे मार्क्सवादी-लेनिनवादी पक्षाचं अधिवेशन घ्यायच. नक्सलवादी चळवळ तर विरली; पण या उद्दिष्टाची नैतिक जबाबदारी CPM नं घेतल्यासारखी वागणूक रामकृष्ण मिशनला मिळत गेली. मिशनच्या पदाधिकारी स्वामी मडळीच्या मते... राजकारण्यांचा असा विरोध कॉंग्रेस कारकिर्दीतही होत असे. पण CPM च्या काळात तो वाढला कारण तो नुसता राजकीय विरोध राहिला नाही, परस्पर विरोधी तत्वज्ञानाचा सैद्धांतिक पाया या सघर्षाला होता. रामकृष्ण मिशनच्या शिक्षण सस्था ताब्यात घेण्याच्या दृष्टीनही CPM न पावलं टाकायला प्रारंभ केला. कलकत्त्याजवळ रोहरा या ठिकाणी मिशनचं मोठं शैक्षणिक कार्य आहे. तिथल्या महाविद्यालयाचे प्राचार्य असलेले स्वामी प्राचार्य पदासाठी लायक नाहीत आणि प. बगालच्या शैक्षणिक धोरणानुसार महाविद्यालयाच्या प्राचार्यांची नियुक्ती सरकार पॅनेलद्वारा व्हायला हवी, असा आग्रह CPM सरकारनं धरला. असं झालं तर यथावकाश सर्व संस्था CPM बळकावेल म्हणून रामकृष्ण मिशनन हायकोर्टात धाव घेतली. रामकृष्णाच्या विचारानुसार चालणारी ही संस्था 'धार्मिक अल्पसख्याकां'ची असून घटनेनं अल्पसख्यांकांना दिलेलं संरक्षण आम्हाला मिळायला हवं असा दावा रामकृष्ण मिशनन केला. हे प्रतिपादन कलकत्ता हायकोर्टानं उचलून धरलं आणि 'अल्पसंख्यांकां'च्या शिक्षणसंस्थांना असलेलं घटनात्मक सरक्षण रामकृष्ण मिशनच्या संस्थाना मिळालं. म्हणजे CPM चा एक हल्ला तर तूर्त परतवून लावला, पण तो पटावरच्या एका सोंगटीचा बळी देऊन. Statesman न मथळा दिला होता Ramkrisnaism is non-Hindu

या सर्व प्रकरणात त्या कॉलेजच्या प्राचार्यस्वामींना तीन दिवस अन्नपाण्याशिवाय अटकेत ठेवल होतं. मिशनची ब्रह्मचारी मंडळी कुजबुजत सागतात की थेट केंद्र सरकारच्या दबावामुळे अखेर स्वामीजी सुटले. या सर्व वार्ता बेलूरच्या हवेत होत्या. त्याना पडताळून पहाता आलं नाही. पण १९८४ मधे ठरून रद्द झालेल युवा समेलन १९८५ त झालं, याला केंद्र सरकारची भूमिका सहाय्यक होती. आपोआपच युवक वर्षाचा मुहूर्त लाभला. वर्षाचा प्रारंभ विवेकानदाच्या स्मरणाने झालाच होता. आता समारोप थेट त्याच्याच आवारात, त्याच्या विचाराच्या प्रकाशात देशप्रश्नाचा विचार करून होत होता. त्यासाठी भारतभरातून दहा हजाराहून जास्त युवक-युवती बेलूर मठात जमायचे होते. दोनशेजण नरेंद्रपूरला जमलेही होते.

### मिशनचं मनुष्य वैभव

सकाळी एका हॉलमध्ये सर्वजण बसले होते. उजव्या बाजूला स्त्रिया, डाव्या बाजूला पुरुष. सर्वजण शिस्तीत रागामध्ये बसलेले. बाहेर सर्वांच्या चपलाही नीट रागेत ठेवलेल्या. हे कोणी न सागता, सहजपणे समोर रंगमचवजा व्यासपीठावर वीसबावीस स्वामी बसलेले होते.

मिशनमध्ये येऊ इच्छिणाऱ्या युवकाला आधी २॥-३ वर्षं 'प्रोबेशन'वर ठेवल जातं. स्त्रियांसाठी शारदामाता पीठ आहे. अडीचतीन वर्षांनतर त्याची प्रगती वगैरे पाहून त्याला ब्रह्मचर्याची दीक्षा दिली जाते, किंवा परत जायला सागितलं जात. ज्याला दीक्षा दिली जाते त्यान पुढे ९ वर्षे एक कोर्स करायचा असतो. ('ब्रह्मचर्या'चा कोर्स या कल्पनेवर आमचे काही क्षण निर्मळ मजेत गेले. मग प्रचलित शैक्षणिक परिभाषेनुसार आम्ही त्याला 'बॅचलर ऑफ बॅचलर' अस नाव ठेवल. या हिशोबान स्वामी मंडळी 'मास्टर ऑफ बॅचलर इ. इ...) या ९ वर्षात त्यानं पांढरी वस्त्र परिधान करून वेद उपनिषदांबरोबरच आधुनिक शास्त्र-तंत्रज्ञानाच प्रशिक्षण घ्यायचं असत आणि मिशनचं दिल जाईल ते काम करायच असत. ९ वर्षानंतर ज्येष्ठ स्वामी त्या ब्रह्मचाऱ्याची गुणवत्ता ठरवतात. मग काही जणांना इथूनही किंवा ९ वर्षात मधे केव्हा तरी परतायला सांगितलं जातं. काही जणाना अजून काही काळ याच इयत्तेत काढायला लागतो तर काही जण सन्यासाची दीक्षा घेण्यास योग्य ठरतात. त्यांची मग पांढरी वस्त्रे जाऊन, भगवी वस्त्रे येतात. जुनं नाव जाऊन स्वामीपद मिळतं. म्हणजे नावात 'आनद' दाखल होतो. कोणत्याही नावाची फलश्रुती 'आनद'नं करणं ही कल्पना रम्य आहे. पण तिथपर्यंत पोचायला जे टप्पे पार करायला लागतात त्याला तुकारामानं म्हटलंय 'रात्रदिन आम्हा युद्धाचा प्रसंग'. रामकृष्ण मिशनकडे असे १२०० हून जास्त स्वामी संन्यासी आहेत. जगभरात १२० केन्द्रांमध्ये हे सर्व 'आनंद' फुललेले असतात.

रामकृष्ण मिशनच हे मनुष्य वैभव पाहाणं हाही उद्बोधक अनुभव

होता. संस्कृतचे पंडित, वेदोपनिषदाचे गाढे अभ्यासक, अगदी इंग्लिश भाषेवर हुकमत असणारे सन्यासी भेटले तर फारसं आश्चर्य नव्हतं. पण स्वामी ब्रह्मेशानंद, पूर्वीचे गायनॅकॉलॉजिस्ट डॉक्टर. चांगली प्रॅक्टिस सोडून भगव्या वस्त्रात विलीन झाले. स्वामी जितात्मानंद-फिजिक्स, त्यातही आईन्स्टाईनची थियरी आणि न्यूक्लियर फिजिक्स वरची त्याची हुकमत शास्त्रज्ञानीही मान्य केलेली. वेदांत आणि फिजिक्सचा मेळ घालून दाखवणारं चिंतन स्वामी जितात्मानंदाच्या लेखणीतून उतरतं. असे कितीतरी. कोणी पूर्वीचा चार्टर्ड अकौंटंट, कोणी वकील, शिक्षक, कोणी आपल्या आईवडिलांचा एकुलता एक मुलगा .. सगळे मार्ग एकाच ध्येयाप्रत येऊन पोचलेले 'आत्मनो मोक्षार्थं, जगद् हिताय च' बरं भगव्या वस्त्रातल्या या मानवांना हसण्याची अॅलर्जी नव्हती, नाही तर ध्येय, देश, वेदांत वगैरेच्या परिभाषेत बोलणारे बहुसंख्य जण कायम 'कळवण्यास-अत्यंत-दुःख होते की' असा चेहरा घेऊन वावरत बोलत असतात, कारण देशाचा जगाचा सगळा भार आपल्याच खांद्यावर आहे असा त्याचा आव असतो. आमचे मित्र त्याला म्हणतात 'ते देशाला खांदा देत असतात' पण ही स्वामी मंडळी पहावी तर कायम हसत, विनोद करत. त्यांचं सोवळं-ओवळंही माणस तोडणारं नाही. हा वारसा अर्थात स्वामी विवेकानंदानी दिलेलाच. तो वारसा जागरूकपणे जतन केल्यासारख्या स्वामी असक्तानंदांनी पूर्वतयारी शिबिराविषयी सूचना हसत-खेळत दिल्या. समेलनातल्या सर्व सत्राची तयारी करण्यासाठी गट ठरले. सहा विषयावर मुख्य चर्चा होत्या. यापैकी प्रत्येकानं कोणताही १ विषय निवडायचा होता. त्यानुसार २०० जणाची आपोआपच सहा गटात विभागणी झाली. सहा विषय होते जीवनातील मूल्याचे स्थान, राष्ट्रीय एकात्मतेसाठी युवक नेतृत्व, ग्रामीण विकासात युवकांचा सहभाग, जनसामान्यांच्या विकासासाठी युवकानी काय करायला हवे, गरीबी, जातीयता आणि निरक्षरता दूर करण्यासाठी युवक काय करू शकतात आणि युवा वर्गाच्या समस्या. प्रत्येक गटावर मार्गदर्शनासाठी दोन स्वामीजी येणार होते हे कळल्यावर मी समोरच्या व्यासपीठावर बसलेले सर्व स्वामी एकदा पाहून घेतले. एक प्रसन्न चेहरा उगीचच आवडला. हे स्वामी आपल्या गटावर मार्गदर्शक म्हणून यावेत असं वाटलं. मग आमचा 'राष्ट्रीय एकात्मतेसाठी युवक नेतृत्व' चा गट नेमलेल्या हॉलमध्ये निघाला तेव्हा तेच स्वामी पुढे झाले 'कम ऑन लीडर्स' म्हणत. सुखद योगायोगाची गमत वाटली हे स्वामी गौतमानंद. ऋषीचं कूळ विचारू नये तसं स्वामी मंडळीच वय विचारू नये स्वामी गौतमानंदांच्या वयाचा काही अंदाज बांधता येत नव्हता, पण मध्यमवयीन असावेत. अरुणाचल प्रदेशामध्ये अलाँग या ठिकाणी रामकृष्ण मिशनचं काम ते चालवितात. तिथे मुख्यत. शैक्षणिक स्वरूपाचं काम आहे. ते आम्हाला घेऊन संबंधित हॉलकडे निघाले तसा सहजच हात जोडून नमस्कार केला, तर त्यांचा हात शेकहॅंडसाठी पुढे झाला. पुढच्या काही दिवसांमध्ये जेव्हा जाणवलं की, स्वामीजीचे पाय नमस्कारासाठी हक्कानं डोकं टेकवून घेण्यासाठी पुढे होतात, तेव्हा शेकहॅंडसाठी पुढे झालेल्या या हातातली हृद्यता अधिकच जाणवली. लोकानी डोकं टेकणं हा आपल्या पायाचा अघोषित हक्कच आहे असं मानणाऱ्या भगव्या वस्त्रांच्या सुजलेल्या अहंकाराची शुश्रुषा करण हे काही मी आपलं कर्तव्य मानलं नाही पण स्वामी गौतमानंदाशी नातं निर्माण झाल्यावर एकदाच, संमेलनाहून परतताना, त्यांच्या पायावर डोकं ठेवायला बरं वाटलं. मधे पूर्वतयारी शिबिर आणि युवा संमेलन हे दहा दिवस मात्र त्यांच्याशी दोस्तीत गेले भारतातल्या बहुतेक सर्व भाषा त्यांना येतात. अनेक ठिकाणी आणि प्रत्यक्ष लोकामध्ये मिसळून काम केल्यामुळे त्यांच्या विचाराना झापडं नाहीत, कुणीला कर्मकांडाची चौकट नाही. आमच्या गटाचे दुसरे मार्गदर्शक स्वामी पराशरानंदही असेच. ते रामकृष्ण मिशनच्या ब्रह्मचाऱ्यांच्या ट्रेनिंग सेंटरचे प्राध्यापक आहेत आमच्या गटाची तयारी करून घेताना काही वेळा काही जणाना त्यानी हक्कानं फटकारलं सुद्धा, पण त्यात कुठे विषारी दंश नव्हता त्यामुळे मस्त हसत खेळत परिसंवाद, चर्चा आणि प्रश्नोत्तर सत्राची तयारी झाली असंच इतर पाच गटाचं झालं असावं, अशी आशा बाळगायला जागा आहे. कारण युवा समेलनातले हे सहाही परिसंवाद चांगल्या गुणवत्तेचे झाले. अशीच तयारी तीन सिंपोझियम्सची करून घेण्यात आली. त्याचे विषय होते विवेकानंद आणि राष्ट्रीय एकात्मता, विवेकानंद आणि आधुनिक युवक, विवेकानंद आणि मनुष्य घडणीचे कार्य. विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या युवकानाही पूर्वतयारी शिबिरात 'टेस्ट' देण्यात आली.

## युवकांचा प्रतिसाद

पूर्वतयारी शिबिराला आणि नतर युवासमेलनाला ९, १० वी तल्या मुलामुलींपासून पदव्युत्तर शिक्षण, सशोधन करणाऱ्यापर्यंतचे युवक उपस्थित होते. त्यात इंजिनियर्स, डॉक्टर्स, प्राध्यापक, वकील, सुशिक्षित बेकार हे सर्व प्रकार होते. शेतकरी युवक हा प्रकारच थोडा कमी दिसला. पश्चिम बंगाल आणि बिहारच्या ग्रामीण भागातून काही युवक आले होते तेवढेच. जम्मूकाश्मिर सोडून सर्व प्रांताचे प्रतिनिधी होते. त्यामुळे समेलनावरून एक नजर फिरवली तरी भारतातल्या सर्व वेशभूषाच फॅन्सी ड्रेस समेलन दिसायचं. धोतर, लुंगी, जीन्स, स्टोनवॉश, कुडते, पंजाबी ड्रेस, साड्या. हाही प्रत्येक वेश परिधान करायची प्रत्येक प्रांताची स्टाईल वेगळी. कपाळावर भस्मापासून टिकलीपर्यंतची व्हरायटी. रस्त्याच्या एका टोकाकडून दुसऱ्या टोकाकडे सावकाश चालत गेल की रेडिओ स्टेशन्स् बदलल्यासारख्या वेगवेगळ्या भाषा कानावर पडायच्या. गप्पा मारणाऱ्याची वेगवेगळी टोळकी बनलेली असायची, त्यात केरळचा वल्लभन् महाराष्ट्रातला नितीन, इंदुरचा अशोक अत्रे, कलकत्याचा देवाशीष बॅनर्जी, श्रीलंकेची मंगलम् लक्ष्मणन्, बांगला देशचा तरुण चक्रवर्ती, बंगलोरची अनुराधा अशी 'विविधतेत एकता'. त्यात NTR आणि सत्यसाईबाबापासून बर्नाला आणि दहशतवाद्यापर्यंत आणि पोपच्या भेटीपासून ते CPM च्या बाराव्या कॉंग्रेसपर्यंत सर्व विषयांवर स्वैर सचार चालू असायचा. अध्यात्माबद्दल उत्सुकता असायची पण भाबड्या अंधश्रद्धा अन् नमस्कार चमत्काराचा धिक्कार असायचा.

मिशनच्याच काही ज्येष्ठ स्वामींना अशी चिंता वाटत होती की तरुण पिढी कुचकामी निपजतेय अशी चिंता सर्वच 'ज्येष्ठां'ना वाटत असते, त्याला स्वामी मंडळी अपवाद नाही. मग काही तरुण स्वामीनी हा आग्रह धरला की, तरुण पिढीचे काही गंभीर, चिंता-

जनक प्रश्न आहेत हे खरं आहे पण म्हणून सगळी पिढीच बरबाद झालीय असा निष्कर्ष काढण्याच कारण नाही उलट त्या उगवत्या पिढीची सर्जनशीलता ही असामान्य आहे. प्रत्यक्ष युवकाशी ज्याचा जवळून सबध येतो अशा स्वामीनीही–माझे ज्याच्याशी समेलनात निकटचं नातं निर्माण झालं ते स्वामी गौतमानंद आणि स्वामी तन्मयानंद यातले–याला दुजोरा देऊन सागितल की युवा समेलनाला मिळालेला प्रतिसाद हे तरुण पिढीतल्या आशादायी चैतन्याच निदर्शक आहे. स्वामी लोकेश्वरानदानीही बोलून दाखवलं की आयुष्याच्या एका टप्प्याला आम्ही जवळ जवळ निराशेनं निष्कर्ष काढला होता की, तरुण पिढी काही कामाची नाही. पण आज दहा हजाराहून जास्त युवकांचा हा मेळा पाहिला की आमचा निष्कर्ष चुकीचा ठरतोय याचा आनद होतोय. स्वामी गौतमानद अरुणाचल प्रदेशमध्ये काम करतात. त्यानी ज्येष्ठ स्वामीशी हा मनःपूर्वक विश्वास बोलून दाखवला होता की जशा समस्या वाढत चालल्यात तशी त्याच्याशी पैजेवर टक्कर घ्यायला उभं रहाणाऱ्या तरुणाची संख्याही वाढते आहे. रामकृष्ण मिशनच्या ब्रह्मचारी तरुणाना प्रशिक्षण देणाऱ्या स्वामी पराशरानदानाही असाच विश्वास वाटत होता. सध्या अनेक सघटनाना, विधायक कार्यांना नवीन भरतीची चणचण भासत असते. आमच्याकडे तरुण येत नाहीत अशी त्याची तक्रार असते. उताराला लागलेले हे सर्व कार्यकर्ते मग उदासपणे कार्याचा गाडा ढकलत असतात. हा प्रश्न रामकृष्ण मिशनला जाणवतो का अशी चौकशी केली तर बऱ्याच काळानं उलट उत्तर देणारी व्यक्ती भेटली. स्वामी प्रभानद यानी म्हटले, आमच्याकडें ब्रह्मचारी सन्यासी होऊन विधायक कार्यात दाखल होऊ इच्छिणाऱ्या तरुणांची संख्या वाढते आहे. युवा मानस आमच्यापासून दूर पळतय असं आम्हाला मुळीच वाटत नाही. त्यांच्या म्हणण्यात तथ्यांश होता हे उपस्थित युवकाची सख्या आणि उत्साह यात दिसतच होतं.

## फुललेला बेलूर मठ

२३ डिसेंबरला नरेंद्रपूरचं पूर्वतयारी शिबिर सपलं. तिथून कलकत्ता, हावडा ब्रिज पार करून बेलूर मठात पोचलो. सर्व दृश्य अधिकच रंगतदार बनल. मठाकडे जाणाऱ्या रस्त्यावर सुमारे दोनदोनशे मीटर्सच्या अतरावर तीन कमानी उभारलेल्या होत्या. तिन्ही कमानीच्या ठीक मधे ओकार होता आणि स्तभावर क्रूस, चादतारा. (विळा–कोयतासुद्धा हवे होते.) प्रत्येक कमान उभी करायला स्थापत्य कलेतली वेगवेगळी 'स्कूल्स' वापरली होती. एक कमान मंदिराची, एक मशिदीची, एक चर्चची. मठातल्या मध्यवर्ती मदिराच्या बाधणीतही अशीच समन्वयाची दृष्टी बाळगलेली होती. मठात शिरण्यापूर्वी उजव्या हाताच्या छोट्या मैदानात रामकृष्ण–विवेकानंद चरित्रावरच एक प्रदर्शन उभं केल होतं. त्याला लागूनच Youth Fair होती. एरवी अत्यत शात, तरंगहीन असणारा बेलूर मठाचा परिसर गजबजून गेला होता. शेकडोंच्या सख्येनं युवक–युवती येऊन ओतले जात होते. मोटारी, बसेस, ट्रक्सची वर्दळ चालू होती पण सपूर्ण दृश्यात कुठे बेशिस्त दिसत नव्हती. मुख्य आवाराबाहेर कँटिन्स्, दुग्धालय आणि 'पूछताछ'च काऊटर. त्या काऊटरवर प्रश्नाची उत्तरं मिळत होती. Youth Convention च्या ऑफिसमध्ये मोठ्या अर्धवर्तुळाकार काऊटर्सवर प्रत्येक प्राताची व्यवस्था लावलेली. महाराष्ट्राच्या काऊटरवर जाऊन माझ्या नावाची इंग्लिशमधनं चौकशी केली तर काऊटरमागच्या ब्रह्मचाऱ्यान मराठीत उत्तर देऊन एक छोटासा गोड धक्का दिला. त्या त्या प्रांताच्या काऊटरमागे ती ती भाषा बोलणारा हसरा ब्रह्मचारी उभा केलेला होता. त्याला नाव सागून पावती दाखवली की त्याच्या रजिस्टरवरच्या आपल्या नावापुढे खूण करून तो हातात एक छोटस पुडकं ठेवायचा. त्यात प्रतिनिधी क्र., रहायची जागा, पुढच्या सहा दिवसाच्या चहा, नाश्ता, जेवणाचे पासेस आणि 'तीर्थयात्रे'चा बिल्ला अस मिळायच सर्व निवासी प्रतिनिधींची व्यवस्था परिसरातच असलेल्या शाळा–वसतिगृहामध्ये केलेली होती. शाळांच्या इमारतीमधल्या चौकामधेही तबू उभे केले होते आणि महाराष्ट्राचे सर्व प्रतिनिधी ट्रेकिंग करीत असणार हे गृहीत धरून त्याची व्यवस्था तबूत केलो होती. सहा हजार निवासी प्रतिनिधी होते आणि साडेसहा हजार अ–निवासी अनिवासी प्रतिनिधीच्या पासेसची वेगळी व्यवस्था केलेली होती. याही व्यवस्थेत कुणाला काही अडचण आली तर मदत करायला स्वयसेवक तैनात होते आणि ठिकठिकाणी ब्रह्मचारी, स्वामी मडळी जाऊन काय हवनको बघत होते.

रामकृष्ण मिशनच्या भारतभरातल्या केंद्रांमधून निवडक स्वामी लोक समेलनासाठी मुद्दाम बोलवून घेण्यात आले होते. ते आपापल्या प्राताच्या प्रतिनिधींची नीट व्यवस्था लावून देत होते. मग बेलूर मठाच्या मुख्य आवारात मदिराभोवती एकूण पाच मोठें पँडॉल्स उभे केलेले होते–दोन जेवणाचे आणि तीन कार्यक्रमाचे. ते असे काही उभारलेले होते की मुख्य मदिराची शान बिघडत नव्हती, उलट वाढतच होती. पार्किंगपासून छत्रीव्यवस्थेपर्यंत शेकडो बारीकसारीक बाबींचा सूक्ष्म विचार करून समेलनाची तात्रिक उभारणी केल्याचं लक्षात येत होतं. सुरक्षा व्यवस्थाही होती पण ती प्रत्येकाच्या कातडीला येऊन ठोसत नव्हती. प्रत्येक प्रतिनिधीचा बिल्ला दरवेळी मठात येताना तपासला जायचा पण त्यात कुठे उद्धटपणा नव्हता. समेलनाचे सहाही दिवस ही व्यवस्था क्षणभरही शिथिल झालेली दिसली नाही. संध्याकाळ झाली तसा सपूर्ण परिसर दिव्यानी झगमगू लागला. पण त्यात डोळ्यांना खुपेल असा भगभगीतपणा नव्हता. दिनक्रमाची आखणीही अशी केली होती की कार्यक्रम आणि मोकळा वेळ याचा पुरेसा तोल राखला जाईल. दिवसाच सभा, परिसंवाद किंवा चर्चेचो दोन सत्र मिळून ४॥–५ तासाचं काम होत. आणि रोज तास दीड तासाचा मनोरजनाचा कार्यक्रम होता. 'तीर्थयात्रा'-पदयात्रा तेवीस डिसेंबरच्या सध्याकाळी असं सर्व तैय्यार स्थितीत होत. नवा दिवस उगवला की युवा समेलनाचा दिवा तेवायला प्रारभ होणार. शेजारून वहाणाऱ्या गगेच्या विशाल पण काळघाशार पात्रानं वातावरणाला एक मस्त नैसर्गिक प्रवाहित्व आल्यासारख वाटत होतं.

## शोधबोधाचे प्रश्न

चार प्रश्न आणि त्याच्या उत्तरांचे विविध पर्याय या स्वरुपात या युवा समेलनाचा विचार करता येईल चार प्रश्नाचं महत्त्व त्यांच्या अनुक्रमानुसार वाढत जात. प्रत्येक पुढचा प्रश्न आधीच्या प्रश्नाचीच पुढची पायरी आहे आणि प्रत्येक प्रश्नाचं उत्तर आधीच्या प्रश्नाच्या उत्तरावर अवलबून आहे हेच प्रश्न संपूर्ण वर्षभर युवक वर्षानिमित्त झालेल्या प्रत्येक उपक्रमाला विचारता येतील.

प्रश्न पहिला —समेलनाला आलेले युवक 'का' आले होते ?प्रश्न दुसरा — आलेल्या युवकाचा सहभाग कोणत्या प्रकारचा होता ? प्रश्न तिसरा – युवा समेलनाला येऊन त्यानी काय मिळवलं आणि चौथा, अर्थातच सर्वात महत्त्वाचा प्रश्न – परत आपापल्या ठिकाणी गेल्यावर हे युवक काय करणार आहेत ?

संमेलनाला भारत भरातून आले होते उणेपुरे बारा हजार पाचशे युवक मुलमुली. यात बागला देश, श्रीलका आणि सिंगापूर इथलेही काही प्रतिनिधी होते हे सर्वजण स्वत च्या खर्चानं, स्वत च्या इच्छेन आले होते. त्यानी समेलनाला याव यासाठी कोणतीही सवलत रेल्वे-भाड्यातली सोडून–देण्यात आली नव्हती, कोणतंही प्रलोभन–बेलूर मठात विवेकानंदाच्या विचाराच्या सान्निध्यात सहा दिवस घालवायचेत, एवढ सोडून–दाखवण्यात आल नव्हती. कोणतही प्रशस्तीपत्रक नाही, बक्षिस नाही, उपस्थिनी राहण्याबद्दल शाबासकी वगैरे काही नाही म्हणजेच येणारा प्रत्येकजण काही किमान विचार करून, किमान गाभीर्यानं आला असणार हे गृहित धरायला हव. तरीसुद्धा गमत करायला, सहलीला आल्यासारखे अनेकजण होते, या अनेकाची त्याच्या येण्याच्या उद्देशाशी सुसगत अशीच पुढच्या तीन प्रश्नाची उत्तर आहेत. त्याचा सहभाग नाश्ता, चहा, जेवण, गप्पा, गंगेतून नावेनं प्रवास आसपासच्या प्रेक्षणीय स्थलाना भेटी आणि अगदीच कधी वेळ झाला तर एखाद्या चर्चासत्राला हजेरी लावण इतकाच असणार. अशानी 'काय मिळवल' आणि 'परतल्यावर ते काय करणार' असले प्रश्न विचारून आपण त्याना उगीच त्रास द्यायला नको, ते प्रश्न त्याच्या बाबत अप्रस्तुत आहेत.

## बॅशॅम आणि राजा रामण्णा

युवासंमेलनाचा चेहरा काही अशा युवकानी आखला नाही. त्यामुळे त्याचा 'डिस्काऊट' दिल्यानतर खूप मोठी सख्या अशी रहाते की जे मन पूर्वक आले होते काही जणाना उत्सुकतेनं इथपर्यंत आणलं होतं, पाहू तर खर काय असतं युवा समेलन म्हणजे. अनेकांना विवेकानदाचं नाव, बेलूर मठाची जागा यानी खेचून आणल होतं. अन् अखेर काही अल्पसख्याक' असे होते की ज्याना त्याच्या सारख्याच तरुणांचा शोध घ्यायचा होता. असे तरुण की ज्यानी विवेकानदांच्या विचाराशी नात जोडल आहे अन् जे शब्दापाशी थाबायला तयार नाही, त्यांना कृतीची दिशा शोधायची आहे. ती कदाचित या युवक समेलनात सापडेल असं त्याना वाटत होतं. त्रिचूरचा मुरली वल्लभन्, हैद्राबादचा श्रीधरन्, इदूरचा प्रदीप पाल, कलकत्याचा सुव्रतो मुखर्जी ही दोस्त मंडळी या शेवटच्या पथातली भेटली. स्वामी लोकेश्वरानंद म्हटले होते. 'विवेकानदानी तुम्हाला बोलवलं, ती हाक तुम्हाला नाकारता आली नाही. त्याच्या चैतन्यानं तुम्हाला इथे खेचून आणलं. युवकांवर विवेकानदाचा प्रचंड विश्वास आहे. तो विश्वास सार्थ ठरवण्याची जबाबदारी तुम्ही झटकून टाकू शकला नाहीत म्हणून तुम्ही इथपर्यंत आलात.' यातली गूढ काव्यमयता सोडून देऊ पण प्रत्येकाला त्याच्यात्याच्या जीवनात कुठेतरी विवेकानद अशा रितीन भेटले होते की बेलूर मठात युवा समेलनाला येण्यावाचून त्यांना राहवलं नाही.

युवा समेलनासाठी नाव नोदणी आधीच्या वर्षी १९८४ मधेच सुरू झाली होती. पण पुष्कळ काळ पुरेसा प्रतिसाद मिळेना. संयोजकाना १०,००० युवक प्रतिनिधीची अपेक्षा होती ती पुरी होईल असं दिसेना. मग युवक वर्ष उजाडले. विवेकानदाची जयंती–१२ जाने. हाच 'राष्ट्रीय युवक दिन' साजरा झाला. कदाचित यानं बदल घडवून आणला. अचानक युवकपिढीला स्वामी विवेकानंदाचा शोध लागल्यासारखा नोंदणीला प्रतिसाद मिळत गेला. वर्षभर भारतात ठिकठिकाणी ज्या प्रमाणात 'युवक वर्ष' साजरं करणारे कार्यक्रम होत गेले त्या प्रमाणात नावनोंदणीचा प्रतिसाद वाढत गेला. जणू सगळ्या युवक वर्षांचा सकलित समारोप बेलूर मठात या सहा दिवसातल्या समेलनाच्या रुपानं मोजला असावा असं झाल. १० हजार हा आकडा तर कधीच पार झाला. अखेर १२,००० सख्येनतर सयोजकानी पाटी लावली 'नोदणी बद करण्यात आली आहे' बेलूर मठाच्या परिसरात ते १०,००० जणाचीच व्यवस्था करू शकत होते. त्याहून सख्या फार वाढवली असती तर सर्व व्यवस्था कोलमडून पडली असती, म्हणून काही केंद्राना त्याची प्रतिनिधी सख्या कमी करायला सुचवण्यात आलं. रामकृष्ण मिशनच्या शिलाँग केंद्रातून २५० जणाची नोंदणी करण्यात आली होती. 'सर्व नाही तर कोणीही नाही' असा या केन्द्रान 'स्टँड' घेतला. अखेर शिलाँगहून एकही प्रतिनिधी येऊ शकला नाही. प्रत्यक्ष एकूण उपस्थित युवक प्रतिनिधी होते, १२,५००.

बाराहजारावर प्रतिनिधी होते हे यशाच एक गमक ठीक आहे. पुढचा प्रश्न हा आहे की आलेल्याचा सहभाग काय होता ? जे पूर्वतयारी शिबिराला होते त्याचा सहभाग अधिक सक्रीय, भर घालणारा होता. चर्चा, परिसवाद, प्रश्नोत्तर सत्रे आणि विविध गुणदर्शन यात त्याचा सहभाग होता. असा सर्वांचाच सहभाग व्यवहारात अशक्य होता त्यामुळे उरलेल्या हजारो युवकांकडे मुख्यतः श्रवण-भक्तीचं काम होत प्रश्नोत्तराच्या खुल्या सत्रात स्वामी रंगनाथानदानी एकदा सागितल की समेलनातला प्रत्येक युवक नवविद्या भक्तीपैकी तीन प्रकारानी भक्ती करत असतो श्रवण : तुम्ही भाषण इ ऐकता, चिंतन . तुम्ही विचार करू शकता, भाषणांमधले विचार तुम्ही आधळेपणानं स्वीकारत अगर टाकत नसणार, त्यावर चिंतन करता आणि स्मरण : हे विचार तुम्ही लक्षात ठेवणार आहात. विविध गुणदर्शनाचे कार्यक्रम, शिवताडवम्, बॉडी शो, योगासने प्रात्यक्षिके, स्वामी विवेकानंदाच्या जीवनावर हैद्राबादच्या युवकानी सादर केलेले सुरेख नाटक हे सर्व पहाताना सर्व प्रतिनिधी रंगून गेले होते. असा सहभागही कार्यक्रमाची चव वाढवणारा असतो. रोज सध्याकाळी झालेल्या या मनोरञ्जनपर कार्यक्रमामध्ये युवकानी रमून जाऊन सहभाग घेतला यात आश्चर्य नव्हत. पण काही वैचारिक स्वरुपाची सत्रं इतकी अप्रतीम झाली की त्यानी युवकांना ती त्रिविध भक्ती शिकवली असणार. एक भाषणसत्र होत पाहुणे व्याख्यात्यांचं त्यात भारताच्या इतिहासाचे तज्ज्ञ, विशेषत: प्राचीन भारताच्या इतिहासवरची जगन्मान्य व्यक्ती, Wonder That Was India हे पुस्तक लिहिणारे A. L. Basham (ऑक्फोर्स ब्रिटिश) राजा रामण्णा आणि इतरांची व्याख्यानं होती.

पृष्ठ २४ वर

# स्वतःला कसे छळावे ?



लेखक : कि. मो. फडके, एम. ए., एफ. आय. आर. इ. टी. (न्यूयॉर्क), डायरेक्टर, फडके सेंटर, मुंबई

## निद्रानाशाचा वर

**विश्वास :** प्रथमच मी तुम्हाला असे सांगतो की, 'फडके सेंटर' मध्ये येऊन मी आजपर्यंत जे काही शिकलो आहे, त्याचा मला पुष्कळच फायदा झालेला आहे.

**मी :** म्हणजे तुझा वेळ व पैसा या दोन्ही गोष्टी सत्कारणी लागत आहेत तर ?

**विश्वास :** अर्थात !

**मी :** तुझ्या या बोलण्यामुळे मला साहजिकच समाधान वाटते आहे परंतु तू जो अभ्यासक्रम शिकत आहेस, त्यामुळे तुझ्या प्रत्यक्ष वर्तनात खरोखरच अनपेक्षित अशी सुधारणा होत आहे ना ?

**विश्वास :** त्याबद्दल तुम्ही शंकाच मनात आणू नका आजकाल दिवसाचा बहुतेक वेळ मी संताप, चिंता, अपराधी भावना व विषण्णता यांच्या अधीन जाऊन स्वतःला नानाप्रकारे छळून घेण्यात प्रवीण झालो आहे. परंतु माझ्या मनात एक अस्सल बावनकशी चिंताही याक्षणी धुमाकूळ घालीत आहे. ती चिंता मी बोलून दाखवू का ?

**मी :** (हसत हसत) अगदी अवश्य बोलून दाखव. म्हणजे मलाही समजेल की स्वतःच्या मनात नव्या नव्या चिंता निर्माण करण्याचे कौशल्य तू कितपत वृद्धिगत केले आहेस.

**विश्वास :** ( चाचरत चाचरत ) मी स्वतःला छळून घेण्यात आता अगदी कसबी कारागीर झालो आहे असे जरी मला वाटत आहे, तरी या क्षेत्रातील दुसऱ्या काही मातब्बर बुजुर्गांशी स्वतःच्या प्रगतीची तुलना करून पाहिल्याशिवाय माझ्या यशाबद्दल ग्वाही कशी देता येईल, या चिंतेने मी अगदी जेरीस आलो आहे.

**मी :** (आनंदातिशयाने) गड्या, तू बाजी मारलीस खरी ! स्वतःला छळून घेण्याच्या क्षेत्रातील तू केवळ एक कसबी कारागीर नाहीस, तर एक अष्टपैलू कलावंत आहेस; पण तुझ्या म्हणण्याचा रोख तरी काय आहे, हे मला सांगितलेस तर बरे होईल.

**विश्वास :** ( उत्साहित होऊन ) म्हणजे मला असे म्हणावयाचे आहे की, तुमचे जे इतर शिष्य आहेत त्यांची व माझी गाठ पडली, तर स्वतःला हैराण करून घेण्याच्या कलेतील माझ्या प्रगतीचा अजमास मला अधिक वस्तुनिष्ठपणे घेता येईल. आणि म्हणून मी तुम्हाला अशी सूचना करतो की, आपण 'फडके सेंटर'च्या सर्व आजी व माजी शिष्यांचे संमेलन आयोजित करू या.

**मी :** (मोठ्याने हसून) तुझी सूचना अप्रतिम आहे, यात संशय नाही. पण त्यात एकच अडचण आहे.

**विश्वास :** ( अधीर होऊन ) त्यात अशी कोणती अडचण आहे ?

**मी :** ती अडचण मी तुला जरूर सांगतो. परंतु तू प्रथम मला असे सांग की, काल रात्री तुला झोप कशी काय लागली होती ?

**विश्वास :** (बावचळून जाऊन)...म्हणजे ...तुम्ही हा काय प्रश्न काढलात ?

**मी :** (निग्रही मुद्रेने) प्रथम मी विचारलेल्या प्रश्नाचे निमूटपणे उत्तर दे.

**विश्वास :** काल रात्री मला चांगली व भरपूर झोप मिळाली...पण

**मी :** (खुनशी मुद्रेने) मग असे समज की, ती तुझी शेवटचीच झोप होती.

**विश्वास :** ( दचकून जाऊन ) म्हणजे ? तुम्ही हे काय बोलत आहात ? आणि तुमच्या या बोलण्याचा व 'फडके सेंटर'च्या सर्व आजी माजी शिष्यांचे संमेलन भरविण्याच्या माझ्या सूचनेचा संबंध तरी काय ?

**मी :** ( मोठ्याने हसून ) अरे वेडपट तरुणा, माझे सर्व शिष्य माझा हा अद्वितीय अभ्यासक्रम पूर्ण करून स्वतःला छळण्याच्या कलेत इतके तरबेज झाले आहेत की, ते सतत स्वतःला छळून घेत बसत असल्यामुळे त्यांना रात्री झोपसुद्धा मिळत नाही. मग त्यांना संमेलनास येण्यास कसे जमेल ?

विवेकनिष्ठ मानसोपचारतज्ज्ञ आपल्याकडे आलेल्या व्यक्तीवर उपचार करताना ज्या शेकडो तंत्रांचा अवलंब करतो त्यापैकी एक म्हणजे विरोधाभास (Paradox). विरोधाभासाचा आश्रय घेऊन सुप्रसिद्ध लेखक श्री. डॅन ग्रीनबर्ग यांनी तर एक पुस्तकच लिहिले आहे. त्या पुस्तकाचे नाव आहे How to make yourself miserable. सामान्य वाचकाला आपल्या मानसिक आरोग्याची काळजी घेण्याच्या दृष्टीने हे पुस्तक उपयुक्त आहे.

'स्वतःला कसे छळावे' ही लेखमाला लिहिताना लेखक श्री. फडके यांना डॅन ग्रीनबर्ग यांच्या पुस्तकाने स्फूर्ती मिळत गेली पण यातील लिखाण मात्र त्यांच्या प्रत्यक्ष अनुभवाचे आहे. या लेखमालेचे मुख्य सूत्र विरोधाभास (Paradox) हे आहे आणि मानसिक आरोग्याविषयी मार्गदर्शन करणे हे याचे उद्दिष्ट आहे.

मागील दोन अंकात या लेखमालेचे एकूण सहा लेखांक प्रसिद्ध झाले होते. या अंकी शेवटचे दोन लेखांक.

---

**विश्वास :** ( आश्चर्यचकित होऊन )... त्यांनी या क्षेत्रात इतकी प्रचड प्रगती केली असेल, याची मला कल्पना नव्हती.

**मी :** (समजूत घालण्याच्या आविर्भावाने) म्हणूनच मी तुला सांगतो की, तुझी प्रगती जरी उत्तम झालेली आहे तरी तुला अजून खूप दूरचा पल्ला गाठावयचा आहे

**विश्वास :** (चिताग्रस्त होऊन) ...आणि तो पल्ला म्हणजे...

**मी :** ( छद्मी हास्य करून ) तो पल्ला म्हणजे स्वतःला छळण्याच्या कलेत तू इतके नैपुण्य सपादन केले पाहिजेस की, तुला आजपासून आयुष्यभर निद्रानाशाचा रोग जडला पाहिजे.

**विश्वास :** ( घाबरून जाऊन ) . आजपासून...निद्रानाशाचा रोग...?

**मी :** ( विकट हास्य करून ) अर्थात ! म्हणून तर मी तुला सांगितले की, काल रात्री तुला जी गाढ व भरपूर झोप मिळाली, ती शेवटचीच !

**विश्वास :** ( भयभीत होऊन ) म्हणजे तुम्ही आता येथे करणार तरी काय आहात?

**मी :** ( दिलासा देण्याच्या सुरात ) असा घावरू नकोस. मी तुला काहीच करणार नाही. मात्र मी तुला जे अपूर्व ज्ञानदान करणार आहे, त्याच्या उपयोगाने तुला स्वत ला इतके छळून घेता येईल, की तुला आजपासून निद्रानाशाचा रोग जडेल, अशी खात्री बाळग.

**विश्वास :** (उत्तेजित होऊन) मग उशीर नको. बोला, मी काय करू ?

**मी :** (धिम्या सुरात) पहिली गोष्ट अशी लक्षात ठेव की, तू आजपावेतो ज्या गोष्टींबाबत चिंता, राग, विषण्णता इत्यादी भावनांचे कल्लोळ तुझ्या मनात निर्माण करून स्वत'ला छळून घेत होतास, त्या सर्व गोष्टी बेभरवशाच्या आहेत !

**विश्वास :** ( आवाक होऊन ) म्हणजे काय ?

**मी :** तुझ्या अनुभवातील उदाहरण घेऊन सांगतो, म्हणजे तुला माझा मुद्दा नीट पटेल. हे बघ, तू तुझ्या कचेरीत उशिरा गेलास, कामाकडे दुर्लक्ष केलेस, कामात चुका केल्यास त्या वेळी तुझी अपेक्षा काय होती ?

**विश्वास :** (अडखळत अडखळत)...त्या वेळी माझी अपेक्षा अशी होती की, माझे वरिष्ठ अधिकारी माझी कानउघडणी करतील व मग मी स्वत ला व त्यांना दूषणे देत बसून माझा खूप छळ करून घेईन.

**मी** . आणि प्रत्यक्ष काय झाले ?

**विश्वास :** (हताश सुरात) प्रत्यक्ष माझे वरिष्ठ अधिकारी फारच सौजन्यशील व पापभीरू गृहस्थ असल्यामुळे त्यानी माझी कोणत्याही रीतीने कानउघडणी वगैरे केलीच नाही. आणि परिणामी माझा डाव फसला !

**मी :** म्हणूनच मी म्हणतो की, स्वतःला छळून घेण्याच्या कामात तुला स्वावलंबी झाले पाहिजे.

**विश्वास :** (दचकत दचकत) याचा अर्थ मी...

**मी :** ( हुकूम दिल्याच्या आविर्भावाने ) याचा अर्थ तू स्वतःच्या .मनात चिंता, विषण्णता, द्वेष, खेद, इत्यादी भावनांची वादळे उत्पन्न करण्यासाठी असा विषय निवडला पाहिजेस की, जो फक्त तुझ्याच नियंत्रणाखाली आहे.

**विश्वास :** ( गोंधळून जाऊन ) असा कोणता विषय आहे ?

**मी :** असा एक खात्रीलायक विषय आहे. आणि तो म्हणजे तुझी प्रकृती !

**विश्वास :** (घाबरून जाऊन)...पण... मला काहीही झालेले नाही.

**मी :** (विकट हास्य करून) आज तुला काहीही झालेले नाही, असे आपण गृहीत धरू पण उद्या, नाही या क्षणानंतर, तुझ्या प्रकृतीत बिघाड होणार नाही, अशी ग्वाही तुला देता येईल ?

**विश्वास :** ( काळवंडलेल्या चेहऱ्याने ) नाही...अशी ग्वाही कशी देता येईल ?

**मी :** ( रोखलेल्या नजरेने ) म्हणजेच तुला काहीही होऊ शकेल तुला हृदयविकाराचा झटका येऊन तू येथेसुद्धा मरून पडणे अशक्य आहे ?

**विश्वास :** (कमालीचा अस्वस्थ होऊन)

.. नाही... त्यात अशक्य असे काहीच नाही.

**मी :** ( दटावणीच्या सुरात ) आणि आजही तुला काही झालेले नाही, असे तू मला कोणत्या आधारावर सांगतो आहेस ?

**विश्वास :** (चाचरत चाचरत)...म्हणजे माझी प्रकृती अगदी खडखडीत बरी आहे हो.

**मी :** (उपहासाने हसून) असे तुला वाटते आहे. परंतु खरोखरच तुझ्या प्रकृतीत आजही काही बिघाड झालेला नाही. याला पुरावा काय ?

**विश्वास :** (अडखळत अडखळत) पुरावा म्हणजे...आज मला कसलाही त्रास होत नाही.

**मी :** (कपटी हास्य करून) तुला त्रास होत नसेलही. परंतु आज तुझी वैद्यकीय तपासणी केली, तर त्या तपासणीतून तुझ्या शरीरात तुला अज्ञात असणाऱ्या रोगाने प्रवेश केलेला आहे असा निष्कर्ष निघणार नाही, याची काय खात्री ?

**विश्वास :** ( हातरुमालाने कपाळावरचा घाम पुसून)...नाही...तशी काहीच खात्री नाही म्हणा...

**मी :** (डाव जिंकल्याच्या अविर्भावाने ) म्हणजे शास्त्रीय दृष्टिकोनातून पाहता, तुझ्या प्रकृतीच्या बाबतीत तू एकूण अंधकारातच आहेस, असे म्हणता येईल की नाही ?

**विश्वास :** (थरथरत्या ओठांनी).. तसेच म्हणावे लागेल...पण तुम्ही आज हे काय नसते लचांड निर्माण करून ठेवीत आहात ?

**मी :** (मख्खपणे) मी कोणतेही लचांड निर्माण करीत नसतो मी माझ्या शिष्यांना आपल्या मनात असंख्य लचांडे निर्माण करून स्वतःला छळून काढण्यास शिकवीत असतो.

**विश्वास :** (चाचरत चाचरत) ते बरोबर आहे. पण आताच माझ्या मनात माझ्या तब्येतीबद्दल नाही नाही त्या शंकाकुशंका निर्माण होऊ लागल्या आहेत, त्याचे काय ?

**मी :** (आनंदी मुद्रेने) फारच उत्तम ! आता मला फक्त इतकेच सांग की, ज्या विषयी तुझ्या मनात नको नको त्या चिंता उत्पन्न होऊ लागल्या आहेत, तो विषय तुला कधी दगा देणे शक्य आहे काय ?

**विश्वास :** (काळजीच्या सुरात) नाही... कारण मनात आणीन, तर मी माझ्या तब्येती-विषयी केव्हाही, कोठेही व कितीही वेळ स्वतःला चिंताग्रस्त करून घेऊ शकेन.

**मी :** ( समाधानाचा सुस्कार सोडून ) शिवाय, या विषयाचा मुख्य फायदा म्हणजे तो पूर्णतः तुझ्या अमलाखाली आहे म्हणजे तुझ्या प्रकृतीविषयी असंख्य शंका उत्पन्न करून स्वत.ला छळून घेण्यासाठी तुला दुसऱ्या कोणावर अवलंबून राहण्याची गरज नाही.

**विश्वास :** (उमज पडल्याचा आविर्भाव करून) होय. कारण माझी तब्येत हा विषय माझ्या मृत्यूपर्यंत कोणी माझ्या डोक्यातून काढून घेऊ शकणार नाही.

**मी :** (उत्साहित होऊन) म्हणजेच मी तुला आज स्वतःला छळून घेण्याच्या कलेत स्वावलंबी कसे व्हावे ते शिकविणार आहे. स्वावलंबनाचा हा धडा तुला नीट समजला, की तुला आज रात्री झोप येणे शक्यच नाही.

**विश्वास :** (भारावून जाऊन) या कलेत स्वावलंबनाने इतकी मजल मारता येत असेल, याची मला कल्पनाही नव्हती.

**मी :** (थंड नजरेने) तुझे शरीर आज कोणत्या रोगाने व किती पोखरलेले असेल, याचीतरी तुला कोठे कल्पना आहे ?

**विश्वास :** (रडवेला होऊन) पण आज मला माझ्या प्रकृतीत तसा कोणताच बिघाड जाणवत नाही हो !

**मी :** (संतप्त सुरात) माणसाच्या शरीरात एखाद्या रोगाने ठाण मांडले असले, तरी त्या माणसाला या गोष्टीचा अनेक दिवस पत्ताही नसण्याची शक्यता तुला मान्य आहे की नाही ?

**विश्वास :** (चाचरत चाचरत) ... मला मान्य आहे...कारण माझ्या एका मित्राच्या वडिलांचा रक्तदाब वाढलेला होता, याचा त्यांना पत्ताच नव्हता ! आणि एका वैद्यकीय तपासणीच्या वेळी ती गोष्ट उघड झाली, तेव्हाही त्यांना मात्र त्या वाढलेल्या रक्तदाबाचे कोणतेच परिणाम जाणवत नव्हते.

**मी :** शक्य आहे. कधीकधी माणसाला आपले डोळे अधू आहेत, हेसुद्धा माहीत नसते. आपल्याला जे दिसते, तसेच नैसर्गिकपणे सर्वांना दिसते असा समज असतो. पण चुकून कधी...

**विश्वास :** ( उतावीळ होऊन ) चुकून कधी त्याच्या डोळ्याची परीक्षा झालीच, तर त्याला समजते, की आपल्या नाकावर चांगल्या मोठ्या भिंगाचा चष्मा चढविण्याची गरज आहे.

**मी :** ( निगरगट्टपणे ) मग आज तुझे शरीर कर्करोगाने कशावरून पोखरलेले नाही ?

**विश्वास :** ( बोबडी वळून ) बापरे ! तुम्ही हे काय बोलता ?

**मी :** (उपहासगर्भ सुरात) का ? 'तुला कधीही कर्करोग होणार नाही', असे हमीपत्र ब्रह्मदेवाने तुला तुझ्या जन्माच्या वेळी लिहून दिले होते की काय ?

**विश्वास :** (किंचित हसून) छे ! छे ! तसे कोणतेही हमीपत्र मला जन्माच्या वेळी मिळालेले नव्हते.

**मी :** मग तुझ्या शरीरात कर्करोगाने शिरकाव कशावरून केलेला नाही ?

**विश्वास :** (रुमालाने कपाळावरचा घाम पुसून)...पण मी तसा अगदी सुदृढ प्रकृतीचा तरुण माणूस आहे हो ..

**मी :** (संतापून जाऊन) मूर्खासारखे परत तेच उत्तर काय देतोस ? कित्येक व्यक्तींच्या बाबतीत त्यांना कर्करोग झालेला आहे असे निदान करण्यात येते, तेव्हा त्यांच्या शरीरात त्यापूर्वीच त्या प्राणघातक रोगाने प्रवेश केलेला असतो, असे आढळून येते ना ?

**विश्वास :** (भयभीत होऊन) ... ते खरे आहे...पण...

**मी :** (उपहासाने हसून) पण तुझ्या बाबतीत असे कधीही होणार नाही, असे तुला म्हणावयाचे आहे काय ?

**विश्वास :** (कावराबावरा होऊन) छे ! छे ! तसे कसे म्हणता येईल ?... पण एकदम कर्करोग म्हणजे...

**मी :** (निष्ठुरपणे) अर्थात कर्करोगाने तुझे शरीर पोखरलेले असण्याची शक्यता आहे, असे मी फक्त उदाहरणादाखल म्हणालो. आणखीही अनेक तऱ्हेच्या विचित्र रोगांनी कमीअधिक प्रमाणात तुझ्या प्रकृतीची छुप्या मार्गांनी विल्हेवाट लावावयास सुरुवात केली असण्याची शक्यता काही मी नाकारीत नाही.

**विश्वास :** (थरथरत्या ओठांनी) अनेक तऱ्हेचे विचित्र रोग...प्रकृतीची विल्हेवाट... तुम्ही किती अभद्र शब्दप्रयोग करीत आहात.

**मी :** ( दिलगिरी व्यक्त करण्याच्या आविर्भावाने ) माझे शब्दप्रयोग तुझ्या कानांना कटू लागत असतील, तर मी बोलणे

थांबवितो. पण मी बोलणे थांबविले म्हणून काही...

विश्वास : (उतावीळ होऊन) ...माझ्या शरीरात घुसलेले रोग आपले विहितकार्य करण्याचे थांबणार नाहीत, असेच तुम्हाला म्हणावयाचे आहे ना ?

मी : (सोज्वळ चेहऱ्याने) मी अधिक बोलून तुला उगीच कशाला दुखवू !

विश्वास : नाही... म्हणजे माझ्या प्रकृतीची काही शंभर टक्के खात्री देता येत नाही, हे उघडच आहे पण मग मी करू तरी काय ?

मी : याचे उत्तर सोपे आहे मला सांग, तुझी स्कूटर नादुरुस्त झाली असावी असे तुला वाटले तर तू काय करतोस ?

विश्वास : काय करतो म्हणजे ? अर्थात मी माझी स्कूटर माझ्या मेकॅनिककडे घेऊन जातो

मी : मग तुझी प्रकृती शंभर टक्के निर्दोष आहे, असा भरवसा तुला वाटत नसेल, तर...

विश्वास : तर मी डॉक्टराच्याकडे जाऊन माझ्या प्रकृतीची तपासणी करून घ्यावी, असेच की नाही ?

मी : (उपहासगर्भ सुरात) हे उत्तर एखादे शेंबडे शाळकरी पोरसुद्धा देईल !

विश्वास . (खट्टू होऊन) म्हणजे ? या प्रश्नाला दुसरे कोणते उत्तर असू शकते ?

मी : अरे, प्रकृतीच्या प्रश्नाला कधी उत्तर नसते ! प्रकृतीच्या प्रश्नामुळे नेहमी अधिक प्रश्न उद्भवतात व त्यामुळे माणसाला अनंत मार्गांनी स्वत:ला छळून घेता येते.

विश्वास : (गांगरून जाऊन) मला नाही समजत तुम्ही काय म्हणता ते... माझ्या तब्येतीविषयी मला खात्री वाटत नसेल, तर मी डॉक्टरांकडे जाऊन माझ्या प्रकृतीची तपासणी करून घ्यावी, याबद्दल आणखी कोणते प्रश्न उद्भवतात ?

मी : (कुत्सित हास्य करून) अरे अभागी तरुणा, या पृथ्वीच्या पाठीवर किती वैद्यकीय पद्धती प्रचलित आहेत, याची तुला काही कल्पना आहे काय ?

विश्वास : (बुचकळ्यात पडून) वैद्यकीय पद्धती ? म्हणजे...

मी : होय पद्धती ! म्हणजे असे बघ, मीच निदान चार-पाच पद्धतींचे नावे ऐकलेली आहेत ॲलोपथी, आयुर्वेद, होमिओपथी, युनानी, इलेक्ट्रोहोमिओपथी ही केवळ मी ऐकलेली नावे ! म्हणून म्हणतो, तू कोणत्या डॉक्टराकडे जाणार ?

विश्वास : मी आमच्या फॅमिली डॉक्टरांकडे जाईन आणि ते ॲलोपथीचा अवलंब करतात.

मी : तू त्यांच्याकडेच का जाशील ? तुला जे काही रोग झालेले असतील, त्याची संपूर्ण व अचूक चिकित्सा ॲलोपथीच्या पद्धतीने करता येईल व तुला जे काही रोग झाल्याचे आढळून येईल, त्याच्यावर इतर वैद्यकीय पद्धतीमार्फत अधिक गुणकारी औषधोपचार करता येणार नाही, अशी तुझी खात्री आहे काय ?

विश्वास : (वैतागून जाऊन) नाही तसे नाही... पण... मग मी काय करावे ? का मी सर्व तऱ्हेच्या डॉक्टराकडे जाऊन माझी प्रकृती तपासून घ्यावी ?

मी : (गंभीर सुरात) तुला तसेही करता येईल. कदाचित त्यामुळे तुझा थोडा अधिक वेळ मोडेल व तुझे अधिक पैसे खर्च होतील. पण...

विश्वास : (निश्वास टाकून) पण निदान माझ्या प्रकृतीची उत्तम रीतीने तपासणी होईल ! आणि जर माझ्या शरीरात काही रोगांनी शिरकाव केलेला असेल, तर ती गोष्ट पूर्णपणे उघडकीस येईल.

मी : (मोठ्याने हसून) महामूर्ख आहेस !

विश्वास : (खजिल होऊन) म्हणजे सर्व तऱ्हेच्या डॉक्टराकडून माझ्या प्रकृतीची तपासणी केल्यावरही माझ्या शरीरात ठिय्या देऊन बसलेल्या सर्व रोगाचे निदान होणार नाही ?

मी : (थंड नजरेने) उलट प्रत्येक तपासणीच्या वेळी तुला झालेल्या किंवा होणाऱ्या रोगाची इतकी उलटसुलट माहिती उजेडात येईल, की शेवटी कोणाकडून व कसा उपचार करून घ्यावा, हेच तुला समजणार नाही.

विश्वास : (आवंढा गिळून) म्हणजे माझा तळीराम होईल, असे म्हणा की !

मी : (संतप्त होऊन) बेअकली तरुणा, तळीरामाचे ठीक आहे. तो म्हणजे नाटकातील एक पात्र ! नाटक संपले की तो सुटला ! पण तुझे कसे होणार ?

विश्वास : (हबकून जाऊन) तेही बरोबर आहे मी काही नाटकात काम करीत नाही. मी प्रत्यक्ष जीवन जगतो आहे...

मी : (रोखलेल्या नजरेने) मग तू काय करायचे ठरविले आहेस ?

विश्वास : मला वाटते मी प्रथम आमच्या फॅमिली डॉक्टराकडे जाऊन माझी प्रकृती तपासून घेतो... काहीच न करता असे दिवस वाया घालविण्याऐवजी निदान काही तरी केल्याचे समाधान तरी मला मिळू दे.

मी : (सोज्वळ चेहऱ्याने) पाहा बुवा ! नीट विचार करून काय ते कर.

विश्वास . म्हणजे ? मी आमच्या फॅमिली डॉक्टरांकडेही न जाता असेच दिवस वाया घालवू ?

मी : (मानभावी सुरात) ते आपले तुझे तू ठरव. मी तुला इतकेच सांगून ठेवतो, की काही लोक आपली वैद्यकीय परीक्षा करून घेतात व मग पस्तावतात ..

विश्वास · (घाबरून जाऊन) वैद्यकीय परीक्षा करून घेऊन माणूस कसा काय पस्तावतो ?

मी (सोज्वळ सुरात) अरे त्या वैद्यकीय तपासणीतून माणसाला जेव्हा असे दिसून येते की, आपल्याला अमकातमका प्राणघातक रोग झाला आहे, तेव्हा त्याला वाटू लागते की आपण वैद्यकीय परीक्षाच करून घ्यावयास नको होती. अज्ञानात होतो, ते बरे होते !

विश्वास : (अस्वस्थ होऊन) हेही म्हणणे काही अगदीच चूक नाही... छे ! मी आता मात्र पुरता भोवऱ्यात सापडलो आहे.

मी : (कीव करण्याच्या सुरात) इतक्यात तुझी अशी दशा झाली ?

विश्वास : म्हणजे तुम्ही मला आणखी कोणते विश्वरूपदर्शन घ्यावयास लावणार आहात ?

मी : छे ! छे ! मी फक्त तुला काही संभाव्य धोक्याची पूर्वसूचना देण्याचा प्रयत्न करीत आहे. अरे, तू वैद्यकीय तपासणीपूर्वीच असा संभ्रमात पडला आहेस, मग तुझ्या रोगाचे निदान होऊन तुला जेव्हा नाना तऱ्हेचे औषधोपचार करून घ्यावे लागतील किंवा एखाद्या अवघड शस्त्रक्रियेस तोंड द्यावे लागेल ..

विश्वास : (काकुळतीच्या सुरात) नका हो

असे काही बोलू .. शिवाय, माझ्या प्रकृतीची अगदी सर्वतोपरीने कसून तपासणी झाल्यावर कदाचित असाही निष्कर्ष निघेल की माझी प्रकृती अगदी ठणठणीत आहे.

**मी :** (शांत सुरात) अवश्य ! मी कधी नाही म्हटले ! कदाचित तसाही निष्कर्ष निघू शकेल.

**विश्वास :** (उत्तेजित होऊन) म्हणजे मग सर्वच प्रश्न निकालात निघतील की नाही ?

**मी :** (छद्मी हास्य करून) हा मात्र तुझा भ्रम आहे. कारण तू एक सिद्धांत विसरतो आहेस. तो म्हणजे, प्रकृतीविषयीच्या कोणत्याही प्रश्नांना कधी उत्तरे नसतात. त्या प्रश्नांतून अधिक प्रश्न निर्माण होत असतात.

**विश्वास :** (आश्चर्यचकित होऊन) अहो पण माझी प्रकृती अगदी निकोप आहे असा निष्कर्ष सुदैवाने निघाला, तर त्यातून पुढे कोणते प्रश्न उद्भवणार ?

**मी :** (कुत्सित हास्य करून) हेच तुझे गाढ अज्ञान ! तुझी प्रकृती आज निकोप आहे असे दिसून आले, म्हणून उद्या ती ढासळणार नाही ?

**विश्वास :** (अवढा गिळून) बरे हा झाला पहिला प्रश्न. दुसरा एखादा प्रश्न उद्भवणे शक्य आहे काय ?

**मी :** (डाव जिंकल्याचा आविर्भाव करून) नाही ! हा झाला दुसरा प्रश्न !

**विश्वास :** (अस्वस्थ होऊन) ...मग पहिला प्रश्न कोणता ?

**मी :** (खुनशी नजरेने) पहिला व मूलभूत प्रश्न असा की, जे डॉक्टर तुझ्या प्रकृतीची तपासणी केल्यावर तुझे शरीर सुदृढ आहे असा तुला आवडणारा निष्कर्ष काढतील, त्यांनी आपले काम चोख केले आहे असे समजण्यास कोणता आधार आहे ? डॉक्टर लोक म्हणजे काय ब्रह्मदेव असतात ? त्यांच्या हातून कधी चुका होत नाहीत ?

**विश्वास :** (थरथर कापत खोलीबाहेर जाताना) ...पुरे ....पुरे... आता मला निदान निद्रानाशाचा रोग तरी नक्कीच जडला आहे. ◻

---

# आनंदापासून संरक्षण

---

**विश्वास :** (खिन्न मुद्रेने) आज मी 'फडके सेंटर' मध्ये आलो आहे, तो केवळ तुमचा निरोप घेण्यासाठी...

**मी :** म्हणजे काय ? आज तुला शेवटचा पण अत्यंत महत्त्वाचा धडा शिकवायाचा आहे, हे तू विसरलास की काय ? स्वत:ला छळून काढण्याची विद्या मी माझ्या शिष्यांना आठ धड्यात देत असतो हे तुला माहीत आहे आणि तू सर्व अभ्यासक्रमाची फीसुद्धा भरलेली आहेस.

**विश्वास :** (अवघट चेहरा करून) ते सर्व मला पूर्ण माहीत आहे..पण मी आजपर्यंत जे सात धडे शिकलो आहे त्यामुळे मी स्वत:ला रात्रंदिवस इतका उच्छाद आणीत आहे की, आता तुमच्याकडून आणखी आठवा धडा शिकण्याची काही गरज आहे, असे मला वाटत नाही.

**मी :** (समाधानाचा सुस्कारा टाकून) बरे तर बरे तू निदान निरोप घेण्यासाठी आज आला आहेस. माझ्या इतर काही शिष्यांनी माझे तोंडच पाहिलेले नाही.

**विश्वास :** (उत्सुकतेच्या सुरात) का बरे ? त्यांना हा अभ्यासक्रम परिणामकारक वाटला नाही काय ?

**मी :** (मोठ्याने हसून) छे ! छे ! उलट पहिले सात धडे गिरविल्यावर त्यांना तुझ्याप्रमाणेच असा पोकळ आत्मविश्वास वाटू लागला की आपण शेवटचा धडा शिकण्याची अजिबात आवश्यकता नाही आणि म्हणून ते कधी आठवा धडा शिकण्यासाठी आलेच नाहीत.

**विश्वास :** (दिलासा मिळाल्याच्या आविर्भावाने) . मलाही आज सकाळपासून नेमके तसेच वाटत होते. कारण मी स्वत:ला पीडण्याच्या, हैराण करण्याच्या व संत्रस्त करण्याच्या कलेत इतका पटाईत झालो आहे की, शिकण्यासारखे आणखी काही नवीन ज्ञान या क्षेत्रात उपलब्ध असेल, असे मला वाटत नाही; परंतु निदान निरोप घ्यावा म्हणून मी आज येथे आलो आहे.

**मी :** तू येथे आला आहेस, हे चांगलेच आहे...पण प्रथम मला असे सांग की, माझ्याशी तू इतक्या गर्विष्ठपणे बोलावयास आज कसा धजावतो आहेस ?

**विश्वास :** (अपराधी मुद्रेने) माफ करा ...मी काही तुमच्यापुढे बढाई वगैरे मारण्याच्या उद्देशाने बोललो नाही. परंतु खरोखरच मी अलीकडे स्वत:ला छळून इतका बेजार करून घेत असतो की, आता या कलेतील आणखी नवीन तंत्रे तुम्ही मला सांगितलीत तरी त्यांचा उपयोग कधी करावा, असा प्रश्न माझ्यापुढे उभा राहील.

**मी :** (रोखलेल्या नजरेने) तू आजपर्यंत शिकलेल्या तंत्रांचा अवलंब करून खरोखरच स्वत:ची अशी दैना करून घेतली आहेस काय ?

**विश्वास :** ( मोठ्या अभिमानाने ) अर्थात ! मी आत्मस्तुती करण्याच्या उद्देशाने बोलत नाही पण वस्तुस्थिती अशी आहे की, मला या कलेत अमर्याद रस वाटू लागला असल्यामुळे स्वत:ला हैराण करण्याची काही तंत्रे माझी मीच शोधून काढली आहेत.

**मी :** छान ! तू स्वत:च शोधून काढलेले एखादे तंत्र उदाहरण म्हणून सांगशील, तर मला तुझ्या मर्दुमकीची कल्पना येईल.

**विश्वास :** ...स्वत:ला आनंदाचा किंवा सुखाचा स्पर्श होऊ नये म्हणून मी कधी चांगले व पोटभर जेवत नाही शिवाय, जेवण करताना मी माझी मन:स्थिती इतकी चिडचिडलेली राखतो की, मी जे काही चार घास खातो ते माझ्या अंगी लागताच कामा नयेत.

**मी :** (उल्हासित होऊन) वत्सा, स्वत:ला पिडून घेण्याच्या या कलेत तू अशी सर्जनशीलता दाखवावीस, हे 'फडके सेंटर' ला भूषणास्पदच आहे.

**विश्वास :** (उत्तेजित होऊन) म्हणून तर मला वाटते की, मी आठवा धडा शिकण्याची मुळी काही गरजच उरलेली नाही.

**मी :** (गंभीर सुरात) तुझा हा निष्कर्ष मात्र निखालस चूक आहे !

**विश्वास :** (सचिंत मुद्रेने)... पण शेवटच्या धड्यात तुम्ही मला असे काय नवीन शिकविणार आहात की, ज्यामुळे ..

**मी :** (धिम्या सुरात) नाही. या अभ्यासक्रमातील शेवटच्या म्हणजे आठव्या धड्यात नवीन असे काहीच नाही ..पण

**विश्वास :** ( उतावीळ होऊन ) पण पूर्वीच्या सर्व धड्यांची उजळणी आहे, असेच ना ?

मी : नाही. आठव्या घड्याचे स्वरूप थोडेसे वेगळे आहे.

विश्वास : (गोंधळून जाऊन) असे आहे तरी काय या शेवटच्या घड्यात ?

मी : (रोखलेल्या नजरेने) तू पटकीच्या किंवा विषमज्वराच्या रोगाची प्रतिबंधक लस कधी टोचून घेतली आहेस ?

विश्वास : (बावचळून जाऊन) हो ... घेतली आहे...पण त्याचा माझ्या मनातील शंकेशी काय संबंध आहे ?

मी : (मोठ्याने हसून) आज मी तुला कोणतेही नवे तंत्र शिकविणार नाही. आज मी तुला फक्त एक प्रतिबंधक लस टोचणार आहे.

विश्वास : (भयभीत होऊन) प्रतिबंधक लस ? ही काय भानगड आहे ?

मी : भानगड वगैरे काही नाही ! पटकी किंवा विषमज्वर या रोगांना प्रतिबंध करण्यासाठी डॉक्टर जेव्हा तुझ्या शरीरात लस टोचतात, तेव्हा ते काय भानगड करीत असतात ?

विश्वास : ( ओशाळवाण्या चेहऱ्याने ) नाही...मला तसे नाही म्हणावयाचे ... पण...

मी : मग डॉक्टर काय करीत असतात ?

विश्वास : मला वाटते ती लस टोचून डॉक्टर माणसाची प्रतिकारशक्ती वाढवीत असतात...त्यामुळे माणूस पटकीच्या किंवा विषमज्वराच्या रोगाच्या जंतूंशी वगैरे यशस्वीपणे मुकाबला करून आत्मसंरक्षण करू शकतो.

मी : ठीक आहे. आता माझ्या या असामान्य अभ्यासक्रमातील शेवटचा घडा म्हणजे माझ्या शिष्याच्या मनात असे विचार पेरून ठेवणे की, ज्यामुळे त्याना अभ्यासक्रम संपल्यानतर या रंगीबेरंगी व मायावी दुनियेला शरण न जाता स्वत:ला सदैव हैराण करून घेता यावे.

विश्वास : (उमज पडल्याचा आविर्भाव करून)...याचा अर्थ.. मी आजवर जे काही शिकलो आहे त्यावर या जगातील नानाविध मोहाचा व ममताळू माणसांचा विपरीत परिणाम होऊ नये म्हणून तुम्ही मला काही सूचना देणार आहात...

मी : (खूष होऊन) होय ! माणसाने मरेपर्यंत आनंदापासून व सुखापासून आत्मसंरक्षण कसे करावे, हे मी शेवटच्या घड्यात शिकवीत असतो. आणि म्हणूनच माझे जे शिष्य या अभ्यासक्रमातील सात घडे शिकतात, पण आठवा आणि शेवटचा घडा शिकत नाहीत, त्याची मोठी परवड होते.

विश्वास : (काळजीच्या सुरात) ...... म्हणजे नेमके त्याचे काय होते ?

मी : मला नक्की माहीत नाही...पण मी असे ऐकतो की असे अर्धशिक्षित लोक कालांतराने प्रवाहपतित होऊन, आपल्या आयुष्याचे श्रेयस विसरून, केवळ प्रेयसाच्या मागे लागतात. व स्वत:चा अध:पात करून घेतात.

विश्वास : (केविलवाणा चेहरा करून) तुमचे आताचे बोलणे जरा क्लिष्ट आहे... त्यामुळे तुमच्या बोलण्याचा अर्थ मला नीट समजला आहे असे मला वाटत नाही...

मी : ( संतापून जाऊन ) मठ्ठ तरुणा, माझ्या अभ्यासक्रमातील शेवटचा घडा न शिकलेले माझे शिष्य काही दिवसांनी आपले खुशाल आनंदी व सुखी आयुष्य जगू लागतात. आता समजले मला काय म्हणावयाचे आहे ते ?

विश्वास : ( नि:श्वास सोडून ) होय ! आता छान समजले ! पण त्यांची अशी अवनती का हो ?

मी : (गंभीर सुरात) कारण ते जेव्हा माझ्याकडे येईनासे होतात, तेव्हा या जगातील मोह त्याना आपल्याकडे खेचून घेऊन त्याच्या निश्चयाचे केव्हा मातेर करून टाकतात, ते त्याचे त्यांनाही कळत नाही. बोल, तुलाही तुझ्या प्रगतीवर असा बोळा फिरवावयाचा आहे काय ?

विश्वास : छे ! छे ! माझे अंतिम ध्येय म्हणजे स्वत:ला आमरण छळून घेणे. म्हणून मी तुम्हाला शपथपूर्वक सांगतो की, आज मी जर येथे आलो नसतो तर कदाचित मीही थोड्या दिवसानी अधोगतीच्या मार्गाकडे खेचला गेलो असतो.

मी : ( डाव जिंकल्याच्या समाधानाने ) मग आता काय करावयाचे ? तू माझा निरोप घेणार की,...

विश्वास : ( निग्रही मुद्रेने ) मी तुमचा निरोप घेणार; पण तो आजचा शेवटचा घडा शिकल्यानतर ! तेव्हा तुम्हाला जी काही लस माझ्या मेंदूत टोचावयाची असेल, ती बिनदिक्कत टोचा.

मी : (नि:श्वास टाकून) एकूण तू वळणीवर आलास, हे स्वागतार्ह आहे. आता मी काय सागतो ते खुल्या मनाने ऐक व समजावून घे.

विश्वास : तुम्ही मला जे काही सांगाल, ते मी करीन. कारण मला आनदाच्या किंवा सुखासमाधानाच्या वाटेलासुद्धा जावयाचे नाही.

मी : (समजूत घालण्याच्या सुरात) अरे, तुला ज्या वाटेला जावयाचे नाही, त्या वाटेकडेच या समाजातील अनेक माणसे, संघटना, संस्था किंवा चालीरीती तुला खेचून नेण्याचा प्रयत्न करतील, हे ओळखून तू काही गोष्टीविषयी खबरदारी घ्यावयास हवीस.

विश्वास : ...पण मी ठाम निश्चयाचा तरुण आहे; मला कसली भीती ?

मी : कबूल ! त्याबद्दल आता माझ्या मनात कोणतीच शका नाही. पण या दुष्ट जगातील काही माणसे एखादा समारंभ, काव्यशास्त्रविनोदाची बैठक, संगीताची मैफल, करमणुकीचे कार्यक्रम इत्यादी गोष्टी आयोजित करून, तुला खुलवून, भुलवून तशा धोकादायक घटनाकडे खेचण्यात असुरी आनंद मानतील, हे विसरू नको.

विश्वास : ( आत्मविश्वासदर्शक सुरात ) त्याची मला अजिबात काळजी वाटत नाही. कारण गेल्या काही आठवड्यात माझ्यावर असे अनेक हल्ले झाले; पण ते सर्व हल्ले मी माझ्या फक्त मारक्या म्हशीच्या नजरेने परतवून लावले !

मी : (खूष होऊन) तू माझा एक बुद्धिमान शिष्य आहेस खरा ! पण तुला एक इशारा देऊन ठेवतो. तो म्हणजे मारक्या म्हशीच्या नजरेने इतराकडे पाहणे हे तंत्र प्रभावी असले, तरी त्याचे सामर्थ्य मर्यादितच आहे.

विश्वास : ( संभ्रमात पडून ) का बरे ? आजपर्यंत मी त्या तंत्राचा अवलंब करून, सर्व तऱ्हेच्या आनदोत्सवापासून दूर राहण्यात संपूर्ण यशस्वी झालो आहे.

मी : (छद्मी हास्य करून) शक्य आहे ! पण आनदोत्सवाचे वेगवेगळे प्रकार असतात, हे विसरू नको.

विश्वास : ( सचिंत मुद्रेने ) ते मला

माहीत आहे; परंतु लग्नसोहळा, वाढदिवस, जलसा इत्यादी अनेक तऱ्हेच्या आपत्तींपुढे मी कधीच डगमगणार नाही.

**मी** : कारण तू ज्यांचा उल्लेख केलास ती संकटे फारच चिल्लर स्वरूपाची असतात. पण या समाजात असे काही आनंदोत्सव असतात की ज्यावेळी एखादा माणूस सुतकात असेल त्यावेळीही काही कारस्थानी लोक त्याला खावयास काही गोडधोड पाठवून त्याच्या मनातील खिन्नता नाहीशी किंवा निदान कमी करण्याचा प्रयत्न करतात व त्याला एकाकी वाटून देत नाहीत.

**विश्वास** : ( गोंधळून जाऊन ) तुम्ही कोणत्या आनंदोत्सवाबद्दल बोलता आहात ते.....

**मी** : ( दटावणीच्या सुरात ) मी तुझ्या मार्गातील सर्वात मोठ्या अडचणीबद्दल बोलतो आहे आणि ती अडचण म्हणजे दिवाळीचा सण !

**विश्वास** : (थोडा विचार करून) दिवाळीचा सण ही माझ्या मार्गातील सर्वात मोठी अडचण आहे खरी ! कारण त्या सणाच्या वेळीही मी सुतक्यासारखे बसून स्वतःला छळून घेण्याचे माझे अंगीकृत कार्य निष्ठेने करीत राहिले पाहिजे.

**मी** : ( सोज्वळ सुरात ) बघ रे बाबा, दिवाळीच्या वेळी प्रसंग मोठा बाका असतो ! पहिली गोष्ट म्हणजे दिवाळी किंवा नाताळ यांच्यासारख्या सणात असंख्य माणसे आपला धर्म अथवा पंथ विसरून सामील होत असतात.....

**विश्वास** : ( चिंतातुर होऊन ) त्यामुळे माझ्या बुद्धिचातुर्यावर मोठा ताण पडण्याची शक्यता निर्माण होईल, असेच तुम्हाला सुचवावयाचे आहे ना ?

**मी** : (उपहासगर्भ सुरात) तुझ्या बुद्धिचातुर्यावर ताण पडणारी ही झाली एक गोष्ट !

**विश्वास** : ( अधिकच चिंतातुर होऊन ) ...आणखी कोणत्या गोष्टी दिवाळीच्या वेळी माझ्यावर नको त्या आपत्ती लादू शकतील ?

**मी** : (बेफिकिरीच्या आविर्भावाने) दिवाळीच्या दिवसात आणखी किती तरी गोष्टी तुला मार्गच्युत करून तुझा नायनाट करू शकतील. त्यांच्यापैकी दोन म्हणजे त्या आनंदो-




त्सवाचा काळ व त्यामधील वैचित्र्य ! प्रत्यक्ष दिवाळीचा सण दोन किंवा तीन दिवस असू शकतो; परंतु कावेबाज लोक त्या सणाची पूर्वतयारी किती तरी अगोदरपासून करू लागतात व दिवाळी संपून गेल्यावर किती तरी दिवस ते त्या आनंदाच्या वातावरणात मश्गूल राहतात....

**विश्वास** : (चिंतातुर होऊन) म्हणजे... माझ्यापुढे फार मोठे संकट 'आ' वासून उभे आहे तर !

**मी** : ( सोज्वळ सुरात ) एवढ्याने काय झाले आहे ? दिवाळीच्या निमित्ताने शाळा-कॉलेजांना जवळ जवळ तीन-चार आवडे सुट्टी असते. मग मुले फटाके वाजवितात. आकाशदिवे करतात, नाचतात, बागडतात.

**विश्वास** : (भयभीत होऊन) बापरे ! या संकटाचे स्वरूप माझ्या कल्पनेपेक्षा किती तरी भयंकर आहे !

**मी** : (रोखलेल्या नजरेने) शिवाय, नवे कपडे व नव्या महागड्या वस्तू विकत घेणे, एकमेकांना भेटणे, भेटीदाखल काही वस्तू देणे घेणे, बहिणीने भावाला ओवाळणे, बायकोने नवऱ्याला ओवाळणे आणि नाना तऱ्हेच्या गोड व रुचकर पदार्थांचे सेवन करणे...

**विश्वास** : (कानांवर हात ठेऊन)...पुरे पुरे ! माझे कसे होणार अशा भीषण प्रसंगी? तरी बरे माझे लग्न झालेले नाही. त्यामुळे मला बायकोने ओवाळण्याचा तरी प्रश्न नाही !

**मी** : ( छद्मी हास्य करून) त्या एका विचित्र पद्धतीचे शुक्लकाष्ट तुझ्यामागे लागलेले नाही, हे खरे. पण बाकीच्या शत्रूंचे काय ?

**विश्वास** : (काकुळतीला येऊन) ...अहो, पण दिवाळी वर्षातून एकदाच येते ही त्यातल्यात्यात समाधानाची गोष्ट नाही काय ?

**मी** : ( रोखलेल्या नजरेने ) दिवाळी वर्षातून एकदाच येते हे खरे असले, तरी माणसाचे दिवाळे काढून जाते, हे काय तुझ्या ऐकण्यात आलेले नाही ?

**विश्वास** : (बावचळून जाऊन) हे मी ऐकले आहे...पण त्यात इतका खोल अर्थ भरलेला असेल, याची मला अजिबात कल्पना नव्हती !

**मी** : (थंड सुरात) ती कल्पना तुला कशी असणार ? आजपर्यंत तुला मुळी एखाद्या तज्ज्ञाकडून मार्गदर्शनच मिळालेले नव्हते.

**विश्वास** : (ओशाळवाण्या चेहऱ्याने) ...खरे आहे...पण मी दिवाळीपासून स्वतःचा बचाव कसा करू ? तुमची ती प्रतिबंधक लस मला टोचा हो...

**मी** : जरूर टोचतो. पण आज तू माझ्याकडे आला नसतास किंवा येऊन फक्त माझा निरोप घेऊन निघून गेला असतास, तर तुझी काय अवस्था झाली असती ?

**विश्वास** : (कावराबावरा होऊन)...तर मी दरवर्षीप्रमाणेच या वर्षीही दिवाळीच्या आनंदात नकळत सामील झालो असतो आणि मग माझ्या जीवनाचे अंतिम ध्येय फटाक्यांच्या भक्षस्थानी पडून भस्मसात झाले असते !

**मी** : (छद्मीपणे हसून) माझ्या अभ्यासक्रमातील हा शेवटचा धडा न शिकलेल्यांची नेमकी हीच दुर्दशा झाली आहे !

**विश्वास** : (उतावीळ होऊन) मला माझी तशी दुर्दशा करून घ्यावयाची बिलकूल इच्छा नाही. तेव्हा आता तरी मला या संभाव्य संकटांवर काही प्रतिबंधक उपाय सांगा.

**मी** : (गंभीर सुरात) तुझ्यापुढील अक्राळविक्राळ संकटावर प्रतिबंधक उपाय म्हणून तू एक प्रभावी सूत्र तत्काळ तुझ्या रक्तात भिनवून घे व त्यानुसार आजपासूनच बोंब मारावयास सुरुवात कर.

**विश्वास :** (दचकून जाऊन) बोंब मारावयास सुरुवात करू ?...पण...हरकत नाही ...अगोदर ते प्रभावी सूत्र मला सांगा.

**मी :** (गंभीर मुद्रेने) ते सूत्र असे की, दिवाळी याचा अर्थ पैसा, वेळ, श्रम व प्रकृती याची नासाडी !

**विश्वास :** (थोडा विचार करून) आणि या सूत्रानुसार बोंब मारण्यास सुरुवात करणे म्हणजे काय ?

**मी :** (समजावून सांगण्याच्या आविर्भावाने) दिवाळीची सुरुवात कशी होते ?

**विश्वास :** सुरुवात कशी होते म्हणजे ? पहाटे उठून अभ्यंगस्नान करून नंतर...

**मी :** हरकत नाही, तुझे उत्तर बरोबर आहे असे आपण समजू. वस्तुतः खरी सुरुवात खूप अगोदर होत असते. म्हणजे आकाशकंदील करणे किंवा विकत आणणे; त्याचप्रमाणे कापड-चोपड, काही भेटीदाखल देण्याघेण्याच्या वस्तू, भेटकार्डे इत्यादी असंख्य गोष्टींची खरेदी करणे, अशा हालचाली वाढ्यात माणसे दिवाळीपूर्वी कित्येक दिवस करू लागतात. किंवा काही अतिरेकी माणसे त्याहीपूर्वी आपली घरे रंगवून वगैरे घेतात. परंतु आपण तूर्त अशा बेफाम वागण्याकडे दुर्लक्ष करू या.

**विश्वास :** मग आता दिवाळीच्या दिवशी पहाटे उठून अभ्यंगस्नान वगैरे करण्याबाबत तुमचे सूत्र कसे उपयोगात आणावे ते सांगा.

**मी :** या प्रश्नाचे उत्तर फारच सोपे आहे. प्रथम तू अशी बोंब मारावयास प्रारंभ कर की, एखादी घाणेरड्या वासाची माती, उटणे म्हणून विकत आणून अंगाला चोपडणे मला अजिबात आवडत नाही. तसे करणे म्हणजे पैसा, वेळ, श्रम व प्रकृती याची नासाडीच !

**विश्वास :** (उमज पडल्याचा आविर्भाव करून)...आले सर्व काही माझ्या लक्षात.

**मी :** (रोखलेल्या नजरेने) काय आले तुझ्या लक्षात ?

**विश्वास :** मी तुमच्या सूत्रानुसार अभ्यंगस्नानाविषयी अशी बोंब मारण्यास सुरुवात केली की, माझ्या घरातील लोक एक दिवस वैतागून म्हणतील, 'बाबा, तू नको उठू पहाटे आणि अघोळ सुद्धा करू नको. पण तुझी ही कटकट बंद कर !' आणि घरातील मंडळी मला असे म्हणाली की मग मी स्वतःची कीव करीत बसून, माझे सुतक नीट पाळीन.

**मी :** (खूश होऊन) समजले ना माझे सूत्र किती प्रभावी आहे ते ! आता आपण एका बिकट समस्येला तोंड कसे द्यावे, याची चर्चा करू.

**विश्वास :** (सचित मुद्रेने) कोणत्या संकटाबद्दल आपण बोलणार आहोत ?

**मी :** (छद्मी हास्य करून) ते संकट म्हणजे भाऊबीज !

**विश्वास :** (रुमालाने कपाळावरचा घाम पुसून) भाऊबीज ही एक बिकट समस्या असेल, असे माझ्या स्वप्नातही कधी आले नव्हते !

**मी :** (सोज्वळ चेहरा करून) अर्थात तुझी बहीण दूरच्या गावी असेल, तर या संकटाला तोंड देणे जरा सोपे जाईल.

**विश्वास :** ते कसे काय ?

**मी :** तू जे सूत्र शिकला आहेस, त्याचा अवलंब करून व आजारी असल्याचा बहाणा करून तुला वहिणीच्या गावी जाण्याचे टाळता येईल.

**विश्वास :** ...पण भाऊबीज टाळता येत नाही कारण तिला साडी नंतर दिलेलीही चालते !

**मी :** तीच तर या सणाची अडचण आहे. हरकत नाही. त्यावरही तोडगा आहे.

**विश्वास :** (उत्सुकतेने) कोणता तोडगा?

**मी :** येथून पुढे तुला जेव्हा जेव्हा तुझी बहीण भेटेल, तेव्हा तेव्हा तू आक्रमक पवित्रा घेऊन अशी मुक्ताफळे उधळण्यास सुरुवात कर की, स्त्री-स्वातंत्र्य, स्त्री-मुक्ति-अंदोलन इत्यादी पुरोगामी विचारांची सरशी होत असताना स्त्रियांनी भावाकडून भाऊबीज हे निमित्त करून काही भेटवस्तू घेणे म्हणजे पैशाचा अपव्यय करणे आणि एक प्रकारे पुरुषाचे दास्य पत्करून आपण कमी प्रतीच्या मानव आहोत, असे मान्य करणे !

**विश्वास :** (समाधानाचा निःश्वास टाकून) तुमचा हा तोडगा माझ्या वहिणीच्या बाबतीत अगदी हुकमी एक्क्यासारखा उपयुक्त ठरेल. कारण ती तिची पुरोगामी मते मला वेळी अवेळी ऐकवीत असते. तुम्ही म्हणता तशी मुक्ताफळे मी उधळू लागलो की, लगेच तिच्या नाकावर राग येईल व...

**मी :** व ती म्हणेल 'नको तुझी ती भाऊबीज,' असेच की नाही ?

**विश्वास :** अगदी अचूक ताडलेत आणि मग घरातील माणसे माझ्या या अघोरी वागण्याबद्दल माझी भरपूर निर्भर्त्सना करतील. शिवाय, आपण आपल्या एकुलत्या एका लाडक्या बहिणीला अकारण दुखवून ठेवले, या विचाराने मी माझ्या मनात अपराधी भावनेचे तुफान निर्माण करून स्वतःला अतोनात छळून घेईन.

**मी :** मात्र एक गोष्ट विसरू नकोस. भाऊबीज नावाच्या अंधश्रद्धेमुळे समाजातील लक्षावधी माणसाचे श्रम, वेळ व पैसा यांची कशी धुळधाण होते, याचा पाढा वाचीत बसत राहा.

**विश्वास :** (अंतर्दृष्टी प्राप्त झाल्याच्या आविर्भावाने) होय तसा पाढा वाचीत राहिलो म्हणजे भाऊबीज या संकटाबद्दल मी हळूहळू निर्धास्त होत जाईन. आता मला पटले की, दिवाळीच्या दिवसात केवळ खेटर मारल्यासारखा चेहरा करणे व मारक्या म्हशीच्या नजरेने इतराकडे पाहणे या प्राथमिक तत्त्वांनी माझे निभावण्यासारखे नाही.

**मी :** आता आणखी एका प्रसंगाला तोंड देण्याची पूर्वतयारी तू केली पाहिजेस.

**विश्वास :** (हतबुद्ध होऊन) आता आणखी कोणता प्रसंग ?

**मी :** (रोखलेल्या नजरेनें) लोक जेव्हा नव्या वर्षाचे स्वागत करतील तेव्हा तू काय करणार ?

**विश्वास :** अरेच्चा ! अडचण आहे खरी ! त्या वेळी मी काय बरे करावे ?

**मी :** (आज्ञा देण्याच्या सुरात) त्या वेळी तू नव्या वर्षाचे स्वागत करण्यासाठी किती कोट्यावधी लोक किती कोट्यावधी रुपये व अमूल्य वेळ वाया घालवीत आहेत याचे गणित मांडीत बसून, तुझ्या मनाच्या सांधीकोपऱ्यात विषण्णता ओतप्रोत भरून घेतली पाहिजेस.

**विश्वास :** (गंभीर सुरात) आता सर्व काही माझ्या चांगले ध्यानात आले आहे.

**मी :** (दटावणीच्या सुरात) अजून एक गोष्ट समजावून घेतल्याशिवाय आजचा धडा तुला नीट प्रकारे आत्मसात करता येणार नाही.

**विश्वास :** (कुतूहलपूर्ण सुरात) अशी आणखी कोणती महत्त्वाची गोष्ट मी समजावून घेतली पाहिजे ?

**मी :** (विकट हास्य करून) दिवाळीच्या वेळी तुझे चित्त विचलित होऊ नये म्हणून तू या अभिनव विद्येची अधिदेवता 'छळभवानी' हिची मनोभावे पूजा केली पाहिजेस

**विश्वास :** (डोळ्यात आगळीच चमक दाखवून) छान ! छान ! लोकांना करू दे ते लक्ष्मीपूजन ! अज्ञ पामरच ते ! आणखी काय करणार ते बिचारे ? मी मात्र छळभवानीची पूजा करून माझी दिवाळी सार्थकी लावीन.

**मी :** मग तुझा रस्ता निर्वेध होईल. तुझी आराध्यदेवता तुला कधीही एकटा सोडणार नाही, असा शुभाशीर्वाद मी तुला देऊन ठेवतो.

**समाप्त**

## पुस्तके

पेटलेले दिवस

# एका संघर्षमय कालखंडाचे काहीसे एकांगी पण प्रभावी चित्रण

'मराठवाडा' या दैनिकाचे ज्येष्ठ व आदरणीय संपादक श्री. अनंत भालेराव यांची दोन पुस्तके प्रकाशित झाल्यानंतर त्यांच्याविषयी बरेच काही वाचायला मिळाले. तसे 'मराठवाड्या'च्या अग्रलेखांमधून त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचे, लेखनशैलीचे दर्शन घडतच होते. मराठवाड्याच्या जीवनाशी एकरूप झालेला पत्रकार असे त्यांचे वर्णन करावे लागेल. काही ठराविक मूल्यांचा सतत पाठपुरावा करीत राहणं हे भालेरावांचं वैशिष्ट्य आहे. मराठवाड्याच्या मागासलेपणाबद्दल त्यांनी अतिशय पोटतिडिकीने लिहिले आहे. शेतकरी, मजूर आणि दलित या उपेक्षितांच्या बाजूनेच सतत आपली लेखणी वापरायचं व्रत त्यांनी स्वीकारल्याचं त्यांच्या प्रत्येक लेखातून जाणवत राहते.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामातील भालेरावांचा प्रत्यक्ष सहभाग आणि अ. कृ. वाघमारे यांनी स्थापन केलेल्या 'मराठवाडा' या दैनिकाची त्यांनी समर्थपणे सांभाळलेली धुरा ही त्यांच्या कर्तृत्वाची ठळक अंगे आहेत. 'पेटलेले दिवस' व 'आलो याचि कारणासी' या दोन पुस्तकांमधून भालेरावांच्या जीवितकार्याची ओळख होते. येथे फक्त एकाच पुस्तकासंबंधी विचार केला आहे.

१९३८ ते १९४८ या १० वर्षांच्या कालखंडात निजामी संस्थानाविरुद्ध करण्यात आलेल्या लढ्याचे 'पेटलेले दिवस' या पुस्तकात भालेरावांनी चित्रण केले आहे. त्रावणकोर, म्हैसूर, कोचीन, राजकोट, हैद्राबाद अशा सर्वच संस्थानातील प्रजेचे नागरीहक्क आणि मूलभूत स्वातंत्र्य धोक्यात होते. काही ठिकाणी संस्थान विलिनीकरणाच्या चळवळीही सुरू झाल्या होत्या; परंतु हैद्राबाद संस्थानाचं वेगळेपण असं की येथील निजामाची सत्ता जुलुमी तर होतीच पण या राजवटीतील मुस्लिम धर्मांधतेचा आणि वर्चस्ववादाचा जाच सर्वसामान्य जनतेला जास्त तीव्रतेने जाणवत होता. या लढ्यातील अनेक रोमांचकारी आठवणी भालेरावांनी या पुस्तकात लिहिल्या आहेत. ललित शैलीत ह्या सगळ्या आठवणी मांडल्या असल्याने त्यातील नाट्य, रहस्यमयता ह्यामुळेही पुस्तकाची वाचनीयता वाढली आहे. निजामाच्या सत्तेविरुद्ध लढताना जी एक विलक्षण धुंदी व उत्कटता त्यांनी अनुभवली ती या पुस्तकातील पानापानातून व्यक्त होत राहते. पण याचे स्वरूप पूर्णपणे 'ललित' म्हणावे असे नाही. तसे असते तर हैद्राबाद मुक्तिसंग्रामात भाग घेताना आलेले अनुभव लिहिता लिहिता त्यांनी मध्येच तो सगळा 'इतिहास' सांगण्याचा प्रयत्न केला नसता आणि या राजसत्तेविरुद्ध जे जे लढले त्यांचे मूल्यमापन करण्याच्याही फंदात ते पडले नसते; पण त्यांच्या या लिखाणात त्यांचे 'पूर्वग्रह' सतत डोकावत राहतात. म्हणूनच 'स्टेट काँग्रेस'नेच हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा लढा दिला व तो यशस्वी केला. इतर संघटना—चळवळी या गौण होत्या आणि त्यांना काहीही करता आले नाही अशा स्वरूपाचा निष्कर्ष काढून भालेराव मोकळे झाले आहेत.

राष्ट्रीय स्वातंत्र्य आंदोलनाच्या संदर्भातही अशी अनेक सरधोपट विधाने केली जातात 'काँग्रेसने देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले' असे वारंवार सांगून ते विद्यार्थ्यांच्या मनावरही बिंबवण्याचा प्रयत्न होतच असतो. काँग्रेसचा इतिहास लिहिताना ही मंडळी इतरांना अनुल्लेखाने मारत असतात. इतरांची दखलच घेतली नाही तर आपले कार्य अधिक उठून दिसेल असा काहींचा कयास असतो. हैद्राबाद मुक्तिसंग्रामाचा इतिहास लिहिताना इतरांची दखलसुद्धा न घेणे भालेरावांना जरा अवघड गेले असावे. तितके ठळकपणे इतरांचे अस्तित्व त्यांना दिसले असणे शक्य आहे. म्हणून भालेरावांनी त्यांची दखल घेतली पण स्टेट काँग्रेसशिवाय लढा देणाऱ्या इतर संघटना कशा निष्प्रभ होत्या हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. 'पहिला सत्याग्रह' या प्रकरणात ते लिहितात, 'गांधीजींच्या अहिंसेची निंदा करणाऱ्या व रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले असे श्लोक भोजनाच्या पंक्तीतून म्हणण्यात धन्यता मानणाऱ्यांना हैद्राबादेत सशस्त्र उठाव घडवून आणण्याची केवढी तरी मोठी संधी होती; परंतु त्यांना ते पुढे कधीच जमले नाही. स्टेट काँग्रेसच्या राष्ट्रीय नेतृत्वाने आर्य समाजातील बहुसंख्य लोक आपल्या संघटनेत आकृष्ट करून घेतले. त्यामुळे हिंदू महासभा एकाकी पडली. संघटना म्हणून तिला अथवा तिला समानधर्मी असणाऱ्या इतर कुठल्याच संघटनेला हैद्राबादेत थारा मिळाला नाही. या अनुभवाने राष्ट्रवादाची व्याप्ती व त्याच्या मर्यादा अचूक दाखवून दिल्या.' निरनिराळ्या कथांमधून भालेरावांनी हिंदुत्वनिष्ठ संघटनांबद्दलची ही ठाशीव मते पुन्हा पुन्हा मांडली आहेत. वास्तविक वरील परिच्छेदात त्यांनी 'स्टेट काँग्रेसचे राष्ट्रीय नेतृत्व' हा वापरलेला शब्दप्रयोग चुकीचा आहे. त्यांनीच सुरुवातीला लिहिल्याप्रमाणे काँग्रेसच्या राष्ट्रीय नेत्यांना निजामाविरुद्ध लढा अमान्य होता. १९३८ मध्येच हा लढा बंद करण्याचा काँग्रेसने ठराव केला 'मुस्लिम अनुनयाच्या' काँग्रेसच्या सूत्राला अनुसरूनच हे सगळं घडत होतं. कितीही नागरीहक्क पायदळी तुडविले जावो, प्रतिपक्षाकडून अहिंसा—सत्य यासारखी मूल्ये धुडकावली जावोत, पण 'मुसलमान विरोध नको' या नकारात्मक भूमिकेतून काँग्रेसने या चळवळीला विरोध केला. या उलट हिंदू महासभेची आणि आर्य समाजाचीही भूमिका स्वच्छ आणि स्पष्ट होती. मुस्लिम राजसत्ता आणि वर्चस्ववादा-

विरुद्ध हिंदू समाज अशा स्वरूपाच्या लढ्यात ते कोणतेही किल्मिष मनात न ठेवता उतरले होते. राष्ट्रीय पातळीवरच्या नेत्याच्या विरोधाला न जुमानता स्टेट कॉंग्रेसचे नेते मात्र धर्मातीत राष्ट्रवाद व मुस्लिम राजसत्तेविरुद्ध लढा अशी कसरत करत आणि आपण धर्मातीत कसे आहोत हे पुन्हा पुन्हा पटवून देत होते.

हिंदूमहासभेला सशस्त्र लढा करता आला नाही या बद्दल भालेरावांनी ठपका ठेवला आहे पण गमत म्हणजे या संघटनेच्या कार्यकर्त्यांनी केलेले सत्याग्रह, भोगलेला तुरुंगवास हे सगळं सुद्धा भालेरावांच्या दृष्टीने गौण ठरतं आहे. का तर हे लोक हिंदुत्ववादी होते म्हणून ! हैद्राबाद मुक्तिसंग्रामात वास्तविक हिंदूसभा आणि आर्यसमाज यांचे योगदान उल्लेखनीय आहे. हिंदू सभेने महाराष्ट्रातून सुमारे ४ हजार प्रतिकारक पाठविले होते तर आर्य समाजाने सुमारे १७ हजार भागानगर नि शस्त्र प्रतिकार चळवळीत हिंदूसभेच्या अनेक कार्यकर्त्यांना अटक झाली. हिंदू सभेने काहीच केले नाही असे भालेरावांना वाटत असले तरी निजामाला तसे वाटत नव्हते ! म्हणूनच एकूणच आंदोलनाचा रागरंग पाहिल्यानंतर जी काय पावले त्याने उचलली त्यावेळी सावरकरांना आंदोलन थांबवण्याचे आवाहन निजामाने केले.

## सोलापूर परिषद

२५ डिसेंबर १९३८ ला सोलापूर येथे आर्य समाजाची मोठी परिषद भरली त्या परिषदेस निजाम राज्यातील व देशातील इतरही महत्त्वाचे आर्य समाजी नेते उपस्थित होते. या परिषदेस स्वातंत्र्यवीर सावरकराना बोलविण्यात आले होते. कॉंग्रेसचे ऐकून आर्य समाजाने अलिप्त राहायचे का आदोलनात भाग घ्यायचा याचा निर्णय परिषदेत घ्यायचा होता. हिंदूसभेची भूमिका स्पष्टच होती. या परिषदेत आंदोलन उभे करायचे असा निर्णय घेण्यात आला व हैद्राबाद सस्थान भारतीय सघराज्यात विलीन होईपर्यंत तो कायम होता. भालेरावांना मात्र असे लिहिण्यात धन्यता वाटते की, 'आर्य समाजी राष्ट्रीय प्रवाहात सामील झाले व हिंदूसभा एकाकी पडली.'

हिंदूसभा आणि आर्यसमाज या 'जातीय' मडळीपासून आपण कसे वेगळे आहोत हे दाखवण्याचा निष्फळ प्रयत्न भालेरावांनी केला नसता तर बरे झाले असते. व्यापक लोकशाहीनिष्ठा, धर्मातीत राष्ट्रवाद असे मोठमोठे शब्द त्यांनी या सगळ्या कथामध्ये वापरले आहेत पण ते चिकटवल्यासारखे वाटतात. प्रत्यक्षात त्यांनी लिहिलेल्या कथामधून मुस्लिम राजसत्ता आणि जनता यांच्या धर्मांधतेचे वारवार दर्शन होते. कदाचित त्यामुळेच त्यांच्या निधार्मिक मनाला 'हे जरा जास्तच होतय' अशी भीती वाटून त्यांनी निधार्मिकतेच्या मूल्याचा पुनः पुन्हा उल्लेख केला असावा.

राजकीय जीवनात वावरणाऱ्या लोकांना एकच एक मूल्य कायम उराशी बाळगून कार्य करता येत नाही आणि ते अगदी स्वाभाविक आहे. त्यामुळेच कॉंग्रेसच्या आणि महात्मा गाधींच्या अनुयायांनी हैद्राबादमध्ये प्रसगी शस्त्रास्त्राचा वापर केला; तर याउलट स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या पक्षातील लोकांनी भागानगरला निःशस्त्र प्रतिकाराची चळवळ केली निधार्मिकतेच्या मूल्याबाबतही असेच आहे. एका विशिष्ट धर्म–संस्कृतीचे म्हणून कोणावर अन्याय होत असेल तर तिथे निधार्मिकतेच्या तत्त्वाचा उद्‌घोष व्यर्थ आहे. आणि या दृष्टिकोनातून 'पेटलेले दिवस' मधील प्रकरणे वाचली की 'निधार्मिकता' यासारख्या शब्दामधील कृत्रिमता आणखीनच तीव्रतेने लक्षात येते.

'९ ऑगस्ट १९४७' या प्रकरणातील प्रसंग पाहण्यासारखा आहे. ९ ऑगस्ट १९४७ या दिवशी स्टेट कॉंग्रेसने 'संघराज्यात विलीन होण्याचा दिवस' म्हणून पाळण्याचे ठरविले. योगायोगाने याच दिवशी मुसलमानाची ईद होती. मुसलमानांनी दग्याची तयारी मोठ्या प्रमाणावर केली, अशी सगळीकडे वार्ता पसरली. ह्या तणावाच्या वातावरणात कलेक्टर, डी. एस. पी., इत्तेहादूल मुसलमीन व कॉंग्रेसचे संयुक्त पुढारी यांची बैठक झाली. इत्तेहादूल मुसलमीनने सांगितले की, ईद असल्याने दरवर्षीप्रमाणे कॉंग्रेस कचेरीवरून मिरवणूक जाईल. त्यावेळी कचेरीवर तिरंगा ध्वज असता कामा नये. यावर संस्थान विलिनीकरणाचा हा दिवस ईद बघून ठरविलेला नसल्याने तिरंगी ध्वजाबाबत काहीही तडजोड करता येणार नाही अशी भूमिका काहींनी घेतली. एका मध्यममार्गी मुसलमानाने असा प्रस्ताव माडला की, ईदची मिरवणूक जाईपर्यंत ध्वज काढून ठेवावा व मिरवणूक गेल्यानंतर तो पुन्हा लावावा. परंतु तोही मान्य होऊ शकला नाही. शेवटी असा तोडगा निघाला की, मिरवणूक कॉंग्रेस कचेरीसमोरून जात असताना ध्वजासमोर एका मुसलमान व्यक्तीने शेरवान धरायची. कॉंग्रेस प्रतिनिधींनी तो मान्य केला. मात्र प्रत्यक्ष मिरवणूक जाताना ध्वज काढण्याच्या घोषणा होऊ लागल्या. भारत मुर्दाबाद यासारखे नारे लावण्यात आले. कुठेही ठिणगी पडली तरी दंगलीचा आगडोंब उसळणार अशी परिस्थिती निर्माण झाली; परंतु हे प्रकरण त्यावेळी तेवढ्यावरच निभावले

हा प्रसग म्हणजे भारतातील अल्पसंख्यांक, बहुसख्याक व बहुसख्यांकाचे प्रतिनिधी म्हणवून घेणारी कॉंग्रेस याच्या मनोवृत्तीचे प्रातिनिधिक चित्र आहे असे म्हणावे लागेल. ह्या तडजोडीमध्ये कॉंग्रेसला अपयश आले असं लेखक म्हणणं शक्य नाही; पण ध्वजासमोर शेरवान धरण्याला कॉंग्रेस प्रतिनिधींनी मान्यता दिलीच. अर्थात 'ध्वज' हे प्रतिक किती श्रेष्ठ मानायचं ह्याही काहींच्या दृष्टीने वादाचा मुद्दा होऊ शकेल. विजय आणि पराभव ह्याचे अर्थसुद्धा प्रत्येकजण स्वतःच्या सोईने ठरवत असतो एवढेच इथे म्हणता येईल.

इतराची भूमिका समजून न घेण्याची असहिष्णुदारता आज सगळीकडेच दिसते. हा एकागीपणा काही वेळा इतका टोकाचा असतो की त्यातून झाला तर विनोदच निर्माण होतो. हैद्राबाद मुक्तिसग्रामाचा मूळ विषय बाजूला ठेवून त्या अनुषगाने एक प्रकरण भालेरावांनी लिहिले आहे. 'वर्गमूळ आणि घन (धन) मूळ' या प्रकरणात १९५२ च्या निवडणुका जवळ आल्यानतर त्याना भेटलेले निरनिराळे पक्ष आणि कार्यकर्ते यांच्याबद्दल त्यांनी लिहिले आहे. त्यातील काही भाग येथे उद्‌धृत करण्यासारखा आहे. ते लिहितात, 'कम्युनिस्टाचा व आमचा सहवास नवा नव्हता. विरोध–विकास वादात तथ्य कितपत असेल ते असो पण कम्युनिस्टाचे व इतरांचे

संबंध एकत्र असूनही सदैव संघर्षात्मक आणि विरोधात्मक राहत गेले. यातून विकास होण्याऐवजी आघाड्यांचा विनाश व कार्य-कर्त्यांचा भ्रमनिरास होत गेला !'

आणखी एक आठवण अशीच गंमशीर आहे. 'मार्क्सवादाच्या तत्त्वज्ञानाला बांध-लेला कामगार किसान पक्ष हा लिखित आधाराखेरीज कोणालाही कुठलेच पाऊल पुढे टाकू देत नसे. कार्यक्रमाच्या प्रत्येक बाबीला कम्युनिस्ट मेनिफेस्टोच्या जर्मन एडिशनपासून आधार पुरविण्याची खटपट व्हायची. एस्. के लिमये बोलायला लागले की त्यांचा चिटणीस एकेक पुस्तक उघडून हजर करीत असे. पुस्तक प्रकाशनाचा सन, प्रकाशक, पान वगैरे सांगून मग आधार वाचला जात असे. बैठक संपली की विनोदाने कार्यकर्ते विचारीत, आजच्या गोळीबाराच्या कॉजल्टीज किती? –दोन ठार सर्व जखमी. यात ठारांची संख्या कमी अधिक असायची. जखमी मात्र सर्वचजण असायचे.'

ह्यातला विनोदाचा भाग सोडून दिला तरी ह्या एकांगीपणाच्या रोगापासून कोण कोण मुक्त आहे हा सुद्धा विचार करण्या-सारखा प्रश्न आहे. गांधीजींची मूल्ये व काँग्रेसची संघटना यामुळेच चळवळ यशस्वी झाली असा निष्कर्ष करणारे भालेराव कमी अधिक प्रमाणात यातलेच नव्हेत का? फक्त 'मार्क्स'च्याच हाताला धरून जाणारे अंधश्रद्ध आणि बाकी सगळे 'पंथीय' डोळस असे कसे म्हणता येईल ? मार्क्सच्या जागी आणखी कोणी असले तरी त्याच्या अनुयायां-नाही त्याच पंक्तीत बसवावे लागेल.

हैद्राबाद मुक्तिसंग्रामात स्टेट काँग्रेस सर्वेसर्वा होती असे दाखविण्याच्या लेखकाने प्रयत्न केला नसता तर पेटलेल्या दिवसांची ही कथा अधिक रंगली असती. त्यांनी केलेली लढ्याची वर्णने वाचकाला खिळवून ठेवणारी आहेत यात शंकाच नाही. त्या प्रसंगांमधील नाट्य विलक्षण आहेच पण त्या संघर्षमय कालखंडाशी लेखक समरस झाला असल्या-मुळे हा भाग जास्त वाचनीय झाला. 'उमरी बँक ॲक्शन' हे प्रकरण या दृष्टीने उल्लेख नीय आहे. ओघवती शैली आणि प्रत्येक वाक्यानंतर पुढे काय याची उत्कंठा वाटायला लावण्याचे सामर्थ्य हे या पुस्तकाचे वैशिष्टय आहे. या वैशिष्टयांबद्दलही खूप लिहिता येण्यासारखे आहे. तशी अनेक सौंदर्यस्थळे या पुस्तकात आहेत. परंतु पुस्तकात लेखकाने केलेल्या मतप्रतिपादनाची आणि त्यामागे असलेल्या प्रवृत्तीची चिकित्सा करणे मला जास्त महत्त्वाचे वाटले. ज्या विचारांशी आपले पटत नाही त्यांच्या प्रेरणाही कमी लेखणे ही ती प्रवृत्ती आहे. विचार, कार्य-पद्धती आणि प्रेरणा यात फरक करायला हवा. धार्मिकता आणि निधार्मिकतेबद्दलची भालेरावांची मते कोणाला पटली नाहीत म्हणून भालेरावांचे हैद्राबाद मुक्तिसंग्रामा-तील कार्य गौण होते असे कोणी म्हणले तर ते हास्यास्पद ठरेल.

या पुस्तकातील कस किती अस्सल आणि किती तकलादू आहे हे वाचकांनीच ठरवावे असे अनंतराव भालेरावांनी प्रस्तावनेत सुच-विले आहे. पुस्तक वाचल्यानंतर लेखन शैली व अनुभव या दोन्ही दृष्टीने लेखकाचे नाणे खणखणीत आहे असाच विचार मनात येतो.

**– निरंजन आगाशे**

पेटलेले दिवस
लेखक : अनंत भालेराव
श्रीविद्या प्रकाशन
मूल्य : २५ रु., पृष्ठे : ११०




काँग्रेस : ह्यूम-नवरोजी-टिळक- गांधींची.
काँग्रेस : स्वातंत्र्य लढ्यातली आणि सत्तासंघर्षातली.
काँग्रेस : जहाल-मवाळांची, सिंडिकेट-इंडिकेटची अन् डाव्या-उजव्यांची.
काँग्रेस : नेहरू घराण्याच्या चार पिढ्यांची अन् फोर्थ जनरेशन काँम्प्युटरची.
शतकाचा उंबरठा ओलांडलेल्या काँग्रेसचा प्रवास.

॥ खबर काँग्रेसची ॥
॥ खबर काँग्रेसची ॥

लेखक : शिरीष सहस्रबुध्दे | मूळ किंमत : ९० रु.
शताब्दी निमित्त सवलत किंमत : ६० रु.
पहा आणि सवलतीत घ्या

**राजहंस प्रकाशन**

• १०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ, पुणे ३०.
• वा. र. गोडे, जोशी वाडी, ४१ भवानी शंकर रोड, दादर, मुंबई-२८
फोन-४२२५४५५.

# बेलूरमठ, गंगाकाठ आणि सहस्रावधी युवक : पृष्ठ १२ वरून

## वेदांत आणि फिजिक्स

रामण्णाच्या व्याख्यानाचा विषय होता 'वेदात आणि शास्त्र ! पचवीस मिनिटांच्या या व्याख्यानात त्यानी फिजिक्सच्या वाढीचा इतिहास माडत वेदाताची परिभाषा फिजिक्समधून माडून दाखवली. मेकॅनिक्स, रिलेटिव्हिटी, क्वाटम् मेकॅनिक्स् आणि युनिफाईड फिल्ड थियरी असे टप्पे मांडत विश्वाच्या मुळाशी असणाऱ्या एकमेवाद्वितीय चैतन्याच्या संकल्पनेपाशी पोचले, तेव्हा त्यानी 'ब्रह्म' या सज्ञेचा वापर केला. मग कॉन्शसनेस, लाईफ याची व्याख्या आणि वेदात-विचार यांचा सांधा जुळवून दाखवला. तेव्हा युवक नुसते श्रोते नव्हते, आपल्या सर्व अस्तित्वानिशी सकल्पनाच्या विश्वात विहरत होते. संपूर्ण पँडॉल खच्चून भरला होता. बाहेर आजूबाजूला छातीशी हात बाधूनही अनेकजण उभे होते, पण एक रामण्णाचा आवाज सोडला तर बाकी अत्यंत सतर्क शांतता होती. अतिशय सहजपणे माईकसमोर उभे राहून, डावा हात रोस्ट्रमवर टेकवून ते बोलता बोलता उजव्या हातान हवेत आकृत्या काढून संकल्पना स्पष्ट करत होते, बोलण्यात येणाऱ्या प्रत्येक शास्त्रीय पारिभाषिक शब्दाची व्याख्या सांगत होते. बोलता बोलता त्यानी 'अत.स्फूर्ती'–Intution हा शब्द वापरला, मग एकदम ते थावले, म्हटले ज्याची व्याख्या करणं अवघड आहे असा एक शब्द मी वापरतोय. तीक्ष्ण बुद्धीचा शास्त्रज्ञ कसा असतो, कसा बोलतो याचं ते प्रात्यक्षिक होतं. प्रस्तावनात्मक पहिल्या काही मिनिटांनंतर रामाण्णासुद्धा समोरच्या हजारो युवकाना विसरून स्वत शी चिंतन करत असल्यासारखे बोलत होते, 'फिजिक्स आणि फिलॉसॉफी.'. यात कारण परिणाम असं नातं आहे. पण म्हणून असं बोलताना वेळेचं त्यांचं भान सुटत नव्हतं. त्यामुळे कमी शब्दात खूप आशय माडताना एका सकल्पनेवरून दुसरीवर उडी मारताना त्याची तगमग होत होती. तरी बरोबर पचवीसाव्या मिनिटाला त्यानी भाषण सपवलं. सपवतानाचे मुद्दे हे की फिजिक्समधला Perfect Symmetry ची कल्पना आणि वेदातातली सत्व–रज–तम समतोलाची ब्रह्म–कल्पना यांचा अधिक अभ्यास व्हायला हवा, शकराचार्यांचा अद्वैत विचार अत्याधुनिक शास्त्राच्या खूप जवळचा आहे.

पचवीस मिनिटाचं त्याचं भाषण ही एक सामूहिक समाधी होती. अत्यंत सखोल आशय समर्थपणे मांडला तर युवकही तो तेवढ्याच लक्षपूर्वक स्वीकारतात याच हे उदाहरण होतं. याच उचीला येऊन पोचलेली आणखी दोन सत्रं. एका सत्रात विवेकानद, रामकृष्ण, शारदामाता यांच्यावर अनुक्रमे स्वामी हर्षानंद, स्वामी व्योमानंद आणि स्वामी विश्वानंद याची भाषणं होतं. त्यानी नुसती चरित्र सांगितली नाहीत. त्या व्यक्तीच विचारविश्व आणि त्याचा वर्तमानाशी असलेला सबंध मांडून दाखवला. जनसामान्यामध्येच देव पहाणं आणि म्हणून समाजातल्या तळागाळाच्या घटकाची सेवा हीच तपस्या मानणं हे रामकृष्ण–विवेकानदाच्या विचारातलं नवनीत. ते ग्रहण केल्यामुळे रामकृष्ण मिशनचे स्वामी शिक्षणापासून ग्रामविकास कार्यापर्यंत अनेक क्षेत्रात जनतेत मिसळत असतात. Religion is not for empty bellies असल घणाघाती वाक्य सागणाऱ्या विवेकानदानी दिलेल वाण स्वीकारल्यामुळे आर्थिक प्रश्नाच महत्त्व त्यानी ओळखलेल असतं. हे सर्व विचारचरित्र उलगडून दाखवणाऱ्या तीन भाषणाच हे सत्र आणि समेलन–समारोपापूर्वीच शेवटच सत्र ही युवकाना केवळ कानच नाही तर पाचही ज्ञानेंद्रियाना सहभागी करून घेणारी सत्र.

## नेमाई साधन बोस

समारोपापूर्वीचं शेवटच सत्र दोन भागाचं होत. पहिल्या भागात विश्वभारती विद्यापीठाचे (शांतीनिकेतन) कुलगुरू श्री. नेमाई साधन बोस यांचं भाषण होतं. Relevance of Vivekanand for India Today' या विषयावर. वक्तृत्व म्हणून तर हे भाषण हा अप्रतिम नमुना होताच पण इ. स. १९८५ मधे विवेकानदाकडून नेमके काय उचलायला हवं या आशयाची माडणीही अर्थपूर्ण होती. आधीचे पाच–सहा दिवस सारख 'स्वामी विवेकानदानी म्हटल्याप्रमाणे' हे इतके वेळा कानावर पडत होतं की जगात दुसऱ्या कोणी काही म्हटलंय की नाही असा प्रश्न पडावा. शब्दाचे हे खिळे जुळवणाऱ्या तोडाना त्यातल्या अर्थाची प्रचीती आहे अस वाटायच नाही. आतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेतली पाठ केलेली आतषबाजी वाटायची. कित्येकदा अगदी थेट स्वामी मंडळीनीही महाप्रचड पीळ भाषण करून युवकाच्या सहनशक्तीचा अत पाहिला होता. (तसा युवकानी सहनशक्तीचा अत होऊ दिला नाही, बाहेर कँटिन आणि गप्पांची उत्तम सोय होती) पण सर्वात मुख्य हे की आपण इ स. १९२५ सालच्या भारतात बोलतो–ऐकतो आहोत याचे भान फार थोड्या भाषणामध्ये जाणवलं. बाकी काही वक्ते, काही स्वामी अजून एकोणिसाव्या शतकातच वावरतायत, नव्हे नव्हे समोरच्या युवकानाही फरपटत १९ व्या शतकात घेऊन जातायत असं वाटायचं. रामकृष्ण–विवेकानद ग्रेट. हे खर. पण ती काय ऐतिहासिक फॉसिल्स थोडेच आहेत विवेकानद हे जर एका जिवत विचारधारेचं नाव असेल तर वर्तमानकाळातली त्याची अर्थगर्भता नको सागायला ? हे काम श्री. नेमाई साधन बोस यानी केले, तेही मोजक्या शब्दात. अजिबात पाल्हाळ नाही. Thank God, काही स्वामी पाल्हाळ लावण्यात तज्ज्ञ होते. वय जेवढ जास्त तेवढं पाल्हाळ जास्त हा सामान्य मर्त्य मानवांचा नियम स्वामीनाही लागू होत होता. हे खेदजनक. पण श्री. नेमाई साधन बोसाची शब्दरचना अचूक फटक्यांसारखी होती. पजाब–आसाम–गुजराथ इथल्या समस्याचा सदर्भ घेत त्यानी राष्ट्र, राष्ट्रीयत्व, राष्ट्रीय एकात्मता या सकल्पनाचा अर्थ सांगितला. आधुनिक भारताला हा अर्थ सागणारा पहिला तत्त्वज्ञ म्हणजे स्वामी विवेकानंद, हे सागत वर्तमान भारताच्या राजकीय आर्थिक, सामाजिक समस्याची माडणी केली. शास्त्रशुद्ध विचारसरणी, जनसामान्यांबद्दलची तळमळ, विवेकनिष्ठा, रूढी आणि अंधश्रद्धाचा धि:कार, समतेची चळवळ, आपलं स्वत्व न सोडता पश्चिमेकडून गुण शिकण्याची गरज या परिभाषेत त्यांनी विवेकानंदांचा relevance स्पष्ट केला.

## प्रश्नोत्तरांचं खुलं सत्र

संपूर्ण युवा संमेलन १९८५ सालात आणून ठेवण्याचं मोलाचं काम श्रीनेमाई साधन बोसानी केले. तर ते १९८५ च्याही पुढे नेत, युवकाना वर्तमानाच्या खिडकीतून झलक दाखविण्याचे काम स्वामी रंगनाथानद यानी केल. याच सत्राचा हा दुसरा भाग. प्रश्नोत्तराच खुल सत्र. शेवटचाच दिवस. आधीच्या सर्व दिवसामध्ये झालेल्या कोणत्याही मुद्द्याविषयी श्रोत्याना शंका विचारायची, स्वामी रगनाथानंदानी त्याला उत्तर द्यायच असं हे सत्र होत. स्वामी रगनाथानद म्हणजे जगभर प्रवास केल्यानं व्यापक क्षितिजाच ज्याना भान आहे, ज्याचे पाय जमिनीवर नीट टेकलेले आहे अशी आध्यात्मिक अधिकारी व्यक्ती. वयाच्या निकषावर वृद्ध पण उत्तरामध्ये मात्र तारुण्य भरलेलं व्यासपीठावर चिठ्ठीतून आलेला प्रश्न वाचला जायचा, मग उत्तर सुरू व्हायच. कमी शब्दात नेमकं उत्तर. काही प्रश्न निर्मळ खवचट, उदाहरणार्थ 'मी परत जन्म घेईन असं रामकृष्ण म्हटले होते, तर त्यानी जन्म घेतल्यास मी त्याना कसा ओळखू ? याला असच निर्मळ खवचट उत्तर 'मला तुम्ही शोधून दाखवा असं रामकृष्णानी या प्रश्नकर्त्याला सागितलेल नाही.' गांभिर्य आणि मिस्किलपणा याचा सुदर तोल साधत स्वामी रगनाथानदानी प्रश्नोत्तर सत्राला २१ व्या शतकाजवळ नेऊन ठेवलं. आत्मा म्हणजे काय, पूर्णत्व कशाला म्हणतात, पुनर्जन्म आणि कर्मविपाक हे सिद्धात सत्य आहेत का इथपासून ते दैनंदिन जीवनात वेदात आचरायचा म्हणजे काय करायच, भारतीय आणि पाश्चात्य युवकाची तुम्ही कशी तुलना कराल इथून परत गेल्यावर आम्ही नेमक काय कराव इथपर्यंत सर्व स्तरावरचे प्रश्न विचारले गेले. गंमत म्हणजे आध्यात्मिक स्वरूपाच्या प्रश्नानाही स्वामीनी अत्यत सोपी, रोजच्या जीवनातील उदाहरण देत उत्तरं दिली. गूढ भाषेच्या जडजबाळात न शिरता त्यांनी युवकाशी युवकांच्या भाषेत सवाद केला. आपण जाकार्तांला गेलो होतो तेव्हा काय झाल, ॲमस्टरडॅमला काय अनुभव आला, जर्मन युवक कसा वाटतो असं सगळं सागताना कुठेही अहगड नव्हता– जो असा मजकूर बोलताना अनेकाच्या शब्दातून नुसता निथळत असतो. एकतर प्रश्न होता, 'वेदाताच तत्त्वज्ञान रीगनना शिकवून तुम्ही त्याना स्टार वॉर्स थांबवायला प्रवृत्त का करत नाही ?' उघडच आहे की या प्रश्नात खवचटपणाची छटा आहे. पण स्वामीजीनी तो प्रश्न समान तोलान स्वीकारला आणि जागतिक राजकारणाचा आढावा घेत शातता, शस्त्रस्पर्धा, अणुयुद्ध यावर भाष्य केल. विवेकानद, महात्मा गाधीजीच्या तत्त्वज्ञानामध्यं असलेल भारतीय विचारधनच जगाला शाततेचा मार्ग दाखवू शकेल, सावकाशपणे का होईना हळूहळू जगाच्या हे लक्षात येऊ लागलय, इथे हे सत्र २१ व्या शतकाच्या उबरठ्यावर त्यानी आणून ठेवलं. प्रश्नोत्तर सत्राचा असाच उचित समारोप करताना स्वामी रगनाथानदानी आर्थिक प्रश्न आणि शास्त्र व तंत्रज्ञानाच्या विकासाच मानवी जीवनाशी असलेलं नातं या मुद्द्याचा उल्लेख करून सागितलं की भारताच्या उज्ज्वल भवितव्याविषयी मी निःशंक आहे. 'हे भवितव्य तुमच्यामधून उदयाला येणार आहे.' हे अत्यत सहजपणे उच्चारलेले शब्द ऐकताना सपूर्ण युवा समूह थरारून गेला यात नवल नाही. आपल्या विचाराना अधिक स्पष्टता आली आहे आणि कृतीची दिशाही साधारण जाणवतेय असंही अनेक युवकाना वाटलं यात नवल नाही. कारण स्वामीजीच्या उत्तरांत सरकारात शिरणे इथपासून ते सन्यासी होणे आणि खेळाडू म्हणून गाजणे इथपासून ते कुशल उद्योगपती म्हणून यशस्वी होणे या सर्व रेंजचा उल्लेख होता.

युवा समेलनातल्या सहभागाचे, कार्यक्रमाचे हे झाले औपचारिक अधिकृत प्रकार. यापेक्षा अनौपचारिक सहभागाचे किती तरी प्रकार होते आणि त्यात मात्र प्रत्येक युवक सक्रिय सहभागी होऊ शकत होता नाश्ता, चहा, जेवण इथपासून ते गप्पा, गंमत, गगा–पर्यटन असे सगळे पर्याय अनौपचारिक सहभागासाठी खुले होते. तबूमधे, खोल्यामध्ये रहाण्याची व्यवस्था नीट केलेली होती. एकत्र रहाणं, जेवण यातून आपोआपच ओळखी वाढत होत्या. 'गप्पा' हे तर कोणत्याही कार्यक्रमापेक्षा अधिक पॉवरफुल माध्यम होत. बेलूर मठाच्या परिसरातली हिरवळ युवकाच्या वर्तुळांनी फुललेली असायची. सर्व वयाचे स्वामी सुद्धा सहजतेन गप्पामध्ये सहभागी झालेले असायचे. भरपूर गमत, टवाळक्या तर चालायच्याच पण अत्यत अनौपचारिक पद्धतीनं तत्त्वज्ञान, इतिहास, राजकारण, संघटना यावर चर्चा व्हायच्या. आपल्याबरोबर युवकांना घेत स्वामी लोक मठाचा परिसर फिरून दाखवायचे आपोआपच विवेकानंदाचं चरित्र सागून व्हायच, गगेतून नावेन फेरफटका मारायला जायचे, बडानगर, काशिपूर, दक्षिणेश्वर, कामारपुकुर, जयरामपटी या ठिकाणी जायचे. ही सर्व ठिकाणं रामकृष्ण विवेकानदाच्या जीवनाशी संबधित आहेत. हे सर्व अनौपचारिक सहभागाचे प्रयोग शेजारच्या पॅंडॉलमध्ये औपचारिक कार्यक्रम चालू असताना सुद्धा चालायचे. कुठेही लादलेल्या शिस्तीचा आग्रह नव्हता. तत्राचा बडगा उभारलेला नव्हता. उत्स्फूर्ततेलाच भरपूर जागा ठेवली होती परिणाम असा दिसला की कार्यक्रम चालू असताना पॅंडॉलस् कधी रिकामे पडले नाहीत, सर्व कार्यक्रम शिस्तीत झाले आणि आपल्याला अर्थपूर्ण काही तरी मिळाल असं बहुसख्य युवक प्रतिनिधीना वाटले.

## मिळवलं काय ? पुढे काय ?

हा प्रश्न तीन : सहभागी झालेल्यानी काय मिळवलं ? पण हा आणि पुढचा चौथा प्रश्न हे जरा गुतागुतीचे प्रश्न आहेत. कारण त्याची उत्तरं नुसती शब्दात असून चालणार नाहीये, ती उत्तरं कृतीत दिसावी लागतील. म्हणून ती उत्तरं प्रत्यक्ष मिळायला काही काळ वाट पहावी लागेल. आता फक्त शब्दानी काही अंदाज बाधता येतील. मित्र मिळवले, अनुभव मिळाला, गमत आली, सहा दिवस जरा चेंज बरा झाला ही सगळी उत्तर अगदी वरवरची–समेलन समारोपाच्याच कार्यक्रमात स्वामी लोकेश्वरानद म्हटले रामकृष्ण विवेकानदाचा विचार आणि भारताची सद्यस्थिती याच्याशी आपलं काही तरी नात आहे असं वाटलं म्हणून तुम्ही इथे आलात ( हा प्रश्न क्र. १ च्या उत्तराचा भाग ) पण येताना तुमचे विचार कदाचित काहीसे धूसर अस्पष्ट किंवा अनिश्चित असतील. तुमच्या विचाराना अधिक स्पष्टता, निश्चितता या युवा समेलनामुळे येईल. असं म्हणणारे युवक भेटले की आम्हाला विवेकानद अधिक कळले. विचाराना अधिक स्पष्टता आली, आपणही प्रत्यक्ष काही तरी काम कराव अशी प्रेरणा मिळाली वगैरे... शब्दांमधली ही उत्तर सकृद्-

र्शनी स्वीकारायला हवीत, कारण तूर्त त्या वाचून गत्यतर नाही. पण अशा प्रत्येकच शिबिर–अभ्यास वर्ग–समेलनानतर तात्पुरतं भारावून जाणारे अनेकजण असतातच. एका क्षणैक भावनिक लाटेच्या टोकावर असताना त्याना खूप काही उदात्त उदात्त वाटत असतं. दैनदिन जीवनात ते परतले की हे सर्व विरून जात. मी रामकृष्ण मिशनचा सन्यासी होणार आहे अस सागणारे एक–दोन युवक ( एक युवती ) भेटले. तेव्हा मित्राच्यात गप्पा मारताना एक टवाळ तोड बोललं 'युवा समेलनाला येऊन प्रत्येकान काही मिळवल न मिळवलं आपल्याला माहित नाही. रामकृष्ण मिशनला तीस सन्यासी मिळतील न मिळतील (तीस हा आकडा आम्ही बरीच आकडे मोड करून मांडला होता) पण तीस मुलीना आपापले नवरे मात्र मिळाले असतील. त्याच्या या बोचऱ्या सिनिक्पणाला स्वामी लोकही हसले. एक छोटासाच प्रसग फार बोलका आहे. गुजराथचा एक युवक आणि एक बगाली युवती पहिल्या एक–दोन दिवसात ओळख झाल्यानंतर सतत एकमेकाबरोबर असायचे. त्याच्या बरोबर असण्याची 'जात' उघड होती. तेव्हा एक दिवस स्वामी असवतानंद त्याना चक्क गाल फुगवत गंमतीनं म्हटले, 'पोरा, या मुलीपासून तुला धोका आहे बरं का ! सावध !' ती दोघही हसली. युवती स्वामीना म्हटली 'काळजी करू नका स्वामीजी, माझ्यापासून तुम्हाला काही धोका नाही.' स्वामीजीच्या चेहऱ्यावरच हास्य तसच, सहजपणे त्यांनी हा फटका टोलवणारा पासिंग शॉट टाकला. ते म्हटले 'आम्ही त्या धोक्याच्या अतीत कधीच जाऊन पोचलोत बाळ.' मग त्याच सुरात पण गभीरपणे ते म्हटले, 'आम्ही ज्या धोक्यांना सामोरे जातो आहोत त्याचं तुम्हाला अल्पसं भान आलं तरी मी धन्य समजेन ! प्रसंगाचा पुढचा भाग माहीत नाही, कारण तो अजून घडायचाच आहे. संमेलनाला आलेल्या युवकानी धोक्याचं, विधायक कार्याचं सृजनशील आव्हानांचं हे भान मिळवलं की नाही हे भविष्यातच कळणार आहे

तोवर एक अदृश्य हात तुमच्या–माझ्या, या युवकांच्या दिशेनं बोट रोखून एक प्रश्न विचारतोय. विचारात रहाणार आहे. तो चौथा आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न –'युवा समेलनाहून परतल्यावर हे युवक काय करणार आहेत अन् हा प्रश्न नुसता रामकृष्ण मिशनच्या समेलनाला विचारलेला नाही. युवक वर्षानिमित्त झालेल्या प्रत्येक कार्यक्रमाला विचारलेला म्हणून तुम्हाला मला प्रत्येक युवकाला विचारलेला प्रश्न आहे. ठीक आहे, वर्षभर खूप चर्चा-शिबिर परिसंवाद झाले. शब्दांची पूजा खूप बांधलीत, आता कृतीच काय ? या शब्दाचं रुपांतर कृतीत होणार आहे का नुसता आला पूर ओसरून जाणार, पुन्हा पुढचं वर्ष साजरं करायला आम्ही मोकळे. काही यात्रा, श्रमदानं, रक्तदानं वगैरे कृतीशील उपक्रमही झाले. त्याना सातत्य लाभणार आहे का ? केवळ प्रतीकात्मक कृतीपलिकडे हे उपक्रम सरकणार आहेत का ? असा खूप पेचात पकडणारा, अगावर जबाबदारी टाकणारा प्रश्न. नियॉनच्या दिव्यासारखा अखेरी रस्तोरस्ती झळकत असतो जणू– 'युवक काय करणार आहेत.'

. आपण युवक वर्षाचं अध्वर्यूपद स्वामी विवेकानंदाकडे सोपवलं होतं. विवेकानंद, गांधीजी याच्यासारखे अध्वर्यू मोठे त्रासदायक असतात. ते सतत मागे लागतात की तुम्ही काय करताय ते सागा, फुकाचे मुखी नुसती वाचाळता नको. समेलनभर खूप विचार ऐकले, गोष्टी ऐकल्या. आता परतल्यावर तुम्ही पोलादी स्नायू आणि कणखर मनं कमवाल का ? असे स्नायू, अशी मन सृजनशील निर्मिती मागे लावाल का ? जीवनाच जे क्षेत्र निवडाल तिथे स्वयंभू प्रतिभासपन्नतेच दर्शन घडवाल का ? देशाच्या म्हणजेच जनसामान्याचं समस्यांचं काही भान बाळगाल का ?

समेलन समारोपानतर सध्याकाळी बेलूर मठाच्या लॉजवर गप्पा मारत आम्ही मित्रमडळी उभे होतो तेव्हा अशा सर्व प्रश्नाचं मोहोळ उठले होते. एकान चटकन् मला उलट विचारलं, 'तुला काय वाटतं, तू काय मिळवलस ?' इतका वेळ मी मुलाखती घेत होतो, आता मुलाखत द्यायची वेळ माझ्यावर आली. विचारात पडलो योग्य आणि कमी शब्दात कस माडावं याचा विचार करत थावलो. तसे शब्द सुचल्यावरही हे बोलावेत की नाही असा सभ्रम निर्माण होऊन आणखी थोडा वेळ थावलो. अन् मग चाचपडत, अडखळत सागितलं, 'थोडा फार प्रवास, अभ्यास, अनेक संघटनाचा परिचय आणि अल्पसं काम यातून माझं मत बनलय की भारतातला युवक वर्ग सृजनशील चैतन्यान भरलेला आहे. हा निष्कर्ष काढण्याचा डेटा मी मिळवला.' हा डेटा विश्वासार्ह आहे की नाही कुणास ठाऊक पण कृतीची दिशा, कृतीची वेळ यापुढे प्रश्नचिन्हे जाणवतात. एवढ मात्र खर. आपण युवकाविषयी बोलतो आहोत, म्हणजे तृतीय पुरुषी एकवचनी व्याकरण वापरता येणार नाही, आपणही त्यात आलोच हे लक्षात आलं की, थोडसं अडखळायला होतं ते प्रश्नाचं मोहोळ आठवून. विवेकानद, गाधीजी अशी नावं घेतली की तर बोच आणखीनच धारदार होते. बेलूर मठाच्या लॉजवर उभ राहून गप्पा मारता मारता या प्रश्नाची उत्तर सापडणार नाहीयेत. ज्या दिवशी समारोप झाला त्याच्या दुसऱ्या दिवशी युवक वर्षाचा समारोप होता. म्हणजे ३१ डिसें. १९८५. कलकत्याहून त्या दिवशी परत निघालो.

३१ डिसें. रात्री सुरू झालेल्या वर्षभराच्या प्रवासाची सांगताही प्रवासातच व्हावी हे केवढं अर्थपूर्ण प्रतीक ! उत्तराची खात्री नाही पण उत्तर अगदीच अज्ञात नाहीत, प्रश्नचिन्हाचे वेढे जाणवतायत तरी भविष्याच्या उज्वलतेविषयी शंका नाही. अजून प्रवास चालू आहे अन् असा प्रवास नेहमीच चालू असतो.

## नवे युवक, नवा भारत

स्वातंत्र्योत्तर काळात विसाव्या शतकाच्या सत्तरीत सर्वप्रथम नव्या पिढीची पदचिन्हं भारतात जाणवली असावीत. स्वातत्र्योत्तर काळात जन्माला आलेली पहिली पिढी त्या सुमाराला वयात येऊन समाजजीवनात प्रवेश करू लागली होती. परिवर्तनाच्या चळवळीला या पिढीतून नवी गती लाभेल अशी अपेक्षा स्वातंत्र्याच्या सेनानीनी व्यक्त करून ठेवली होती. स्वतत्र भारताला लोकशाही प्रणाली निवडण्यात काही मर्यादा, काही धोके होते. सुशिक्षित जागृत लोकसख्या, स्वतंत्र सामाजिक संस्था, जनतेला जबाबदार असणारे नेते या लोकशाहीच्या यशासाठी आवश्यक बाबी– १९४७ मध्ये भारतात यातलं फारच थोडं होतं. तरी स्वातत्र्याच्या सेनानीनी उघड्या नजरेन, सूज्ञपणान लोकशाही प्रणालीचा स्वीकार केला. तेव्हा गाधीजीनी म्हटल होत की, स्वातत्र्यात जन्मलेली पिढी समाजाच्या

अध्वर्यूपदी येईल तेव्हा भारतीय लोकशाही अधिक बळकट होईल, त्या आधीच्या नेत्यांनी लोकशाही नीट न राबवल्यास ही पिढी त्या नेत्यांविरुद्ध विद्रोह करील. विसाव्या शतकाच्या सत्तरीच्या सुमारास संपूर्ण जगातच नव्या पिढीत विद्रोहाचं वारं होतं. कुठे त्याला हिप्पी संप्रदायाच्या रूपानं तोंड फुटलं. तर फ्रान्समध्ये 'कॅंपस्–क्रांत्यां'च्या रूपात विद्रोह प्रकटला. जवळ जवळ ही विद्रोही, प्रस्थापित–विरोधी भावनेची नस ओळखून इंदिराजींनी आपली एक स्वतंत्र प्रतिमा निर्माण केली, प्रचंड बहुमत मिळालं. त्यानतर गुजराथमधलं नवनिर्माण आंदोलन ( १९७३ ) बिहारमधील छात्र संघर्ष समितीचं आंदोलन ( १९७४ ). अगदी युवक कॉंग्रेसला आलेला बहर आणि ते दशक संपता संपता सुरू झालेलं आसाममधलं आंदोलन ही सर्व विद्यार्थी आंदोलनाची ठळक उदाहरणं.

तशा घटना सतत घडतच असतात आणि नवी नवी माणसं 'युवक' होत असतात. आधीचे 'युवक' किंवा 'तरुण तुर्क' म्हातारे होत असतात आधीची पिढी नेमकी संपते कुठे आणि पुढची सुरू कुठे होते ही निश्चित रेषा कधीच आखता येत नाही. कारण समाज असा कप्प्यांमध्ये विभागलेला नसतो. तो एक सतत वाहणारा, सतत बदलणारा प्रवाह असतो. तरी सुद्धा केव्हा तरी घटना अशा एकत्रितपणे परिणाम घडवून आणतात की प्रवाह बदलल्याची, नवं वळण त्याला मिळाल्याची चिन्हं दृग्गोचर होतात. स्वातंत्र्योत्तर भारतात असं ठळकपणे प्रथम १९७०–७१ मध्ये जाणवलं असावं आणि दुसऱ्यांदा आता १९८४–८५ मधे जाणवतंय. नवी पिढी, नवं रक्त जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये ठसा उमटवू लागलंय. एका अत्यंत अनपेक्षित, नाट्यमय पद्धतीनं या उगवत्या युगाचा प्रारंभ ३१ ऑक्टो. ८४ ला दिल्लीत घुमलेल्या बंदुकीच्या गोळ्यांनी करून दिला. १९८५ हे वर्ष भारतात केवळ नावापुरतं नाही तर सार्थक ठरेल असं 'युवक वर्ष' झालं. वर्षाच्या प्रारंभानं एक 'युवक' रूप असलेली व्यक्ती देशाचा पंतप्रधान झालेली पाहिली, तर समारोपानं युवकांचं सरकार–आसाममध्ये स्थापन झाल्याचे, संपूर्ण लोकशाही जगाच्या इतिहासात लक्षणीय ठरावी अशी घटना दाखवली. केवळ राजकारणच नाही तर साहित्य, कला, चित्रपट, संगीत, उद्योग व्यवसाय, विधायक सामाजिक कार्य, सुधारणा चळवळी स्वतंत्रच युवा मानसाची एक ताजीतवानी, आशादायी लहर जाणवते आहे. ही लहर ज्या भूमीवरून धावते आहे ती भूमी किती तरी 'सृजनशील साहसां'ची वाट पहाते आहे. या साहसांचं, आव्हानांचं भान आम्हाला आलेलं असेल तर 'युवक वर्ष' सार्थकी लागलंसं होईल. कारण आव्हानं पेलणं साहसांना सामोरं जाणं हेच युवकाचं सर्वात प्रधान लक्षण आहे.

युवक ! या शब्दात काय जादू भरलीय, कोणते आकर्षण भरलं आहे. इटलीचं सामर्थ्यशाली राष्ट्र निर्माण करण्याचं स्वप्न पहाणाऱ्या मॅझिनीला वाटत होतं की हे स्वप्न सत्यात उतरवायची ताकद युवकांमधेच आहे. दारिद्र्य, दैन्य आणि दास्य यात खितपत पडलेल्या भारताचं पुनरुत्थान युवकच घडवतील असा उदंड विश्वास स्वामी विवेकानंदांना होता. शेली म्हणतो, 'त्या देशाच्या युवकांच्या ओठावर कोणती गाणी असतात ते मला सांगा, मी तुम्हाला त्या देशाचे भवितव्य सांगतो.' अन् फार कशाला. एक नवा भारत घडवण्याचं काम युवकच करतील असं बाबा आमटेंना वाटतं. म्हणून 'माझ्या युवकांनो, या युगयात्रेत भरती होण्याची मी तुमच्यावर सक्ती करत आहे' असं म्हणत बाबांची 'भारत जोडो' यात्रा निघते. अशा हजारो, लाखो यात्रा आत्ता चालू असतील. शेतांमधे, कारखान्यांमधे, झोपडयांमधे, शाळांमधे, मंदिरामधे आणि यंत्रशाळांमधे. शास्त्र आणि तंत्रज्ञानाच्या यात्रा. अध्यात्म आणि सत्यशोधनाच्या यात्रा. सर्वच यात्रांचे यात्रेकरू युवक ! कोणत्या तरी एका मुक्कामावर भेटतील तेव्हा नव्या भारताला, युवक भारताला आकार घेऊ लागलेला असेल. कसा असेल हा आकार ? २१ व्या शतकातल्या भारताचा ? □

---

# रंगभूमी

# प्रेमानंद गज्वींचे तनमाजोरी

वि. भा. देशपांडे

प्रेमानंद गज्वी हे नाव मराठी नाटकाच्या संदर्भात (एकांकिका आणि दीर्घ नाटक) आता परिचित झालेले आहे. विशेषत: त्यांच्या 'घोटभर पाणी' एकांकिकेचे शेकडो प्रयोग झालेले आहेत. तसेच 'देवनवरी', 'किरवंत' आणि आता व्यावसायिक रंगभूमीवर आलेले 'तनमाजोरी' अशी विविध नाटके आपणासमोर आहेत. तनमाजोरी हे या आधी हौशी–प्रायोगिक रंगभूमीवर स्पर्धेच्या स्तरावर लक्षवेधी ठरलेले नाटक. ते यश गृहीत धरून त्या नाटकाला व्यावसायिक रूप देण्यात आलेले आहे.

तनमाजोरी या नाट्यशीर्षकावरून काहींना थोडाफार बोध होतो तर अनेकांना नेमका अर्थ कळेलच असे नाही. पण निदान नाट्यविषयाची दिशा कळण्यास मदत नक्कीच होईल. एका माजोरी सावकाराची, सधन शेतकऱ्याची ही कथा. हा गावचा सर्वेसर्वा आहे. गावातले अडले–नडले लोक अन्नासाठी, जगण्यासाठी चार पैसे मिळतील या अपेक्षेने याच्याकडे काम करीत आहेत. पण कष्ट आणि मिळणारा पैसा यांचे गणित कधीच जुळत नाही. कारण वेठबिगारीचे तत्त्व या ठिकाणी आहे !

वेठबिगारी हा विषय आता नाटक-चित्रपट माध्यमातून निरनिराळ्या पद्धतीने लोकांपर्यंत आलेला आहे. 'शापित', 'नागीण', 'दामुल' अशा अलिकडच्या काही चित्रपटांतून हा विषय गांभीर्याने हाताळला गेला

आहे. तसेच दलित रंगभूमीवर आलेल्या एकांकिका–नाटकातून कधी प्रत्यक्ष तर कधी अप्रत्यक्षपणाने विषयाला स्पर्श झालेला आहे. त्यामुळे गव्वींनी लिहिलेल्या नाटकात विषयाचे नाविन्य नाही. पण त्यामुळे नाटकाची गुणवत्ता कमी होण्याचे कारण नाही. विषयाची हाताळणी एखादा लेखक कसा करतो आणि त्यातून त्याचा जीवनविषयक–समाजविषयक दृष्टिकोन कसा व्यक्त होतो हे महत्त्वाचे ठरते. त्यादृष्टीने या नाटकाचा विचार केला तर नाट्यविषयाची हाताळणी करताना गव्वींनी वापरलेली कल्पकता आणि निश्चितता महत्त्वाची आहे. एखादी माजोरी व्यक्ती पुढे ती शक्ती बनते, त्या शक्तीला दुर्बल घटक परिस्थितीपरत्वे शरण असतात. पण एक वेळ अशी येते की, निरनिराळ्या कारणांनी व्यथित झालेले, दुखावलेले घटक हळूहळू एकत्रित येतात आणि सबलाचा विनाश करतात. ज्या प्रसंगावर, मुद्यावर नाटक थांबते किंवा संपते त्याला विशेष अर्थ असतो. तसा या नाटकाला अर्थ प्राप्त होतो. दुर्बलाचा कणखर विरोधाचा सूर नाटकाच्या आरंभापासून मुलाच्या विटीदांडूच्या खेळापासूनच आरंभित होतो. तिथेच एक ध्यानात येते की, या दोघांमधील संघर्षाला धार येणार आणि नाटकाचा तो महत्त्वपूर्ण भाग होणार. तसेच घडले आहे.

पण ज्या पद्धतीने आणि गतीने संघर्ष वाढवीत एका बिंदूपर्यंत नेला आहे त्यामध्ये गव्वींच्या नाट्यलेखनाची वैशिष्ट्ये प्रकर्षाने जाणवतात. विशेषतः वातावरणनिर्मिती, व्यक्तिस्वभावाचे तपशील आणि कथानकाचे विविध पैलू या रचनाविशेषांच्या संदर्भात ते सतत जाणवत राहते.


नाटकाची प्रकृती ओळखून दिग्दर्शन करावे असे नेहमीच अपेक्षित असते. या नाटकाला भारत तांडेल हा हौशी–प्रायोगिक रंगभूमीवरचा उत्साही–कल्पक दिग्दर्शक लाभला. अतिशय मेहनत घेऊन नाटकातला आशय नेमकेपणाने पोहोचवण्यासाठी नेपथ्य, संगीत आदी प्रयोगतंत्राचा यथायोग्य वापर त्याने केला. विशेषतः सुटसुटीत नेपथ्याचा वापर नाटकाला उपयोगी पडणारा होता. रंगमंचाच्या मध्यभागी मोठा चौथरा घर म्हणून वापरताना सावकार आणि इतरेजन यांच्यातील सर्वार्थाने असलेले अंतर, तसेच सावकाराचा अंत होताना केलेला परिणामकारी वापर इ. ही दिग्दर्शनाची खूण ध्यानात राहण्यासारखी आहे.

या नाटकातील बहुतेक सर्वच कलाकार समरसून काम करीत असल्याने प्रयोगाची रंगत वाढत राहते. बहुतेक म्हणण्याचे कारण असे की यातल्या स्त्री-कलाकार (खरे म्हणजे त्यांच्या वाट्याला फारच थोडे प्रवेश आणि संवाद आहेत.) अत्यंत सामान्य, नगण्य स्तरावर अभिनय करतात. मी पुण्यातला दुसरा प्रयोग पाहिला. तेव्हा त्यातली मूळची कलाकार काही कारणाने नव्हती. ऐनवेळी जिने काम केले तिचे प्रासंगिक कौतुक जरूर आहे. पण प्रयोगाचा तोल काही प्रवेशांच्या सामान्यपणामुळे ढळतो तसे इथे झाले. हा अपवाद वगळता लहानथोर सर्वच पुरुष-पात्रे आपापल्या जागी यथायोग्य होती. ज्यांचा विशेष उल्लेख करायचा तो भारत तांडेल, उदय म्हैसकर आणि नाना पाटेकर यांचा. भारत तांडेलने गावातल्या एका वेडसर माणसाची भूमिका केली होती. त्याला संवाद कमी होते. पण अनेक प्रसंगी नुसते मुद्राभाव जे होते ते त्याने अतिशय प्रभावीपणे व्यक्त केल्याने त्या प्रसंगाला उठाव येत होता. उदय म्हैसकर हा आता सराईतपणे काम करणारा आहे. त्याने मास्तरची भूमिका व्यवस्थितपणे उभी केली. पण कथानकाच्या संदर्भात हा मास्तर अधिक कणखर आहे, उदयने भूमिकेचे आविष्करण करताना तो भाग अधिकपणाने दाखवणे आवश्यक आहे असे वाटते. त्यामुळे नाटकाच्या रंगतीचा भाग अधिक समतोल राहील. पहिल्या अंकाच्या अखेरीस त्याने ज्या पद्धतीने मुद्रेवर भाव व्यक्त करून पुढील गोष्टींचे सूचन केले, तोच धागा पुढच्या अंकात तितक्या ताकदीने यायला हवा. उदय तो त्या ताकदीने आणू शकेल इतकी अभिनयसंपन्नता त्याच्याकडे निश्चितच आहे. सावकाराच्या भूमिकेत नाना पाटेकर होता. नानाचे रंगमंचीय व्यक्तित्व सर्वांना परिचित आहे. ते या भूमिकेला किती चपखल बसले असेल ते निराळे सांगणे नको. नानाने नाटकाची आणि अर्थातच त्याच्या भूमिकेची भडक जात ध्यानी घेऊन, आपला नेहमीचा आवाज वापरून भूमिकेतील अनेक ताण समर्थपणे व्यक्त केले. त्याच्या नाट्यकारकिर्दीतील ही आणखी एक महत्त्वाची भूमिका मानली जावी! मुलगा आणि बाप यांच्या भूमिका केलेले दोन्ही कलाकार उत्तम होते.

या नाटकाला पुण्यात मिळालेला मध्यम प्रतिसाद आणि एकूण प्रयोग पाहताना सतत वाटत होते की, हे नाटक नागर नाग नाट्यप्रेक्षकांसाठी फार मोठ्या प्रमाणात दाखवण्यात मतलब नाही. ग्रामीण किंवा अर्धग्रामीण भागामध्ये याचे प्रयोग अधिकतेने पोहोचतील, पोहोचावेत! कारण यातला विषय, आशय, मांडणी आणि एकूण वातावरण त्या प्रेक्षकाला अधिक जवळचे आहे.

□

पुण्यातील नाट्यसमीक्षक संघाने आपला चौथा कार्यक्रम विनोदी नाटकांवरील चर्चेचा केला. या कार्यक्रमात विनोदी नाटक, फार्सिकल किंवा प्रहसनात्मक इत्यादी नाटकांच्या लेखन, दिग्दर्शन, अभिनय यांच्या संदर्भात चर्चा झाली. चर्चेमध्ये नाटककाराने लिहिलेला शब्द, दिग्दर्शकाने त्याला दिलेली दिशा आणि प्रत्यक्ष प्रयोगात नटाने त्या शब्दांचा केलेला वापर यावर सोदाहरण बोलले गेले. उदाहरणांसाठी शांतेचं कार्ट, कार्टी प्रेमात पडली, टूरटूर इत्यादी नाटके होती. चर्चेमध्ये लक्ष्मीकांत बेर्डे, पुरुषोत्तम बेर्डे, प्रकाश बुद्धिसागर, रत्नाकर मतकरी आणि दामू केंकरे यांनी भाग घेतला. सूत्रचालन वि. भा. देशपांडे यांनी केले. नेहमीप्रमाणेच टिळक स्मारक मंदिराचे सभागृह श्रोते–प्रेक्षकांनी ओसंडून गेले होते. श्रोत्यांकडूनही काही प्रश्न आले होते.



चित्रपट

# आरपार

## वेगळी पार्श्वभूमी हेच वैशिष्टय

भारत–बांगलादेश यांनी सहकार्याने बनवलेला पहिला हिंदी चित्रपट 'आरपार' नुकताच प्रदर्शित झाला आहे. पण शक्ती सामंता निर्मित-दिग्दर्शित या चित्रपटात दोन्ही चित्रपट सृष्टीतल्या नामवंत कलाकाराना एकत्र आणण्यावाचून काही विशेष झालंय असं वाटत नाही. दोन देशानी संयुक्तपणे एखाद्या चित्रपटाची निर्मिती करायची तर त्यात काही वेगळेपणा हवा निदान तशी अपेक्षा असते, पण 'आरपार' च्या बाबतीत तस काहीही घडलेल नाही कथा नेहमीचीच आहे. फक्त ती इंडो–बांगलादेशच्या बॅनरखाली बनलेल्या चित्रपटाची आहे एवढच तिचं वेगळेपण.

कथा घडते समुद्रकिनाऱ्यावर असलेल्या एका छोटया गावात. इथं रहाणाऱ्या बहुतेकांचा मासे पकडणे हाच व्यवसाय असतो. त्याच्याकडून हे मासे विकत घेणारे दोघेजण असतात. बशीरमिया आणि महेश मन्ना (उत्पल दत्त) चित्रपटाचा नायक घन:श्याम (मिथुन चक्रवर्ती) हाही मासे पकडण्याचाच व्यवसाय करत असतो. त्यासाठी विकत घेतलेल्या लॉंचसाठी महेशकडून कर्ज घेतलं असल्यानं तो त्यालाच आपले मासे विकत असतो.

महेश खलनायक असल्यानं तो कपटी, कारस्थानी वगैरे असतो घन:श्याम अर्थातच चांगला आणि चित्रपटाचा नायक असल्याने कोळयांच नेतेपदही त्याच्याकडेच असतं. चित्रपटाची नायिका कमली (रोसिना) ही घन:श्यामची शेजारीण. तिच्यावर महेशचाही डोळा असतो. पण ती त्याला अर्थातच दाद देत नाही.

या आणि इतर कारणावरून महेश, घन:श्याममध्ये कुरबुर असतेच. एके दिवशी महेश खोटी वजने वापरून मासे विकत घेतो. हे उघडकीला येत आणि सगळे कोळी आपले मासे त्याच्याऐवजी बशीरकडे विकू लागतात. याचा सूड म्हणून महेश घन:श्यामची लॉंच ताब्यात घेऊ पहातो. तोही डाव त्याच्यावरच उलटतो.

चिडलेला महेश घन:श्यामच्या शेतात शिरून त्याच्या वडिलांना मारहाण करतो. त्यात त्याचा मृत्यू होतो. त्याच दिवशी तो कमलीवर बलात्कार करायचा प्रयत्न करतो. घन:श्याम तिथं येऊन तिला वाचवतो पण त्याच्यावरच बलात्काराचा आरोप केला जातो.

महेशनं आई–वडिलांना ताब्यात घेतल्यान कमलीही घन:श्यामविरुद्ध तक्रार देते. पुढ त्यानं पळून जाण, मग गैरसमज दूर होणं, एरवीच्या मारामाऱ्याबरोबरच महेशनं पाळलेल्या मगरीबरोबर त्याचा सामना वगैरे सगळे प्रकार होऊन महेशचा अपरिहार्य असलेला शेवट होतो.

काहीही आगळं–वेगळं नसलेल्या या कथेच एकमेव वैशिष्टय म्हणजे तिला लाभलेली पार्श्वभूमी. समुद्रकिनाऱ्यावरच गाव, कोळयाची वस्ती हे सगळं वातावरण चांगल्या रीतीन उभ करण्यात दिग्दर्शक यशस्वी झालाय पण त्याच मुख्य अपयश म्हणजे या वातावरणातली पात्रं मात्र तिथली न वाटता उपरी वाटतात. चित्रपटाचा त्यातही हिंदी चित्रपटाचा बहुतेकदा वास्तवतेशी काही संबंध नसतो हे खरं. पण त्यामुळ एवढी चांगली पार्श्वभूमी मात्र वाया गेली.

चित्रपटात पन्नाबाई हे पात्रही तसंच उपरं आहे. अर्थात तिच्यामुळ गैरसमज होऊन घन:श्यामचा चांगुलपणा आणि महेशचा दुष्टपणा दाखवायची संधी दिग्दर्शकाला मिळालीय शिवाय एक–दोन नाचगाण्याचीही सोय झाली ती वेगळीच.

दिग्दर्शक शक्ती सामंताचा भरपूर अनुभव चित्रपटाच्या कामी आलाय. काही असलं तरी चित्रपट कंटाळवाणा होऊ नये एवढी दक्षता त्यानी जरूर घेतलीय. शिवाय आपल्या वेगळया पार्श्वभूमीचा त्यानी दुसऱ्या तऱ्हेन फायदाही उठावलाय. इथ मारामाऱ्या करण्यासाठी काठया वगैरे फालतू साधन आहेतच पण कोयते, मासे कापण्याच्या करवतीसारख्या सुऱ्या वगैरे अभिनव प्रकारही आहेत. शिवाय नायक–मगरीची झुंज वगैरे आहेच.

चित्रपटाचा एक दोष म्हणजे काही वेळेस संवाद व्यवस्थित ऐकू येत नाहीत. आणि काही प्रसंग जुनी फिल्म असल्यासारखे तुटक-तुटक वाटतात.

चित्रपटाच संगीत आर. डी. बर्मनचं आहे, पण त्याचं काही खरं नाही. वास्तविक आर. डी. हा आधुनिक संगीतकारात संगीताचे सगळे प्रकार समर्थपणे हाताळू शकणारा अतिशय गुणी संगीतकार. पण 'आरपार' च संगीत ऐकून हे त्याचंच का इतकी शंका येते. एक–दोन गाणी बरी आहेत; पण सिनेमा पाहून बाहेर पडल्यावर त्यातलं एकही लक्षात रहात नाही. एक गाणं तर 'बरसात की एक रात' मधल्या 'कालीराम का बज गया ढोल' च्या बरचसं जवळपास जाणारं आणि त्याच चित्रीकरणही त्याच पद्धतीनं केलेलं.

कलाकारात उल्लेखनीय मिथुन आणि उत्पलदत्त मिथुनचा पोशाख छोटया गावातल्या कोळयाचा वाटत नाही. पण त्यावर मात करून त्यानं साधाभोळा पण अन्यायानं पेटून ऊठणारा घन:श्याम प्रभावी रीतीनं उभा करायचा प्रामाणिक आणि यशस्वी प्रयत्न केलाय. उत्पलदत्तनेही महेशबाबू सहजतेनं साकारलाय. हे दोघही काही ठिकाणी लाऊड वाटतात पण एरवी त्याची कामं जमून गेली आहेत.

नायिका झालेल्या बांगलादेशीय रोसिना जवळ मात्र ना रुप आहे ना अभिनय. त्यातून तिला न शोभणारे भडक रंगसंगतीचे पोशाख आणि दागिने यामुळे ती अधिकच वाईट दिसते. तिला स्वत:चं काही व्यक्तिमत्त्वच नाहीये. ती आणि पन्नाबाई झालेली बांगलादेशचीच नूतन या दोघीत खूपच साम्य आहे. त्यामुळे बऱ्याचदा दोघीतला फरकच कळत नाही.

भ्रष्ट पोलीस अधिकाऱ्याच काम असित सेननं केलंय. बऱ्याच दिवसानी तो पडद्यावर आला असला तरी आपली लोकप्रियता तो टिकवून आहे हे त्याच्या विशिष्ट पद्धतीच्या संवादपद्धतीला अजूनही मिळणाऱ्या हशावरून दिसतं.

—सीमा कुलकर्णी

# अंकुर, आक्रोश, अर्धसत्य वगैरेंच्या मालिकेतला

# निराशाजनक - दामुल

प्रकाश झा या नव्या दिग्दर्शकाच्या 'दामुल' या चित्रपटास राष्ट्रपतीचे सुवर्णपदक मिळाले आहे. दामुल म्हणजे मरेपर्यंत फाशी. बिहारमधील एका छोटया गावाच्या जमीनदाराने तेथील हरिजनांवर केलेले अत्याचार हा चित्रपटाचा विषय आहे. शिवाय चित्रपटाच्या सुरुवातीलाच १९८४ अशी सूचना येते. त्यामुळे कथानक प्रेक्षकाच्या अगदी जवळ येते.

दामुलचे थोडक्यात कथानक असे—माधव पाडे हा ब्राह्मण जमीनदार गेली बारा वर्षे गावाचा सरपच म्हणून निवडून येतो आहे. तो आणि त्याचा भाऊ, दोघांनी मिळून गावात अत्याचाराचे थैमान घातले आहे. या अत्याचाराचा, शोषणाचा एक प्रकार म्हणजे एखाद्या गरीब हरिजनावर चोरीचा आळ आणायचा, त्याच्या मागे पोलिसी ससेमिरा सुरू झाला की त्याला संरक्षण द्यायचे आणि या संरक्षणाच्या बदल्यात त्याच्याकडून निरनिराळी कृष्णकृत्ये करवून घ्यायची. अशा तऱ्हेने गेली बरीच वर्षे माधव पाडे गावावर अधिसत्ता गाजवत आहे माधव पाडेचा राजकीय प्रतिस्पर्धी बच्चाबाबू हा जातीने राजपूत म्हणजे सवर्ण आहे आणि त्याला सरपच होण्याची इच्छा आहे गेली बारा वर्षे निवडणुकीत बच्चाबाबूचा पराभव होत आला आहे. कारण त्याची राजकीय शक्ती माधव पांडेचा पराभव करण्यास अपुरी पडते.

आता फिरून निवडणुकीचे वारे वाहत आहेत. पण बच्चाबाबू या वेळेस वेगळीच खेळी खेळतो. स्वतः निवडणुकीस उभे राहण्याऐवजी चांभार जातीतल्या गोकूल या वयोवृद्ध व्यक्तीस उभे राहण्यास प्रवृत्त करतो. त्याचे गणित साधे असते—हरिजनांची मते आणि राजपुतांची मते या जोरावर माधव पांडेचा सहज पराभव करता येईल. एकदा का गोकूल मुखिया झाला की त्याला बाहुल्यासारखे वापरता येईल. त्या गावाच्या इतिहासात पहिल्यांदाच एक चाभार ब्राह्मणाच्या विरोधात निवडणूक लढवणार असतो.

आपल्याकडील निवडणुकीच्या राजकारणाची परपरा जातिधिष्ठित राजकारणाची आहे. स्वत च्या पराभवाच्या शक्यतेने माधव पाडे भडकतो. प्रत्यक्ष मतदानाच्या दिवशी बंदुका, काठ्यालाठ्यानी सज्ज असे भाडोत्री गुड आणून हरिजन वस्तीला वेढा घालतो. एकाही व्यक्तीस मतदानास बाहेर पडू देण्यात येत नाही. माधव पाडे अर्थातच निवडणूक जिकतो. बच्चाबाबूला हात चोळीत बसावे लागते.

पूनाई चाभाराचा मुलगा सजिवन यास माधव पांडे त्याच्या वडिलानी घेतलेल्या आणि आजतागायत न फेडलेल्या कर्जाचे खरेखोटे कागदपत्र दाखवून ते कर्ज सजिवनच्या नावावर करतो. निरक्षर सजिवन मुकाट्याने अंगठा उमटवतो, नाही तर त्याचे उभे पिक, शेतं, बैल जप्त करण्याची धमकी दिलेली असते. शिवाय एका चोरीचा आळ त्याच्यावर आणून माधव पाडे त्याला पोलिसापासून संरक्षण देतो. पद्धतीप्रमाणे त्या बदल्यात सजिवन शेजारच्या गावातून बैल चोरून आणण्याचे काम पत्करतो.

माधव पाडेच्या भावाला कालव्याच्या बांधकामाचे कत्राट मिळाले असते. तेथे तो मजुराना दोन रुपये दिवसाला मजुरी देत असतो. पण आजूबाजूच्या गावातून मजुरीचा दर पाच रुपये असतो. दोन रुपयात मजुरांच्या किमान गरजासुद्धा भागत नसतात. म्हणून ते मजुरीत वाढ मागतात. पाडे ही मागणी धुडकावून लावतो या परिस्थितीचा फायदा घेण्याच्या इराद्याने बच्चाबाबू मजुराना पजाबात जाण्याचा सल्ला देतो आणि भाड्यासाठी, हातखर्चासाठी म्हणून प्रत्येकाला ७५ रुपये तात्पुरते कर्ज देतो.

हे कळल्यावर पांडे सावध होतो. कालवा खोदण्याच्या कामात त्याने बरीच मोठी गुतवणूक केलेली असते. आता मजुरांअभावी काम अर्धवट जर राहिले तर त्याला प्रचड नुकसान सोसावे लागेल. मजुरीच्या दरात वाढ केल्यास नफ्याचे प्रमाण कमी होईल. यावर उपाय एकच—त्याना कायमची अद्दल घडवायची. एका पहाटे गाव सोडून जाणाऱ्या हरिजनावर पाडे आपल्या गुडाकरवी हल्ला करतो. एक दोन व्यक्ती मृत्युमुखी पडतात, इतर सर्व वस्तीकडे धाव घेतात. गुड त्यांचा पाठलाग करून एकेकाला चोपून काढतात आणि वस्तीला आग लावतात. प्रचंड हलकल्लोळ माजतो. सर्वत्र बोबाबोब होते. अशा स्फोटक परिस्थितीचा फायदा घेण्यासाठी बच्चाबाबू तत्पर असतोच. ताबडतोब पोलिसांकडे तक्रार करण्यात येते चोकशीचे चक्र सुरू होते.

इकडे माधव पाडे ओळखतो की आपल्या भावाने मर्यादेबाहेर जाऊन सूड घेतला आहे. आता अशा वेळेस परिस्थिती काबूत आणण्यासाठी तो बच्चाबाबूशी तडजोड करण्यास सिद्ध होतो. बच्चाबाबूचे आणि माधव पाडेची भांडणे काही तात्त्विक मतभेदातून उद्भवलेली नसतातच. भाडणाचे एकमेव कारण म्हणजे सत्तेचा फायदा कोणी घ्यायचा. तडजोडीत असे ठरते की कालव्याचा नकाशा बदलून कालवा बच्चाबाबूच्या जमिनीतून काढायचा, कालवा बाधण्याचे कत्राट बच्चाबाबूला मिळेल, शिवाय माहतमाईची जमीन बच्चाबाबूने गिळकृत करायची. या बदल्यात बच्चाबाबूने माधव पाडेला मदत करायची. दोघानी मिळून चौकशी अधिकाऱ्याना परत पाठवून द्यायचे की हरिजन वस्तीवरील हल्ला दरोडेखोरांनी केला होता. त्याप्रमाणे बच्चाबाबू वस्तीत जाऊन एकेकाला गाठतो आणि प्रत्येकाकडून वदवून घेतो की हा हल्ला दरोडेखोरानीच केला होता असे अधिकाऱ्याना सागायचे.

## प्रश्न सोपा नाही

हा साग अन्यायी प्रकार सजिवनला सहन होत नाही. तो ओरडून पोलीस अधिकाऱ्यांना सांगतो की हे सर्व खोटे आहे. सत्य काही वेगळेचे आहे. माधव पाडेचे गुड ताबडतोब त्याच्यावर झडप घालतात आणि त्याला चोपून काढतात. माधव पाडे विचार करून असे ठरवतो की सजीवन जर का असाच त्रासदायक ठरणार असेल तर वेळीच त्याचा काटा काढलेला बरा शिवाय तिकडे माहत-

माई सुद्धा त्याच्या विरुद्ध साक्ष देण्याच्या तयारीत असते, तो एकाच दगडात दोन पक्षी मारण्याचा कट रचतो. माहतमाईचा खून करून त्याचा आळ सजीवनवर टाकण्यात येतो. तावडतोब साक्षिदार उभे राहतात. केस उभी राहते. सजीवनला दोषी ठरवून फाशीची शिक्षा ठोठावण्यात येते. सजीवनची पत्नी सुन्न होऊन गावी परत येते. तेथे पाहते तर माधव पाडे वगैरे मंडळी आनदात गप्पा मारण्यात मश्गूल आहेत. एका तिरमिरीतच ती कोयत्याने माधव पाडेवर प्राणातिक हल्ला करते. त्यात माधव पाडे दगावतो आणि चित्रपट सपतो.

हे ढोबळमानाने दामुलचे कथासूत्र. यात भांडवलदारी, जातियता, निरक्षरता या मगरमिठीत अडकलेले हरिजन आहेत; उत्पादन साधनावर मालकी असलेला जमीनदार वर्ग आहे. या वर्गाचे अन्याय, अत्याचार आणि या अन्यायाचा केलेला एकहाती प्रतिकार आहे. या भरडल्या जाणाऱ्यामध्येही प्रतिकार करणारे काही स्फुल्लिग आहेत. पण या प्रतिकार करणाऱ्यांचा नायनाट होताना दाखविण्यात येतो. येथे आशावादाला काहीही स्थान नाही. वास्तवदर्शनाच्या नावाखाली निराशा, भेदरलेपणा समोर आणण्यात येतो. म्हणूनच या आणि अशा स्वरूपाच्या चित्रपटावर गभीर स्वरूपाचे आक्षेप घ्यावे लागतात.

'दामुल' हा चित्रपट 'अकूर', 'आक्रोश' वगैरे चित्रपटाच्या मालिकेतील आहे. 'अकूर' ने ज्या तऱ्हेच्या चित्रपटांचे बिजारोपण केले त्या वृक्षाला आलेले 'दामुल' हे अगदी निराशाजनक फळ आहे या चित्रपटाचा अतिम परिणाम वरवर पाहता आशावादी असल्याचा भास होतो, पण खोलवर पाहिल्यास असे लक्षात येते की हे चित्रपट पूर्ण निराशावादी आणि अवास्तव आहेत. या चित्रपटाची परिस्थितीला सामोर जाण्याची पद्धत, प्रश्नाना तोड देण्याची रीत अगदी शाळकरी, भाबडी आहे. या चित्रपटाच्या शेवटी नायक-नायिका कायदा हातात घेऊन अन्याय, जुलूम करणाऱ्याचा नाश करतात. परिणामी स्वत: नष्ट होतात. जणू काही एक दोन जमीनदाराचा खून केल्यावर अत्याचारी व्यवस्था नाहीशी होईल, जमीनदारी, सरंजामशाही सपेल आणि 'कसेल त्याची जमीन' हे तत्त्व मान्य होईल. प्रश्न सोडवण्याचा हा मार्ग प्रायोजित कार्यक्रमातील खास 'रजनी' मार्ग आहे– एकदम कायदा हातात घ्यायचा आणि झटकन कृती करायची. हे मार्ग प्रायोजित कार्यक्रमातच ठीक असतात, जीवन एवढे सोपे नसते.

या तऱ्हेने दोन, चार जमिनदाराचे मुडदे पाडून क्रांती करता येईल, हा खास नक्षलवादी आशावाद झाला. आता तर अशिम चक्रवर्ती, कनू सन्याल वगैरेसारखे नक्षलवादी नेतेच मान्य करू लागले की त्याचा मार्ग चुकला होता. सुट्या, सुट्या हिंसात्मक कृतीनी क्रांती होत नाही, तर त्यासाठी आधी लोकमानस तयार करावे लागते, जनतेची सहानुभूती मिळवावी लागते. लोकाची समज विकसित करावी लागते की त्याच्या या सर्व दु खाना कोण जबाबदार आहे, त्याच्यावर मात कशी करता येईल. हे कार्य क्रांती तत्त्वज्ञान समजून घेतलेल्या निष्ठावंत अनुयायानी करायचे असते. ही तयारी झाल्यावर मग लोकं उठाव करतात आणि ही व्यवस्था मोडून नवीन शोषणरहित समाज निर्माण करता येतो. एखाद्या व्यक्तीने हातात कोयता घेऊन जमिनदाराचा खून केल्याने काहीही होत नाही. 'अर्ध सत्य'मध्ये दाखवलेला रामा शेट्टी मारून काय होणार? त्याच्या जागी दुसरा एखादा लक्ष्मण शेट्टी येईल. परिस्थितीत काहीही फरक पडणार नाही. फक्त मधल्यामध्ये 'अर्ध सत्य'मधील अनंत वेलणकर, 'आक्रोश'मधील भिकू लहान्या आणि 'दामुल'मधील सजीवनची पत्नी याचे बळी जातील. उलट असा एकटा दुकटा सुटा-सुटा प्रतिकार केल्याने त्याचा ज्या तऱ्हेने नायनाट होतो, तो बघून इतराची प्रतिकार करण्याची इच्छा मारली जाऊ शकते, त्याचा घोर कमी होऊ शकतो. नतर बराच काळ कोणी डोके वर काढण्याची हिंमत करत नाही.

## प्रस्थापितांना पूरक

अशा तऱ्हेच्या चित्रपटांचीही आता एक चाकोरी झाली आहे. असे चित्रपट बनविण्याची पाकक्रिया अशी–एक खेडेगाव घ्यावे, तेथे एक क्रूरकर्मा जमिनदार असावा, तेथील रुढी, परपरातून निर्माण झालेली शोषणाची विशिष्ट पद्धती हरिजन–आदिवासी याच्यावर होणाऱ्या जुलुमांचं हृदयद्रावक चित्रण, त्याच्यापैकी एकात प्रतिकाराची भावना बळावत जाण, त्याने प्रतिकाराचा प्रयत्न करणं, त्याची व्यवस्थेकडून कोंडी होणं आणि मग अंती त्याने कायदा हातात घेऊन हिंसात्मक कृती करणं या सर्वांचा मिळून एक खास कलात्मक चित्रपट तयार होतो. मग आतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात एखादे बक्षिस, राष्ट्रीय पातळीवर एखादा मानसन्मान, करमणूक कर मुक्तता इत्यादी मिळते.

या तऱ्हेच्या चित्रपटाचा पल्ला एवढाच असतो. एखादी हिंसात्मक कृती दाखवून चित्रपट सपतो. यानतरच्या घटना चित्रीत करायच्या झाल्यास काही विचार करावा लागतो. जमिनदाराचा खून झाल्यावर ग्रामीण जीवनाच्या विविध घटकावर म्हणजे प्रस्थापितावर, त्याच्यातील इतर स्पर्धकावर, शोषितावर, पोलिसावर काय परिणाम झाले. आता या घटनेनतर तेथील परिस्थिती कोणते वळण घेईल. त्याची दिशा कोणती वगैरे सफाईने टाळण्यात येते. उलट असे एखादे हिंसक कृत्य घडल्यावर चित्रपट सपल्याचे पलायनवादी तत्र अवलबिण्यात येते. माधव पाडेचा खून झाल्यावर काय झाले? त्याचा भाऊ परत आला का? बच्चा बाबूने कोणती खेळी रचली? हरिजन वस्तीवर काय परिणाम झाले? पोलिसी चौकशीचे चक्र फिरू लागले का? किती निरपराध लोकाना डाबण्यात आले? वगैरे चित्रपटात येत नाही

अशा चित्रपटाद्वारे होणारे वास्तवदर्शन, तेथे निर्माण होणाऱ्या समस्या, त्याची उकल हे सर्वच प्रस्थापिताना पूरक असते. त्यामुळेच कदाचित या तऱ्हेच्या चित्रपटाना सन्मानित करण्यात येते. जोपर्यंत ही चौकटच उखडून टाकण्याचा मार्ग, ती प्रक्रिया दाखविण्यात येत नाही, तोपर्यंत असे वैयक्तिक पातळीहून केलेले प्रतिकार कितीसे प्रभावी ठरणार? उलट असंही म्हणता येईल की अशा तऱ्हेच्या वैयक्तिक, एकाड्या प्रतिकाराच्या कहाण्या चित्रित करायच्या आणि त्यात त्या व्यक्तीचा कसा नायनाट झाला हे ही दाखवायचे. हे दाखविल्यामुळे उत्साह वाटून, धीर येऊन प्रतिकाराला धार येण्याऐवजी दहशत निर्माण होते आणि जेथे कोठे असा असंतोष खदखदत

असेल, तेथे निराशजनक वातावरण निर्माण होते. म्हणजेच परत 'जैसे थे'!

त्यातल्या त्यात समाधानाची बाब म्हणजे अशा चित्रपटांचा प्रसार आणि प्रभाव फक्त मध्यमवर्गापर्यंतच मर्यादित आहे. मुंबई, पुणे सारख्या शहरातील रसिकवर्गातच आहे. ही मंडळी अशाही चित्रपटांचा चवक 'आस्वाद' घेतात. म्हणजे कमाल आहे. काहीही न करण्याची इच्छा असलेला, स्वतःच्या पोटातील पाणीही हलणार नाही याविषयी दक्ष असलेला माध्यमवर्गच या तऱ्हेच्या निराशावादी कलाकृतीचा आश्रयदाता आहे. Y. S. Naipaul यांच्या शब्दात सांगायचे तर ही सर्व मंडळी Return Ticket Revolutionary आहेत. तास दोन तास क्रांतीकारक वातावरणात काढल्यावर परत स्वतःच्या सुखसोयींनीयुक्त अशा आयुष्यात परत जायला तयार. कारण नाही तरी त्यांना काहीही बदल नको असतो. हे चित्रपट गावोगावी जात नाहीत, हे बरेच आहे. नाही तर या चित्रपटांतील नैराश्यपूर्ण अंत बघून धीर येण्याऐवजी जो काही आहे तोही खलास व्हायचा. अर्थात अशा चार–दोन चित्रपटांनी खलास व्हावा, एवढा त्यांचा उत्साह कच्चा नसतो; पण तात्पुरतं हतबल व्हायला होतं.

–अविनाश कोल्हे

विज्ञान

## वनस्पतींतील आश्चर्य : भुईमूग

**खा**द्य तेलांपैकी सर्वात जास्त तेल आपल्याला भुईमुगापासून मिळते. एकूण तेलाच्या ७०% ते भुईमुगाचे असते. पण इतरही एका दृष्टीने भुईमूग अद्वितीय आहे. जमिनीतून मिळणारी बहुतेक पिके म्हणजे त्या त्या वनस्पतींची मुळे असतात. गाजर, मुळा, रताळी ही सर्व मुळे आहेत. क्वचित काही खोडे–उदा. बटाटा–असतात. पण भुईमुगाची शेंग हे त्या वनस्पतीचे फळ आहे. फळे जमिनीखाली धरणारी भुईमूग ही वनस्पतीविश्वातील एकमेव वनस्पती आहे.

इतर सर्व सपुष्प वनस्पतींप्रमाणे भुईमुगाच्या रोपालाही फुले येतात. ही फुले रोपाला वर हवेतच येतात. फुलांनी बहरलेले भुईमुगाचे शेत पुष्कळांनी पाहिलेले असेल. नेहमीसारखेच या फुलातील परागण होत असते. परंतु फलन झाल्याबरोबर फुलाच्या खाली अंडाशयाजवळ देठासारखा एक धुमारा फुटतो. तो प्रकाशाच्या विरुद्ध म्हणजेच जमिनीच्या दिशेने वाढत जातो व जमिनीला टेकून थोडा मातीत जातो. या धुमाऱ्याच्या टोकालाच फलन झालेली बीजांडे असतात. मातीत सुरक्षितपणे सुस्थापित झाल्यानंतर गर्भाची वाढ होते व शेंग आणि आतील दाणे तयार होतात. धुमारे फुटल्यानंतर अर्थातच फूल गळून जाते. धुमाऱ्याचे पुढील टोक म्हणजेच फलन झालेले बीजांड असल्याने ते तसे नाजूक असते. म्हणून कोरड्या कठीण जमिनीत शिरू शकत नाही. त्यासाठी रोपाभोवतीची जमीन ओलसर व भुसभुशीत असावी लागते, म्हणूनच भुईमुगाच्या पिकाची मशागत काळजीपूर्वक करावी लागते.

आपल्या बीजाची अशी खास व्यवस्था केल्याने भुईमुगाच्या झाडाचे काही फायदे होतात तर त्याला काही तोटेही सहन करावे लागतात. सर्वात मोठा फायदा म्हणजे बी थेट जमिनीत पेरले जाते. वंशसातत्य हा जीवनाचा एक प्रमुख उद्देश मानला गेलेला आहे. त्या दृष्टीने भुईमुगाच्या रोपाने आपला वंश टिकेल याची चोख व्यवस्था केली आहे. दुसऱ्या कोणत्याही सपुष्प वनस्पतीला हे साधलेले नाही. शेंगा धारण करणाऱ्या इतर वनस्पतींच्या शेंगा पूर्ण वाढ झाल्यावर वाळतात व तडकतात, फुटतात. त्यामुळे शेंगेतील बी जमिनीवर उघड्यावर पडते. ते वाऱ्याने इकडे तिकडे पसरते व योगायोगाने योग्य जागी पडले तर रुजते. दरम्यान या बिया अनेकांच्या भक्ष्यस्थानी पडण्याची शक्यता असते. पक्षी शेंगा झाडावर असतापासूनच त्यांच्यावर ताव मारीत असतात. खाली पडल्यावर कीडामुंगी या बियांवर तुटून पडतात. उंदीर, घुशी, खारी इ. कृतक प्राण्यांचे मुख्य अन्न म्हणजे अशा बियाच आहेत. शेळ्या, मेंढ्या इतकेच नव्हे तर गाई म्हशी ही गुरेही शेंगा व शेंगातील बिया खात असतातच. या सर्व भक्षकांपासून भुईमुगाचे बी बऱ्याच प्रमाणात सुरक्षित रहाते.

असे असले तरी शेंगा धारण करणाऱ्या इतर वनस्पतीत आढळणाऱ्या काही गोष्टी भुईमुगाने गमावल्या आहेत. त्या वनस्पतीच्या बिया सामान्यतः कठीण तर असतातच पण शिवाय त्यावर एक घट्ट साल, कवच असते. त्यामुळे या बिया टिकाऊ होतात आणि भक्षकाच्या पोटात गेल्या तरी पचायला कठीण असतात. या बियात काही घातक विषद्रव्येही असतात. भुईमुगाच्या दाण्यात असली कोणतीच संरक्षक व्यवस्था नसते.

त्यामुळे शेतमाल म्हणूनही भुईमुगाला तोटयाच्या बाबी फार आहेत. भुईमुगाची शेंग फार कठीण नसते व दाण्याचे साल तर अगदीच पातळ असते. दाणा मऊ व चविष्ट असल्याने सर्रास खाल्ला जातो. पीक काढण्यापूर्वीपासूनच माणसे झाडे उपटून पिकाची नासाडी करू लागतात. भारतासारख्या देशात शेतीची बहुतेक सर्व कामे मानवी श्रमांनीच केली जातात. शेंगा काढणे, वाळवणे, साठवणे, वाहतूक व शेवटी विक्री या सर्व अवस्थात दाणे खाल्ले जातात. किराणा माल विकणारा वाणीसुद्धा मधूनमधून दाणे खात असतो हे आपण नेहमी पहातो. भारतातील एकूण भुईमुगाच्या पिकापैकी १० टक्के पीक हाताळताना विक्रीपूर्वीच खाल्ले जाते असे आढळून आले आहे.

–भा. रा. बापट




MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage No-11 ) Regd. No. PNCW-28

## तेंडुलकरांची नाटके

**डॉ. चंद्रशेखर बर्वे**

" वहात वहात आयुष्याच्या मध्यभागी पोचलो आहे. अथांग खोली आता प्रत्यक्ष जाणवू आगली आहे.... समुद्रावरून समुद्रपक्षी फिरतात, तसा मी जीवनावरून मनानं दिशाहीन, निरुद्देश, संथपणे भिरकांडत, तरंगत आहे....उत्सुकता एकच आहे, या समुद्राचा तळ किती खोल असेल, तो कसा दिसत असेल ? "

जो तळ दिसला तो तेंडुलकरांनी आपल्या नाटकांतून दाखवला,

समुद्रपक्ष्याप्रमाणे शांतपणे भिरकांडणाऱ्या तेंडुलकरांची नाटके मात्र वादळी अन् वादग्रस्त ठरली !

या साऱ्या म्हणजे पंचवीस नाटकांचा व तेंडुलकरांच्या श्रेयाचा, विवेचक दृष्टीने, पण आस्वादक वृत्तीने शोध घेण्याचा हा एक प्रयत्न–

**तेंडुलकरांची नाटके**

किंमत : तीस रुपये

## कल्पान्त

**मनोहर राईलकर**

आजकाल सटरफटर राष्ट्रंसुद्धा अणुशस्त्रांचे ढीगच्या ढीग बाळगून आहेत. अणुयुद्धाच्या संभाव्य परिणामांचं गांभीर्य त्या सर्वांना समजत असेल का ? आणि एखाद्या बेजबाबदार राष्ट्रानं युद्ध सुरू केलंच तर ?

किरणोत्सर्गी धूळ जगभर पसरली तर ? तर काय होईल ?

या प्रश्नाचं ज्वलंत व जिवंत उत्तर म्हणजे ही कादंबरी.

' ऑन द् बीच ' या नेव्हिल शूटच्या कादंबरीचा भावानुवाद

**कल्पान्त**

किंमत : पस्तीस रुपये

## लांडगा आला रे ऽ आला

लेखक : **फर्ले मोवॅट**

रूपांतर : **जगदीश गोडबोले**

फर्ले मोवॅट या जीवशास्त्रज्ञाने घेतलेल्या लांडग्यांच्या जीवनाच्या शोधाची ही कथा. कल्पिताlाही मागे टाकणारा, रोमांचक अनुभव मोवॅटला उत्तर ध्रुवावरच्या या सफरीत आला. लांडग्याविषयीची माणसाची पूर्वापार मतं पार कोसळवून टाकणारी ही कहाणी, त्याच वेळी मनुष्य स्वभावावरही विदारक प्रकाश टाकते.

**लांडगा आलारे ऽ आला**

किंमत : तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०
दूरध्वनी : ४४ ३४ ५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर ( प. ) मुंबई ४०० ०२८
दूरध्वनी : ४२२५४५५